दिवाळी विशेषांक २०२०

# नवा वास्तुविचार

-: संपादक :-

डॉ. विलास पवार



प्रकाशन

ओम पब्लिकेशन

ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक, संस्थापक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- २५३६४१४१ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मतांशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

**Email -** info@ompublication.com, **Website :** www.ompublication.com

# अंतरंग

## लेख


१. माझे आजोळ ....................................नम्रता धनावडे.........०५
२. वास्तूशास्त्र सारासार -विचार..................अमृता नरसाळे........ ०९
३. सावधान घरे अबोल होतायेत.................वंदना मत्रे..............१३
४. देव ...............................................प्रा. अरूण पाटील....१७
५. वास्तुशास्त्र व अंतर्गत सजावट...............अश्विनी जाधव.......२५


## कथा


१. ओलावा नात्याचा...............................संतराम पाटील........२९
२. लाडो...............................................डॉ. सुवर्णा पाटील.....३३
३. भेटीत तुष्टता मोठी..............................रुपश्री बनारसे........३७
४. सुंदर माझे घर....................................सुनिता देहेरकर.......३९
५. ठराव ............................................. संतराम पाटील.......४५
६. सुटका ............................................ ऋतूजा पाटील.......५१
७. गोष्ट संगीताची.................................अशोक भुस्कट....... ५५
❖ काव्यसृष्टी.................................................................. ६९
❖ पाककृती.................................................................. ७१





# संपादकीय

## नियमांचे पालन वास्तूसौख्य वाढवणार

आपली वास्तू, आपला परिसर याबाबत आपण नेहमीच योग्य काळजी घेत असतो. एखादी वस्तू विकत घेताना आणि तिचे संगोपन करताना आपण परंपरा,निसर्ग,वैज्ञानिक दृष्टीकोन या सगळ्यांचा विचार करत असतो आणि यातूनच खऱ्या अर्थाने वास्तु विज्ञान आणि वास्तू परंपरा सजग आणि समृद्ध राहत असतात.

गेल्या वर्षभरात आपण सगळे भारतीय जगातली सगळी मानव जाती कोविड१९ग्रासलेले आहेत आणि या अशा स्थितीत ज्या गोष्टी आपल्याला स्वतःसाठी आपल्या वास्तु साठी करायचे आहेत अशा अनेक विचारांचं आदानप्रदान संक्रमण आणि त्याच बरोबर वैचारिक जिणोध्दार झालेला आहे. आपल्या पूर्वजांनी घरात येताना हात-पाय धुवून यावे. वास्तु स्वच्छ आणि प्रसन्न ठेवावी इत्यादी सगळ्या सूचना आणि नियम सांगितलेले आहेत. कोवीड१९ सारख्या जागतिक स्तरावर थैमान घातलेल्या आजारात या वास्तूने मोठी भूमिका बजावलेली आहे. एखाद्या वास्तूत तिथे असलेली नातेसंबंध यांना एक वेगळी परिमाण या कोवीड१९च्या निमित्त्याने मिळालेले आहे आणि त्यामुळे परस्पर विचारातून वास्तु बद्दलची मतमतांतरे समोर आलेली आहेत. वास्तूमध्ये स्वच्छता राखण्याबाबत आणि कोविड१९ चा प्रतिबंध करण्यासाठी वास्तुतले सर्व सभासद कार्यरत झालेले आहेत. मग ती वास्तू घर असेल, कार्यालय असेल, दुकान असेल अथवा अन्य काही. सर्वांना कोविडचा प्रादुर्भाव आपल्या वास्तूत नको आहे.आपण सगळ्यांनी मिळून असाच प्रयत्न सातत्याने चालू ठेवला पाहिजे. आपले सण आणि उत्सव हे साजरे केलेच पाहिजेत परंतु सामाजिक अंतर राखून आणि वैद्यकीय सूचना व नियमाचं पालन करून. आपल्या सणाचा आनंद द्विगुणित करायला पाहिजे. दिवाळीचा सण आपल्या सगळ्यांचा आवडता आहे. हा दिवाळी सण स्वास्थ वर्धक, आरोग्यदायी, आनंददायी होवो यासाठी आपल्या सगळ्यांना

**दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा !!!!**



**With best compliment from**

# Venkatesh Construction



Prop - Venkatesh Bammankatti

# माझं आजोळ

-नम्रता धनावडे

आजोळ म्हणजे बालपणाच्या मधुर आठवणीच, सदैव मनात थुईथुई उडणार कारंजे, आपल्या प्रत्येकाच्या हृदयामध्ये आजोळासाठी एक खास कप्पा असतो. कोणाच्या मध्ये तो पुसटसा तर कोणा मध्ये भरुन वाहिलेला, पण असतो नक्की! पाचगणीच्या टेबललेंडच्या पायथ्याशी डोंगराच्या कुशीत वसलेले, गर्द झाडीतून डोकावणारं, लाल मातीन शृंगारलेले आणि तानाजी मालुसरेच्या वारसाने पतीत पावन झालेले 'गोडवली' हे गाव माझ आजोळ आहे.

त्या गावा इतकी प्रेमळ माणसं मला या जगाच्या पाठीवर अजून तरी भेटली नाहीत. किंबहूना पृथ्वीतलावरची सर्व प्रेमळ माणसं, या गावात आणून टाकली की काय असे वाटते. गावची रांगडी भाषा, साधेपणा मला प्रत्येक मे महिन्यात आजोळी खेचुन नेत असे, सारा गाव मामाचा याप्रमाणे गावातील सर्व मामांचे मित्र मामा, तर मावशीच्या मैत्रिणी मावश्या बनल्या होत्या. अजूनही ते गाव आमच्यासाठी मामा, मावश्या, आजी आजोबांचे भंडार आहे.

आजीच घर म्हणजे टूमदार हवेलीच जणू, भलमोठ मातीचं कौलारु घर, घरासमोर आरामदायी ओसरी, शेजारी गाई म्हशींचा गोठा आणि घरभरुन वाहणारी घरातील आणि सतत राबत असणारी थेट काळजाला भिडणारी गावातील माणसं. लहापण पांढरपेशा शहरी वातावरणात गेल्यामुळे मायेची उब देणारं थंडगार हवेच आजोळ आमच्या साठी खास होतं.

**मला माझ्या सासुबाईंचे एक वाक्य नेहमी आठवत. त्या म्हणायच्या दिवसभर कुठेही जाते लेकीकडे असो कि , माहेरी पण सांच्याला आपल्याच गावात घरात यायचं असत मला. आता या वयात मु.पो. इथेच.**

'चलती झाडे पाहुया मामाच्या गावाला जाऊया', म्हणतं एसटीची मोठी मागची सीट पकडून आई, आम्हा पाच भावडांना घेऊन जायची. कोणाच्या तरी लग्नानिमित्त दरवर्षी मे महिन्यामध्ये सातारा, पाचगणी वाऱ्या करीत असू. त्या प्रवासात खरच मी ही पळणारी झाडे पाहिलेले आठवतात. जसजशी एसटी पुढे जाईल तस-तस अंतर जास्त वाटायला लागायचं. कधी एकदा आजी-मामा मावश्यांना भेटते असे वाटायचे. खरचं ती अजान वयातली मनाला तरसवणारी ओढच न्यारी. कदाचित त्या वेळी हल्ली सारखे फोन, इंटरनेट यांचा विळखा नसल्यामुळे विरह, ओढ या भावना उंचबळून त्याला प्रेमाच उधाण येत असावं.

गावातल कोणाचेही लग्न म्हणजे आमच्यासाठी

पर्वणीच असे एकमेकांशी हळद खेळणे, मेहंदी, उटण्याची सांडालोड करणे आणि ओरडाखाणं, फुलपाखरांचे पंख लावून मंडपात बागडणे, आणि फुल टू धमाल म्हणजे मामाच गाव. टप-टप पडणारी काळीभोर जांभळ आणि खोडापासून शेंडयापर्यंत पिलावळी प्रमाणे लटकलेली फणसाची झाडं. स्ट्रॉबेरीच्या शेतातुन पोट फुटे पर्यंत खाल्लेली स्ट्रॉबेरी, आजीला आराम मिळावा म्हणून गुरांना चारायला नेऊन त्यांना आणि स्वत:लाही डोंगरात सुखावून घातलेला गोंधळ आणि आजोबांच्या कोटाच्या खिशातून चोरुन खालेल्या लेमनच्या गोळया,




अशा कितीतरी आठवणींच मोहोळ मनात रुंजी घालत असते. लाईट नसल्यामुळे सहा वाजताच गावात अंधार जाणवायचा. सात वाजताच पंगत बसून आठ नऊ वाजताच सर्वजण ओसरीत भल्या मोठया गोधडया टाकून एकत्र झोपण्याचा सोहळा असायचा आणि सुरु व्हायचा गाणी, गोष्टींचा अनोखा उत्सव आणि बऱ्याच वेळा उत्सवमूर्ती मीच असायची. गोष्टी रंगवून सांगण्यात त्यावेळी माझा चांगला हातखंड होता. शिवाय गाणी, नकला नाहीतर शाळेतील आख्खे धडे ओघवत्या आवाजात न बघता म्हणून दाखवणे आणि कौतुक करुन घेणे हा बाल मनाला छंद जडला होता. पण जरा कुठे काही खळ खटयाक झाले की सर्वांच्या नजरेचा फणा माझ्याकडे उभारलेला असायचा जणू त्यांच्या मते सर्वांना मामा बनवण्याचा व इरसाल बनण्याचा मी वसाच घेतला होता. सुदैवाने सासरही खेडेगावच मिळाले त्यामुळे खेडेगावची नाळ कायमची जोडली गेली. आजोळ आणि सासर हे एकच खेडगाव असल्यामुळे दोघाच्या तुलनेचे द्वंद प्रथम मनात चालत असे. एका गावान नातीसाठी कोड कौतुकाच्या मखमली घडया घातल्या तर, दुसऱ्या गावाने सुनेसाठीचं सौभाग्याचं लेण्याबरोबरच जबाबदारीच आंदण ओटीत घातल. आजोळ ते आजोळच असतं कारण नातवंड दुधावरची साय असते. पण सासरच्या गावची सर कोणत्याही गावाला येणार नाही. तुझ- तुझ म्हणता म्हणता सासरचं गाव आपल कधी होत हेच समजत नाही. मला माझ्या सासुबाईचे एक वाक्य नेहमी आठवत. त्या म्हणायच्या दिवसभर कुठेही जाते लेकीकडे असो कि, माहेरी पण सांच्याला आपल्याच गावात घरात यायचं असत मला. आता या वयात मु.पो. इथेच. त्यांच्या बोलण्यातील मर्माचा आता कुठे बोध व्हायला लागला.

परवाच पती मुलांसोबत आजोळी गेले होते.

वेशीपासून गावचा नकाशा बदलेल्या खाणाखुना दिसू लागल्या आहेत. लाल दगड मातीचा रस्ता, डांबरी बनला आहे. हिल स्टेशन म्हणून रस्त्या लगत अलिशान हॉटेल उभी राहिलेत. सगळीकडे सिमेंट कॉंक्रेटची घरे डोकावून लागली आहेत. आजीच ही कौलारु मातीच घर जावून त्या ठिकाणी तीन्ही मामांनी चकाचक तीन वेगळी सिमेंटची कॉंक्रेटची घरे बांधली आहे. आजी आजोबांचे प्रेम फोटो मध्ये बंदिस्त झाले आहे. आता अंगणातल्या लालमातीनं पाय लाल होत नाहीत. गोमुत्र शेणाचा वास कधीच तडीपार झाला आहे. चुलीवरच्या धुरांन डोळे पाणावत नाही आणि बालमनाला वाटणारी ती आर्त ओढ आणि हुरहुरणारी परतीच्या वाटेची जाणीव आसमंतात विरुन गेल्यासारखी वाटते. नुसती नजर भिरभिरते आणि शोधत रहाते . बालपणातील मी आणि माझ्यातील हरवलेली अल्लड बालिका.

## ✻ घराच्या मुख्य दरवाज्याचेही काही नियम आहेत . ✻



१)घराच्या मुख्य दरवाज्यासमोर रस्ता नसावा. दरवाज्यासमोर रस्ता असल्यास आपल्या विकासात बाधा येते.

२)दरवाज्यासमोर मोठे झाड असल्याने घरातील मुले नेहमी आजारी पडतात.

३)दरवाज्यासमोर नेहमी पाणी वाहते ठेवल्याने नेहमी आर्थिक नुकसान होत असते.

४)दरवाज्यासमोर मंदिर असेल तर घरात कधीच सुख नांदत नाही.

५)घराच्या मुख्य प्रवेशव्दारासमोर स्तंभ (खांब) असतील तर त्या घरातील महिला नेहमी आजारी पडतात.

६)जमिनीच्या तुलनेत घराचा दरवाजा खोलगट भागात असेल तर घरातील मुख्य पुरुष व्यसनाधीन व नेहमी दु:खात बुडालेला असतो.

७) घरासमोर रस्ता, मंदिर असेल तर घरासमोर अधिक जागा सोडल्याने दोष नाहीसे होतात.

With best
compliment from

# HARSH CONSTRUCTION

# वास्तुशास्त्र
# सारासार विचार

**-अमृता नरसाळे**

वास्तुशास्त्र हे नेहमीच भारतीय जीवन पद्धती आणि संस्कृती यांचा एक अविभाज्य घटक राहिलेले आहे. आपल्या पौराणिक व अध्यात्मिक ग्रथांमध्ये देखील वास्तुशास्त्राचा उल्लेख पाहायला मिळतो. विश्वकर्मा ही वास्तू शास्त्राचे जनक किंवा देवता मानली जाते. कालपरत्वे या शास्त्राचे महत्त्व कमी होऊन समाजामध्ये त्याबद्दलच्या अंधश्रद्धा जास्त वाढू लागल्या. त्याचे मूळ कारण म्हणजे अपुरे ज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव. जशी माणसाची जीवन पद्धती विकसित होत गेली तसा तो विज्ञाशी स्वत:ला अधिक जोडत गेला आणि अनेक जुन्या गोष्टींकडे अंधश्रद्धेच्या दृष्टिकोनातून पाहू लागला.

**भारतीय वास्तूशास्त्र हे भारताचे भौगोलिक स्थान, दिशा, विस्तार, हवामान, चुंबकीय क्षेत्र, इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड, शिल्पशास्त्र आणि जीवनपद्धती यांच्या परिपूर्ण अभ्यासातून उदयाला आले आहे.**


काही काळापूर्वी भारतीय संस्कृतीला पुन्हा कुरवाळू पाहणाऱ्या या माणसाला योगविद्या, आयुर्वेद, ज्योतिषशास्त्र, वास्तूशास्त्र यांकडे देखील आधुनिक पद्धतीने पाहण्याची गरज भासू लागली. तो हे विसरला होता की असे अनेक शास्त्र त्या काळात वैज्ञानिक संशोधनातूनच उदयास आली होती. मात्र त्याकाळच्या बहुतांश अशिक्षित समाजावर धर्माचा पगडा एवढा जास्त होता की धर्माचा आधार घेऊन कोणतेही शास्त्र लोकांच्या जीवन पद्धतीमध्ये रुजवणे जास्त सोपे आणि सोयीस्कर होते. त्यातून काही परंपरा जशाच्या तशा स्वीकारण्यात आल्या आणि त्यामागचा त्या काळचा योग्य दृष्टिकोन मागे पडत गेला.

त्याचबरोबर प्रत्येक शास्त्र हे त्यावेळच्या वर्तमान परिस्थितीला अनुसरून अभ्यासून निर्मिले गेले असले तरीदेखील हजारो वर्षांनंतरही त्याचे महत्त्व तितकेच प्रभावी असते.

मात्र त्यामध्ये सध्य परिस्थितीनुसार योग्य ते बदल होणे तितकेच आवश्यक आहे.

या विषयाची अनेक पुस्तके बाजारात उपलब्ध असल्याने वास्तुशास्त्र म्हणजे नेमके काय हे आता साधारण सर्वांपर्यंत पोहोचलेले आहे. त्यामुळे इथे त्याची व्याख्या किंवा नव्याने उल्लेख नको तर नवा दृष्टीकोण जाणून घेऊ. मात्र सामान्य व्यक्तीच्या मनात हा विचार कायम असतो की यातला नेमका खरं काय आणि खोटं काय. कोणतेही शास्त्र फॉलो करण्यापूर्वी तुमची त्यावर किमान श्रद्धा असणे महत्त्वाचे. 'मनात नाही भाव आणि देवा मला पाव' असे म्हणून चालेल का? तत्पूर्वी तो परमेश्वर तुम्हाला किमान काही अंशी तरी उमजायला हवा. प्रत्येकाने याची किमान बेसिक चौकट वैज्ञानिक दृष्टिकोनातून पडताळून पाहणे गरजेचे आहे. शास्त्राच्या कोणत्या बाजू

वैज्ञानिक आधारे सिद्ध झालेल्या आहेत हे समजून घेणे देखील आवश्यक आहे. त्याच बरोबर अति श्रद्धा देखील अंधश्रद्धेकडे घेऊन जाते. मी माझ्या अध्ययन व समुपदेशनाच्या अनुभवातून हे निश्चितच सांगू शकेन की व्यक्तीला या शास्त्राचा आपल्या विकासासाठी चांगला उपयोग करून घेणे सहज शक्य आहे. त्याचबरोबर इथे एक गोष्ट आवर्जून नमूद करू इच्छिते की वास्तू म्हणजे सर्व काही नाही आपल्या आयुष्यावर केवळ २५% वास्तुशास्त्राचा चांगला किंवा वाईट परिणाम होतो. २५% ज्योतिषशास्त्र, २५% मागीलजन्मीचे कर्म व २५% सध्यकर्म. त्यामुळे वास्तु दोष असतील तर खूप काही वाईट झाले किंवा दोष दुरुस्त केल्याने सर्व संकट हरली असे होत नाही. मग असे असताना उपाय करायचे का? हा प्रश्न उभा राहतो हे समजून घेणे आवश्यक आहे. माझे गुरू सांगतात की मागील जन्मीचे कर्म यासाठी आपण काहीच करू शकत नाही.



राहिले या जन्मीचे कर्म २५% यात ज्योतिष व वास्तू शास्त्राच्या मदतीने आपण ५०% ॲड करू शकतो व ७५% बेनिफिट घेऊ शकतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे वास्तुत ९९% नियमांचे पालन करणेही शक्य होत नाही त्यामुळे तोही अट्टाहास नसावा. दैनंदिन जीवनामध्ये काही अनावश्यक चुका टाळून सरळ सोपा उपाय करूनही आपण समाधान व आनंद मिळवू शकतो.

वास्तुशास्त्राची बेसिक चौकट म्हणजे चार दिशा उपदिशा चुंबकीय क्षेत्र व पंचतत्व यांचा शरीरातील पंचतत्व व प्रमुख ग्रंथींशी जोडला जाणारा संबंध. या शास्त्रामध्ये योगअभ्यास, ओमकार जप, ध्यान ज्याला हल्ली आपण मेडिटेशन म्हणतो याचे अनन्य साधारण महत्त्व आहे. याच्या सातत्यपूर्ण अभ्यासातून आपण शरीरातील पंचतत्व वास्तूतील पंचतत्त्व यांचा बॅलन्स साधू शकतो त्यामुळे शारीरिक व मानसिक व्याधी, आर्थिक अडचणी, तसेच वास्तू दोषांवर मात करणे सहज शक्य होते.

पूर्व ही प्रकाशाची पॉझिटिव्ह एनर्जी ची दिशा मानली जाते त्यामुळे जास्तीत जास्त कामे पूर्वेला तोंड करून करण्यात यावीत. आपल्या शरीराची पुढची बाजू ही नॅचरल साऊथ पोल मानली जाते त्यामुळे साऊथ म्हणजे दक्षिण दिशेला तोंड करून बसल्याने रिपलशन घडून येते आणि शरीरातील एनर्जी ड्रेन होतात. तेंव्हा दक्षिणेला तोंड करुन कोणतेही काम करणे टाळावे. मात्र हे झाले नाही तर फार मोठे नुकसान होईल किंवा काही अनर्थ होईल असे नाही. जे शक्य आहे ते प्रयत्नपूर्वक जरूर करा, अतिशयोक्ती नको. पूर्वीच्या काळी उंबऱ्यावर बसू नये असा प्रघात होता. यासाठी माझी आजी मला नेहमी रागवायची. हे का तर उंबरा आणि चौकट यात एक विशिष्ट चुंबकीय तत्त्व सतत कार्यरत असते ज्याला वैज्ञांनीक भाषेत इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड म्हणतात. उंबऱ्यावर बसल्याने

ते डिस्टर्ब होते व या डिस्टर्ब इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड चा आपल्या मनावर विचारांवर निगेटिव्ह परिणाम होण्याची शक्यता असते.

भारतीय वास्तूशास्त्र हे भारताचे भौगोलिक स्थान,दिशा,विस्तार, हवामान, चुंबकीय क्षेत्र, इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड, शिल्पशास्त्र आणि जीवनपद्धती यांच्या परिपूर्ण अभ्यासातून उदयाला आले आहे. मागील काही वर्षांपूर्वी इतर देशातील शास्त्र उदाहरणार्थ चिनिशास्त्र फेंगशुई याचा प्रसार फार मोठ्या प्रमाणामध्ये पाहायला मिळाला. ते खोटे निश्चितच नाही मात्र ते त्या देशाच्या भौगोलिक परिस्थितीला अनुसरून डिझाईन केले गेलेले असते. जवळपास ६० ते ७० टक्के घरांमध्ये सुंदर मधुर आवाज निर्माण करणारे आकर्षक wind chimes लटकवलेले पाहायला मिळतात. हे फेंगशुई च देण आहे. याचा उद्देश एकच याच्या लहरीमधून घरामध्ये पॉझिटिव्ह वातावरण टिकून राहणे आणि निगेटिव्हिटी निघून जाणे. आपल्या संस्कृतीने लिहिली आहे मी आपल्या देव्हाऱ्यातील घंटी दिवसातून दोन वेळा दिवाबत्ती करताना घरामध्ये सगळीकडे अगदी कानाकोपऱ्यात देखील तिचा नाद करून सोबत कापूर जाळावा. किती प्रसन्न उत्साही वाटते.

घरात लावलेली तुळस जिचे आयुर्वेदातही अनन्य साधारण महत्व आहे वास्तुशास्त्रातील अनेक दोषांचे निराकरण करते मात्र अनेक आधुनिक घरांमध्ये तुळस नसली तरी बांबू प्लांट मात्र नक्की पाहायला मिळेल. हे उदाहरण देण्यामागचा उद्देश केवळ एवढाच की आपल्या पूर्वजांनी जतन करून आपल्यापर्यंत पोचवला हा ठेवा केवळ ते जुन म्हणून सोडून देणं योग्य नाही. आणि इतर संस्कृतीतील अशा गोष्टी ज्यांचे पुर्ण ज्ञानही नाही त्यांना डोळे झाकून स्वीकारणे कितपत योग्य आहे एकदा भारतीय वास्तुशास्त्र कडे देखील अंधश्रद्धेची झापडं दूर करून डोळसपणे पाहण्याची गरज आहे. वैज्ञानिक आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून वास्तुशास्त्राचे अध्ययन करून त्याचे योग्य व्यक्तीच्या समुपदेशकांच्या मार्गदर्शनाखाली अवलंबन केले तर सामान्य माणसाला त्याचा वैयक्तिक व सामाजिक आयुष्यात निश्चितच उपयोग होईल.



### विनोद

**पर्याय दोनच**

**पती: तू तर म्हणाली होतीस रात्रीच्या जेवणात दोन options आहेत म्हणून, इथं तर एकच भाजी दिसतेय . . .**

**पत्नी: शांतपणे, पर्याय दोनच आहेत?**

**१.खायचं असेल तर खा,**

**२.नाहीतर बोंबलत जा !!!**

With best
compliments from

TRU
DECOR

# सावधान
# घरे अबोल होतायत

**- वंदना मत्रे**

आपल्या देशाची आणि राज्याची परंपराच एकत्र कुटुंब पद्धती आहे. एकत्र कुटुंब पद्धतीतून नेहमीच आपली संस्कृती आणि संस्कार जपले गेले. पिढ्यानपिढ्या चालत आलेली ही परंपरा सुद्धा विकासाच्या नावाखाली स्वतःच्या मातीपासून दूर होत चालली आहे.

आर्थिक विकास व्हावा म्हणून मराठी माणूस काय किंवा इतर जातीचा माणूस काय स्वतःच्या मातीपासून मुंबईसारख्या आर्थिक उलाढाली होणाऱ्या मायावी शहरात स्थायिक झाला. खरतर इथेच त्याच्या कुटुंबाचे दोन भाग पडले. गावी एक कुटुंब आणि मुंबईत एक कुटुंब. भाग पडले की तिथे तुझ माझ आलंच. माणूस जेवढे लागेल तेवढे न कमवता हव्यासापोटी अतिप्रमाणात कष्ट करून कमवू लागला. मुंबईच्या राहणीमानात पूर्णपणे रुजू झाला. वाढत्या शिक्षणाबरोबर यंत्र तंत्र सुद्धा वाढू लागली. नोकरीसाठी पुरुषांबरोबर आता स्त्री सुद्धा बाहेर पडू लागली. उशिरा रात्री घरी येणे या कारणाने घरातल्या किचनची जागा आजी, आई किंवा बायको यांच्या व्यतिरिक्त कामवाल्या बाईने घेतली आहे.

**आपल्या भारतीय संस्कृती मध्ये वास्तुशास्त्राला महत्वाचे स्थान आहे. ह्या अशा आनंदी वातावरणामुळे आपल्या वास्तुतला वास्तुपुरुष देखील ह्या अशा दिवशी दिलखुलासपणे जगतो.**

त्यामुळे तिने जे बनवले आहे ते गुपचूप खायचे आणि झोपायचे. त्यामुळे आईच्या, आजीच्या हातच्या जेवणाच्या मेजवानीचा आस्वाद एक-मेकांची टिंगल-टवाळी करत एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये आता घेताना कुठेही दिसत नाही. आणि जर कुठे दिसले तर ते खूप विशेष मानले जाते.

घरी सांभाळण्यासाठी कोणीही नसल्याकारणाने आजी-आजोबा वृद्धाश्रमात, मुलगा- मुलगी- सून ऑफिसमध्ये आणि मुले टीव्ही किंवा मोबाईल मध्ये गुंतलेली असतात.किंवा वृद्ध मंडळी भारतात असतात आणि तरुण मंडळी नोकरीसाठी परदेशात हे तरी चित्र पाहायला मिळते.

आजी-आजोबांची पाखरण, संस्कार नसल्याकारणाने वयात आलेली मुले स्वतःचे मन आई-वडिलांसोबत मोकळे करू शकत नाही. नोकरी करणारी आई पुरेसा वेळ मुलांना देऊ शकत नाही. कारण आई-वडील जेव्हा घरी येतात तेव्हा ते शरीराने आणि मनाने थकलेले असतात. त्यामुळे अशा मुलांच्या कोवळया वयात त्यांना घरातील प्रेम,दिलासा, आदर मिळण्याऐवजी बाहेरचे जग खुणावू लागते आणि मग ते तासनतास बाहेरच रमतात. जरी नातेवाईकांच्या घरी किंवा स्वतःच्या घरी एकत्र जेवणाचा बेत केला तरी

थोड्या वेळासाठी नातेवाईक एकमेकांमध्ये गुंतले जातात परंतु नंतर ते मोबाईल आणि टीव्ही मध्येच गुंतले जातात. तरुण मंडळी त्यांच्या तरुण मित्रांमध्येच बिझी असते. वृद्धमंडळी त्यांच्या वृद्धांमध्ये बोलत बसतात. म्हणजे जो तो ज्याच्या त्याच्या वयानुसार स्वतःचा गट बनवत असतो. परंतु असे न करता स्वतःचा मोबाईल, टीव्हीचा रिमोट बाजूला ठेवून सगळया नातेवाईकांमध्ये मिळून-मिसळुन टिंगल टवाळी करण्यात मजा असते. ती मजा काही औरच. अगदी तरूण वयापासून ते म्हाताऱ्या वयापर्यंतचे सगळे एकत्र आले की एकमेकांची मते कळतात. तरुण वर्ग अभ्यासाच्या ताणतणावाखालून मोकळा होतो. थोरामोठ्यांचे प्रेम मिळते. रागवणे सुद्धा मिळते परंतु ते प्रेमाचे.



शिवाय आपल्या भारतीय संस्कृती मध्ये वास्तुशास्त्राला महत्वाचे स्थान आहे. ह्या अशा आनंदी वातावरणामुळे आपल्या वास्तुतला वास्तुपुरुष देखील ह्या अशा दिवशी दिलखुलास पणे जगतो. तसे पाहायला गेले तर दगडालाही पाझर फुटतो परंतु माणसाच्या अंतरात जर प्रेम माया नसेल तर माणूस सुद्धा दगड होतो. ठिकठिकाणी हे चित्र पाहायला मिळते एकत्र मेजवानीचा बेत करायचा आणि मोबाईल मध्ये किंवा टीव्ही मध्ये गुंतून राहायचे मग ते हॉटेल असू दे किंवा घर परिस्थिती एकच दर्शवते.

मुलाला वयाची एक वर्ष होत नाही तर त्याला मोबाईल दाखवला जातो का आणि कशासाठी ? सगळे काही मोबाईल मध्ये आहे मान्य आहे परंतु त्यापेक्षा सुंदर आणि सुप्त गुणांनी भरलेले आजी-आजोबा आहेत. मुलांना देउन तर बघा त्यांच्या हाती. मुलांना कल्पवृक्षाची सावली मिळेल. घराचे नंदनवन होईल.

मनाला प्रसन्न करणारे भजन, भारुड, ओव्या, टाळमृदुंगाचे आवाज, अगरबत्ती धुपाचा सुवासिक वास येऊ द्या देवघरातून आणि दरवळू द्या घराच्या कानाकोपऱ्यातून. परंतु हे असे प्रसन्न वातावरण घरात ठेवण्यासाठी थोरामोठ्यांना वेगळे न करता सोबत घेऊन चला. त्यांच्याशी बोला, त्यांचे ऐका कारण ते बोल अनुभवाचे आहेत. प्रेमाचा , वास्तल्याचा हात फिरू द्या डोईवरून. कारण तो आशीर्वाद आहे परमेश्वराचा. घर मोठे नक्की असू द्या पण घरात एकच टीव्ही असू द्या. तो सगळयांनी सोबत टीव्ही बघा. ते घर थेटरला सुद्धा मागे सारेल.

वडीलधारी माणसे सोबत असताना मोबाईल बाजूला ठेवून त्यांच्या सहवासात जगा. कारण ते थोड्या दिवसाचे सोबती असले तरी आयुष्यभरासाठी मिळालेला अमृतमय संस्काराचा प्याला आहेत तो आवडीने प्या. हाताची सगळी बोटे सारखी नसतात. तसेच घरातील सगळयांचे स्वभाव सुद्धा सारखे नसतात. बोटे सारखी नाहीत म्हणून कोणी हात शरीरापासून काढून टाकत नाही. विभिन्न असलेल्या स्वभावाची माणसे घरात असली म्हणून विभिन्न कुटुंब पद्धती स्वीकारणे हे सुद्धा योग्य नाही. ह्या अशा कारणाने आज कालची घर अबोल

होत चालली आहेत. घरात कुणीही नसेल तर घरामध्ये बोलण्याचा, हसण्याचा, मोकळे पणाने खिदळण्याचा आवाज तरी कसा गुंजेल. आणि असले घरांमध्ये सगळेजण एकत्र तरीही कुणी कोणाशीही बोलणे नाही हे कितपत योग्य आहे हे ज्याने त्याने विचार करून ठरवण्यात योग्य आहे. जे चुकतील त्यांना समजावून सांगा. जे आपल्यापासुन मोठे आहेत त्यांचे अनुभव घ्या. वडीलधाऱ्या माणसांशी प्रेमाने आणि आदराने बोला. सगळयांची सोबत हेच त्यांना उतरत्या वयामध्ये पाहिजे असते.

बाहेरून घरी जाताना घरी कोणीच नाही ही दु:खद जाणीव अनुभवण्यापेक्षा घरी आपली कोणीतरी वाट पाहत आहे ही सुखद जाणीव अनुभवणे. म्हणजे चांगले नशीबच. जग सुधारले जग सुधारले म्हणजे काय हो नीट अजून खाता येत नाही त्यांच्या हातात मोबाईल. त्यांना सांभाळण्यासाठी बाई ठेवायची. आई-वडिलांनी ऑफिस मध्ये जायचे. वडीलधारी माणसे वृद्धाश्रमात. रात्री बारा वाजता घरी यायचे आणि दिवसभर घराला कुलूप आणि म्हणायचे आम्ही सुधारलो.

अरे जग तर तेव्हा सुधारेल,घरात माणसांची, नातेवाईकांची, लहान मोठ्या बाळांची, वडीलधाऱ्या माणसांची ये-जा होईल. बस - ऊठ होईल. संस्कृती जपली जाईल. त्यांचा आदर केला जाईल. त्यांचे संस्कार राखले जातील आणि त्या घराला प्रेमाचा वास येईल. तेव्हा त्या घराचा अबोलपणा निघून जाऊन घर खऱ्या अर्थाने बोलके होईल. मग कुणी आपल्याला सावधान करण्याची गरज भासणार नाही.

## ❁ आरसा ❁



*१) आरशाचा विचार केला तर आपल्या घरात आरसा कुठेही लावला नाही पाहिजे. जर आरसा असेल तर त्याला पडदा लावला पाहिजे, कारण आरशात नेहमी बाहेरचे प्रतिबिंब पडतच असतात, आणि ते प्रतिबिंब पॉझिटिव्ह व निगेटिव्ह असू शकतात.*

*२) ज्या ठिकाणी तुम्ही आरसा लावला असेल तेथे त्या आरशातून बघणे की बाहेरच प्रतिबिंब पडतं का नाही, जर पडत असेल तर तेथून आरसा काढून टाकणे.*

*३) आरसा हा नेहमी बंद असावा, कारण तो जर ओपन असेल तर सर्व प्रतिबिंब तो खेचत असतो, तेही डबल वेगाने आपल्यावर टाकत असतो.*

*४) आरशाचा महत्त्वाचा गुणधर्म आहे की आलेली वस्तू फेकून देणे, हे त्याचं कामच आहे आणि म्हणून आरसा नको, कारण आरसा खूप निगेटिव्ह आहे.*

*५) आरशाला भारतीय वास्तुशास्त्रात प्रवेश नाही.*

*दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !*



# एम.आय

# कन्ट्रकशन



# देव!

-प्रा.अरुण पाटील

'देव' या संकल्पनेबद्दल बऱ्याच वेळा काही प्रश्न उपस्थित केले जातात. 'देव' या संकल्पनेबद्दल खूप मतमतांतरे आहेत. कुठलंही मत मान्य नसलं तरी त्याबद्दल परम सहिष्णुता ठेवून आदर असावा.

मी माझ्या अल्प बुद्धीनुसार काही विचार मांडत आहे. सर्व वाचकांना नम्र विनंती की, हे माझे वैयक्तिक विचार आहेत. कुणाच्याही विचारांचा अनादर करण्याचा माझा मुळीच उद्देश नाही. माझे विचार कुणाला पटतील किंवा कुणाला पटणारही नाहीत. ते सगळ्यांना पटावे हा माझा आग्रह ही नाही. मी स्वत:शीच केलेलं हे विचारमंथन आहे. ते तुमच्यापुढे मांडतो. पटलं तर घ्यावं नाहीतर सोडून द्यावं.

**पुण्य केल्याने स्वर्ग मिळतो व पाप केल्याने नरकात जावं लागतं ही अस्तिकवादातील कल्पना माणसाला त्याच्या प्राप्त आयुष्यात चांगलं वागण्याची प्रेरणा देते. तसंच मेल्यानंतरही आयुष्य संपत नाही.**

**आस्तिकवादी विचार**

माझ्या मते माणूस देवनिर्मित नसून देव मानवनिर्मित आहे. मानवाला सुचलेली सर्वात सुंदर व उपयुक्त कल्पना म्हणजे देव! 'देव' या कल्पनेचा विचार करण्याआधी आपण 'धर्म' या संकल्पनेचा विचार करूया. कारण त्यातूनच पुढे 'देव' या संकल्पनेचा विचार आला असावा.

आदिकाळात सुरुवातीला रानटी अवस्थेत माणूस भटक्या होता. स्वत:चं पोट भरणं आणि स्वसंरक्षण करणं या त्याच्या प्राथमिक गरजा होत्या. हे करत असतांना निसर्गतः वंशसातत्य घडून येत होतं. नंतर शेतीचा शोध लागल्यावर माणसाचा भटकेपणा जाऊन तो एका ठिकाणी स्थिर झाला. एका ठिकाणी स्थिर झाल्यावर समाजाची निर्मिती झाली. कारण त्याच्या लक्षात आलं की, एकट्यानं राहण्यापेक्षा समुदायात म्हणजेच समाजात राहण्यानं पोट भरणं आणि संरक्षण करणं म्हणजेच जिवंत राहणं जास्त सोपं जातं. तसंच कामाची विभागणी करून सर्व कामं एकट्यानंच करण्यापेक्षा विशिष्ट काळात विशिष्ट गटानं केल्यास ते जास्त कुशलतेनं होऊ शकतं. परंतु एकत्र राहिल्यानं अनेक प्रश्न निर्माण झाले. एकाच ठिकाणी राहिल्यानं वंशवृद्धीच्या हेतूनं कुटुंबव्यवस्था निर्माण झाली. नंतर शेती व स्त्री वरून मालकी हक्काची भावना निर्माण झाली. हक्क व कर्तव्याच्या परस्परविरोधी जाणिवांमुळे समाजात गोंधळ निर्माण झाला. कारण माणसाला हक्क तर हवे असतात पण दुसऱ्यासाठी स्वत:हून काही करण्याची भावना मूलभूत नसते. म्हणून मग समाज धरून ठेवण्यासाठी 'धर्म' या संकल्पनेचा उदय झाला. समाजातील श्रेष्ठ विचारवंतांनी एकत्र

येऊन समाजात वागण्याचे नियम तयार केले. तेच म्हणजे धर्म. सगळया समाजासाठी चांगलं काम ते धर्म व समाजासाठी वाईट काम ते अधर्म. यालाच आपण धर्म म्हणजे पुण्य किंवा नीती व अधर्म म्हणजे पाप किंवा अनीती असेही म्हणतो. सर्वांनीच पुण्याचं काम करावं असं जरी अपेक्षित असलं तरी व्यक्ती तेवढ्या प्रकृती या न्यायाने समाजात पाप करणारे सुद्धा असतातच. धर्माने जरी नीतीने वागणुकीचे नियम करून दिले असले तरी ते समाजातील सर्व लोक पाळतीलच असे म्हणता येत नाही. त्यांच्यावर वचक असावा म्हणून 'देव' या कल्पनेचा बागुलबुवा निर्माण केला गेला असावा. आपण काय करतो हे देव बघत असतो व आपल्या पापपुण्याची नोंद ठेवत असतो, त्याप्रमाणे आपल्याला फळ मिळतं असं धर्मात सांगितलं गेलं. थोडक्यात माणसानं नीतीने वागावं यासाठी देवाची भीती दाखविली गेली. म्हणून मग तो प्रसन्न व्हावा व आपल्याला चांगलं फळ मिळावं म्हणून त्याची पूजाअर्चा करण्यासाठी कल्पनेतला अमूर्त देव मूर्तीरुपात अवतरला. त्याची मंदिरं झाली. निसर्गातील ज्या ज्या गोष्टी त्यावेळी अगम्य वाटत होत्या त्यांचा आपल्यावर कोप होऊ नये या भीतीपोटी त्यांना देवपण देण्यात आलं असावं. उदा. सूर्यदेव, पावसाचा देव म्हणजे इंद्र वगैरे वगैरे.



वेगवेगळे समाज भौगोलिकदृष्टया एकत्र येऊन त्यांच्या भौगोलिक व सामाजिक परिस्थितीनुसार वेगवेगळे धर्म निर्माण झाले. सर्व धर्मांचे अंतिम ध्येय एकच असले तरी त्यांच्या नीतिनियमात फरक आढळुन येतात. परिस्थितीनुसार व काळानुसार त्यात बदल होत जाणं हे त्या समाजाच्या प्रगतीचं लक्षण असतं. परंतु एका धर्मातील नीतीचे नियम दुसऱ्या धर्मात अनीतीचे ठरु शकतात. किंवा काळानुसार नीती-अनीतीच्या कल्पनाही बदलू शकतात. शेवटी, समाज धारण करतो तो धर्म! मानवसमाज एका ठिकाणी समुदायाने राहायला लागल्यावर वंशसातत्य व वंशवृद्धीसाठी स्त्रियांवरील मालकीवरून वाद निर्माण झाले. रानटी अवस्थेत कदाचित स्त्री आणि पुरुष हेच नातं असावं. आतासारखी नाती नसावीत. त्यामुळे रानटी अवस्थेत स्त्री-पुरुष संबंध अनिर्बंध व बळी तो कान पिळी या नियमानुसार असावेत. पण समाजात एकत्र राहायचं ठरवल्यानंतर त्यावर बंधनं आलीत. त्याकरिता स्त्री-पुरुष संबंधांचे उदात्तीकरण होऊन लग्न ही संस्था अस्तित्वात आली. पण धर्मानुसार त्यातही फरक आहेत.

हिंदू धर्मात चुलत बहीण-भावांचे विवाह निषिद्ध आहेत. तर इतर काही धर्मात त्याला मान्यता आहे. अर्थात हा त्या त्या धर्माचा प्रश्न आहे. आपल्या आईवडिलांच्या काळात स्त्री-पुरुषांनी सर्वांच्यासमोर

बोलणं देखील अनैतिक समजलं जात होतं. आता स्त्रीपुरुष दोघं खांद्याला खांदा लावून एकत्र काम करतात, वावरतात कारण काळाची ती गरज आहे.

**आस्तिकवादी विचारांचा चांगुलपणा**

आस्तिकवादाचा पूर्ण डोलारा हा देव या संकल्पनेवर आधारित आहे. देव ही जरी कल्पना असली तरी या काल्पनिक विचारावर जगाचा केवढा मोठा डोलारा उभा आहे. धार्मिक ग्रंथ, वेद, पुराणं इतर साहित्य, धार्मिक संस्था, प्रार्थनास्थळ त्यांचा कारभार, पूजाअर्चा, तीर्थयात्रा वगैरे वगैरे. देव या कल्पनेवर जगात किती अवाढव्य व्यवहार होतात! कुठल्याही एका मंदिराचे उदाहरण आपण घेतलं तरी ते आपल्या लक्षात येईल. तिरुपती बालाजी, शिर्डीचे साईबाबा, कोल्हापूरची महालक्ष्मी, पंढरपूरचे विठ्ठल मंदिर अशी कितीतरी उदाहरणं देता येतील. मध्यंतरी आलेल्या 'देऊळ' या सिनेमात समाजातील लोकांचे आर्थिक आणि राजकीय हितसंबंध देवळाभोवती कसे गुंतलेले असतात हे खूप सुंदररित्या दाखविलेले आहे.



जगातील लाखो लोकांचं आयुष्य देवाच्या भरोश्यावर चालू असतं. देव आपल्या पाठीशी आहे. तो आपलं भलं करील हा भावनिक आधार संकटाच्या वेळी माणसाला लढायचं बळ देतो. म्हणूनच देव ही जरी कल्पना असली तरी ती अस्तिकवादी माणसाला खूपच उपयुक्त आणि जगण्याला आधार देणारी ठरते. त्यामुळे देव नाही असं म्हणून या अस्तित्ववादी लोकांच्या जीवनाचा भावनिक आधार आपण काढून घेऊ नये असं मला वाटतं. एखादी गोष्ट काल्पनिक असेल, त्यामुळे कुणाचं नुकसान न होता कुणाचा फायदाच होणार असेल, तर ती गोष्ट चांगली समजली पाहिजे. अज्ञानात कोणाला सुख मिळत असेल तर आपण का हिरावून घ्यावं.

देव या कल्पनेचा आणखीन एक फायदा असा की, पापभीरूपणामुळे समाजातील वाईट कृत्यांना थोडाफार का होईना आळा बसतो. आयुष्यातील अनेक वाईट गोष्टींची माणसाच्या मनात भीती उत्पन्न झाली, चांगलं वागण्याची त्याला प्रेरणा मिळाली.


**पुनर्जन्म व मरणोत्तर आयुष्य**

पुण्य केल्याने स्वर्ग मिळतो व पाप केल्याने नरकात जावं लागतं ही अस्तिकवादातील कल्पना माणसाला त्याच्या प्राप्त आयुष्यात चांगलं वागण्याची प्रेरणा देते. तसंच मेल्यानंतरही आयुष्य संपत नाही. या विचाराने सुद्धा मरणाची भीती कमी होते. पुनर्जन्माचंही तसंच आहे. मेल्यावर आपलं अस्तित्व संपतं असं नव्हे तर पुन्हा आपला पुनर्जन्म होऊ शकतो, या भावनेनंही मरणाची भीती कमी होते. तसंच चांगलं वागलं तर पुढचा जन्म चांगला मिळतो या आस्तिकवादातील विचाराने

चांगलं वागण्याची प्रेरणा मिळते.

**आस्तिकवादी विचाराचा चुकीचा अर्थ. .....**

आस्तिकवादात एक विचार आहे की आपलं आयुष्य हे देवानं पूर्वनियोजित केलेलं असतं त्याप्रमाणेच ते घडतं. आपण फक्त कठपुतली आहोत. दोऱ्या मात्र त्याच्या हातात असतात. तसं असेल तर मग आपण जगण्यासाठी काही करायची जरूरीच नाही. असा निष्क्रियतावादी विचार माणसाच्या मनात येऊ शकतो. परंतु अस्तिकवादातील हा विचारच चुकीचा आहे. असं मला वाटतं. परमेश्वर तुमचं आयुष्य घडवत नाही. तुमचं विहित कर्म तुम्ही केलंच पाहिजे. तुमच्या आयुष्याचे शिल्पकार तुम्हीच असता. परमेश्वर तुम्हाला कर्म करण्याची संधी निर्माण करून देतो. हातपाय तुम्हीच हलवायचे असतात. चांगल्या मार्गानं जायचं की वाईट हे तुमचं तुम्ही ठरवायचं असतं. हे मात्र परमेश्वर वरून बघत असतो. म्हणजे देव तुमच्याकडून कार्य घडवून आणतो. ते कसं घडवायचं हे तुम्ही ठरवायचं.



काहीजण विचारतात की, धर्मग्रंथ व धर्माचे अनुयायी म्हणतात की ईश्वर सर्वेसर्वा आहे, सर्व चांगल्या वाईट गोष्टींना तोच जबाबदार आहे. तर मग स्त्रियांवर बलात्कार, निष्पाप लोकांच्या हत्या, भूकबळी, दुष्काळ, हिटलर, स्टॅलिन व माओ यांनी केलेले निष्पाप लोकांचे हत्याकांड हे सगळ परमेश्वराच्या संमतीनंच घडतं का ? या बद्दल बोलायचं तर धर्मग्रंथ व धर्माचे अनुयायी यांचे विचार आणि त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे अस्तित्ववादी विचारानुसारच असतात. म्हणूनच ते म्हणतात की देव सर्वेसर्वा असतो. खरं म्हणजे, धर्मश्रेष्ठांनी स्वतःच्या स्वार्थासाठी देवाचं अवास्तव स्तोम माजविलेलं दिसतं. म्हणजे पर्यायानं धर्मश्रेष्ठांनाच महत्त्व येतं. देव तर अशी कोणी व्यक्ती नाही. हे म्हणजेच देव, फार तर देवाचे प्रतिनिधी. ते म्हणतील तेच देव म्हणतो. त्यामुळे देवाशिवाय पानही हलत नाही हे म्हणणं बरोबर नाही. अगदी आस्तिकवादाच्या दृष्टीने विचार केला तरीही. गीतेमध्ये श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलं आहे की, युद्ध करणं हे तुझं विहित कर्तव्य आहे. अर्जुना ऐवजी कृष्णाने युद्ध केलं नाही. ते अर्जुनालाच करावं लागलं. अर्जुनाच्या कृत्याचे फायदे तोटे हे फक्त श्रीकृष्णाने अर्जुनाला समजावून सांगितले व निर्णय त्याच्यावरच सोपवला.


थोडक्यात आयुष्याच्या परीक्षेची प्रश्नपत्रिका परमेश्वर देतो. उत्तरं तुम्हीच शोधायची असतात. त्यावरून परमेश्वर तुम्हाला पापाचे किंवा पुण्याचे गुण देतो. ते तुमच्या खात्यात जमा होतात.

**आस्तिकवादी विचारांचा फोलपणा**

समाजात वावरताना आपण बघतो की, सत्ता आणि मत्तेने धुंद झालेले दुष्ट लोक कितीही दुष्टपणानं वागले तरी त्यांचं वाईट झालेलं दिसत नाही. उलट भरभराटच झालेली दिसते. न्याय सुद्धा सत्तेने दडपता येतो किंवा

पैशाने विकत घेता येतो.

तसेच दुष्ट लोक कितीही चांगले वागले तरी, त्यांचं वाईट होत नसेल कदाचित, पण फारसं चांगलं झालेलंही दिसत नाही. मग देव कुठे जातो? त्याला हे दिसत नाही का? काही पापभिरू माणसं म्हणतील एखाद्या दुष्टाने गरीबाचा खून केला म्हणून त्याचा तरुण मुलगा मेला. देवाने त्याला शिक्षा केली. परंतु ही तर निसर्गात घडणारी नेहमीची क्रिया आहे. कुणीतरी कधीतरी मरणारच! असा तरुण मुलगा एखाद्या पुण्यवंताचाही मरू शकतो. म्हणजे एखाद्या घटनेचा अर्थ आपण आपल्या वृत्तीनुसार लावू शकतो. अर्धा प्याला भरलेला म्हणायचा की अर्धा प्याला रिकामा, त्याप्रमाणे.



जम्मूकाश्मीर मधील बकरवाल समाजातील ८ वर्षीय असिफाचे बलात्कार प्रकरण आपल्याला माहीत असेलच. मंदिरात देवाच्या मूर्तीसमोर पोलिसांसह ६ नरपशूंनी ८ दिवस तिच्यावर अमानुष बलात्कार केल्यानंतर तिला दगडांनी ठेचून मारलं आणि जंगलात फेकून दिलं असल्याचं १८ जानेवारी २०१८ ला आढळलं होतं. देवाच्या डोळयासमोर बलात्कार होत असतांना देव का झोपलेला होता? खरं म्हणजे, आस्तिकवाद्यांच्या दृष्टीने त्या दगडात देवाचा भाव असतो.म्हणून त्यांना असा प्रश्न पडतो. परंतु बलात्काऱ्यांच्या दृष्टीने ती मूर्ती म्हणजे एक दगडच! ते निंदनीय कृत्य करण्यासाठी तो दगडाचा फक्त एक आडोसा! आणि तेच खरं आहे. नाही तर देवाने तिथेच बलात्काऱ्यांचा जीव घेऊन त्या बालिकेला वाचवलं असतं. पण, असं झालं नाही आणि होतही नाही. देव ही आपली भाबडी कल्पना आहे. माणसाच्या भाबडेपणाला मर्यादा नाहीत. देव आपल्याप्रमाणे खातो म्हणून आपल्याला जे जे आवडतं त्याचा त्याला नैवेद्य! म्हणजे अगदी पंचपक्वानांपासून दारु व मटणापर्यंत! त्याला भारी भारी कपडे दागदागिने. देवाचं झोपणं, उठणं, त्याची आंघोळ यावरून हेच दिसतं की हे सर्व काही माणसानंच ठरवलं आहे.

दुसरी गोष्ट नवसाबद्दल. एखादं काम होण्यासाठी नवसाची लालाचा (मानाचा स्वभावानुसारच) दाखविली जाते. एखादी गोष्ट होईल किंवा होणार नाही अशा फक्त दोनच शक्यता असतात. म्हणजेच ५०-५० टक्के संधी. काहीही होऊ शकतं. काम नाही झालं तर त्याबद्दल कुणी एका शब्दानं ही बोलत नाही. पण झालं तर मात्र देव पावला म्हणून गवगवा. देवाला बक्षीस, लोकांना जेवण आणि काय काय. काम झालं म्हणून तो देव जागृत ठरतो. काम नाही झालं म्हणजे तेव्हा का देव झोपला होता? त्याचं उत्तर मात्र कुणीही देत नाही.

असो! देव ही जरी कल्पना असली तरी ती समाजाच्या भल्यासाठी आहे. जनतेच्या देवभोळया भक्तीचा गैरफायदा घेऊन तिची लूट करू नये, व्यापार

होऊ नये हीच अपेक्षा! देव खोटा असला तरी त्यामुळे मिळणारा मानसिक आधार खरा असतो. हा अधिकार काढून घेण्याचा कुणालाही अधिकार नाही.

**नास्तिकवादी विचार**

देव आहे की नाही हे मानणं हे ज्याच्या त्याच्या वैचारिक कुवतीवर व भावनांवर अवलंबून असतं. एखाद्या देवभोळया माणसानं जर मला विचारलं की देव असतो का? तर मी सांगेन की हो देव असतो. देव ही कल्पना आहे, हे त्याला कितीही प्रकारे समजावून सांगितलं तरी ते त्याला पटणार नाही. आणि पटलं तरी फायद्यापेक्षा त्याचं नुकसानच होण्याची जास्त शक्यता आहे. भावनिकदृष्टया तो पांगळा होईल.



परंतु हाच प्रश्न मला एखाद्या तकर्निष्ठ विचार करणाऱ्या बुद्धिनिष्ठ माणसाने विचारला तर मी सांगेन, देव नसतो. कारण देव ही एक कल्पना आहे हा विचार त्याला पटू शकतो. तेवढी त्याची वैचारिक कुवत असते. हा विचार पटल्याने त्याचा फायदाच होईल. कारण प्रत्येक गोष्ट मग तो बुद्धीच्या कसोटीवर पारखून घेऊनच स्वीकारील व खोट्या कल्पनांच्या आहारी जाणार नाही.

नास्तिकवादी विचारानुसार देव अस्तित्वात नाही. कारण त्याचं अस्तित्व कुठेच जाणवत नाही. तो पाप्यांना शिक्षा देत नाही किंवा पुण्यवंतांना बक्षीस देत नाही. उघड्या डोळयांनी तो अन्याय, अत्याचार बघतो. देव अस्तित्वात असता तर त्यानं हे सहन केलं असतं का?

एखाद्याचं शारीरिक किंवा मानसिकदृष्टया नुकसान करणं म्हणजे पाप आणि त्याच्या उलट म्हणजे पुण्य! अशी पाप-पुण्याची साधी सोपी व्याख्या आपल्याला करता येईल. पाप्यांना शासनव्यवस्था व न्यायव्यवस्था शिक्षा करू शकतात. देव शिक्षा करतो असं म्हणणं काही पटणारं नाही.

फार तर आपण म्हणू या की निसर्ग म्हणजेच देव. मनुष्यप्राणी हा निसर्गाचाच एक घटक आहे. आणि म्हणूनच आपण कदाचित म्हणत असू की, प्रत्येक प्राण्यात ईश्वराचा अंश असतो. निसगर्नियमानुसार हे सृष्टीचक्र चालत असतं. निसर्गात माणसासहित प्रत्येक घटकाचं जीवितकार्य हेच आहे की, हे सृष्टीचक्र चालण्यासाठी व ते जास्तीत जास्त उन्नत करण्यासाठी प्रयत्न करणं आणि हे आपलं विहित कार्य झाल्यावर बाजूला होणं. ज्या पंचतत्वातून आपली निर्मिती झाली आहे त्या पंचतत्वातच विलीन होणं. मेल्यावर सजीव सजीव संपतो का? तर नाही. आपल्या पुढच्या पिढीच्या रूपानं आपण मेल्यानंतरही अस्तित्वात राहतो. या निष्प्राण शरीराचा निसर्गाला उपयोग नसतो. ते निसर्गात विलीन होतं.

निसर्गातील प्रत्येक घटनेमागे कार्यकारणसंबंध असतो. म्हणजे प्रत्येक कार्यामागे काहीतरी कारण व

उद्देश असतोच. तसंच कार्य होतांना कार्य करणारा व ज्याच्यावर कार्य होतं.

तो असे दोन घटक असतात. कार्य करणारी एक व्यक्ती किंवा समुदाय असेल. तसंच ज्याच्यावर कार्य घडतं तीही एक व्यक्ती किंवा समुदाय असू शकतो. होणाऱ्या घटनेचे चांगले-वाईट परिणाम मात्र दोघांनाही भोगावे लागतात. थोडक्यात आपणच आपलं भाग्य ठरवत असतो. व चांगल्या-वाईट कृत्याला आपणच जबाबदार असतो. व्यक्ती तेवढ्या प्रकृती या न्यायानं व परिस्थितीमुळे चांगले वाईट असे दोन्ही प्रकारचे लोक समाजात असतात. आपापल्या वृत्तीनुसार ते चांगलं वा वाईट कार्य करत असतात. उदा. स्त्रियांवर बलात्कार, निष्पाप लोकांच्या हत्या, भूकबळी, दुष्काळ, हिटलर, स्टॅलिन व माओ यांनी केलेले निष्पाप लोकांचे हत्याकांड सगळया गोष्टींमागे निसर्ग नियमानुसार कार्यकारण संबंध आहे व त्या गोष्टी मानवनिर्मितच आहेत. या प्रत्येक घटनांमधील कार्यकारणसंबंधांचा उहापोह करता येईल. पण विस्तारभयास्तव तो टाळला आहे. यातील खून, बलात्कार या घटनांविरुद्ध कायदे आहेत. पण त्यातून न्याय मिळेलच याची खात्री नाही. तसेच भूकबळी, दुष्काळ याला बरीचशी आपली सडलेली व लाचखोर शासन व यंत्रणा जबाबदार आहे. हुकुमशहांचा वैयक्तिक स्वार्थ, अहंपणा युद्ध आणि हत्याकांड यांना जबाबदार आहे. म्हणजे सरते शेवटी या सगळयांना माणूसच जबाबदार आहे ना ?

**आस्तिक की नास्तिक?**

देवाचं अस्तित्व जरी मी मानत नसलो तरी देव ही कल्पना अस्तित्वात असावी असं मला नक्कीच वाटतं. त्यादृष्टीने नास्तिकवादी असलो तरी मी मंदिरात जावं लागलं तर नाकारणार नाही. देवाच्या मूर्तीलाही मी कधी तरी नमस्कार करीन. तसे देवाचे सणही मी साजरे करतो. कारण तसं केल्यानं माझ्या जवळच्या लोकांना आनंद होणार असेल आणि तसं वागण्यानं माझं काही नुकसान होणार नसेल तर असं वागायला मला वावगं वाटत नाही. शेवटी हा भावनेचा प्रश्न आहे. कुणी मानावा, कुणी मानू नये. आस्तिकवादाचा आणि नास्तिकवादाचा समन्वय साधायचा म्हटला तर मनात देव आणि हातात कर्तृत्व असावं.

समारोप करतांना पुन्हा एकदा सांगतो की हे माझे वैयक्तिक विचार आहेत. पटले तर घ्यावे नाहीतर सोडून द्यावे

## टिप्स



१. वाढत्या तापमानात केसांना तेलाऐवजी हेअर सिरम लावावं. हे कमी तेलकट असल्यामुळे केस कोमेजत नाहीत.

२. घरातून बाहेर पडताना केस स्कार्फ, टोपी किंवा स्टोलने झाकून घ्यावेत.


३. केस रंगवताना अमोनिया फ्री हेअर कलरचा वापर करावा. त्यामुळे केसांना पोषण मिळून उन्हाच्या दुष्परिणामांपासूनही बचाव होतो.

४. उन्हाळ्याच्या हवामानानुसार हेअर स्टाईल करावी. केसांची वेणी घालावी किंवा हलके वर बांधावेत.

५. केस घट्ट बांधणं टाळावं. यामुळे केस खराब होऊ शकतात आणि केसगळतीची शक्यताही वाढते.

# With best compliments from

# OM SIDDHI



construction

# वास्तुशास्त्र व अंतर्गत सजावट

–अश्विनी जाधव

'वास्तुशास्त्र' चौसष्ट कलांपैकी हे एक असून शास्त्र म्हणून ते प्राचीन काळापासून विकसित झाले आहे. या प्राचीन संस्कृती द्वारे आपल्या पूर्वजांनी वास्तू कलेचे उत्तम नमुने जगापुढे सादर केले आहेत.

या काळी वेदांमध्ये ऋषी मुनींनी या निसर्गाची विविध रुपे अभ्यासली आणि त्यांची साधना केली व त्या साधनेचे फळ म्हणजे वास्तू,योग, ज्योतिष, संगित आणि आयुर्वेद ही पंचमहाशास्त्रे होत. ह्या पंचमहाशास्त्रातील एक शास्त्र म्हणजे वास्तुशास्त्र.

पंचमहाभुते, अष्टदिशा पृथ्वीच्या विद्युत चुंबकीय लहरी, परग्रहावरून येणारी वैश्विक उर्जा यांचे संतुलीत समिकरण तयार करून वास्तू निर्मीती करण्याच्या शास्त्राला वास्तूशास्त्र म्हणतात.

सृष्टीतील प्रत्येक वस्तू, पदार्थ, मनुष्य, प्राणी इ. सर्व पंचमहाभूतांपासून बनलेली आहेत. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते मनुष्याशी व त्याच्या पर्यावरणाशी अत्यंत निकटचे संबंध दर्शवितात. या पंचमहाभुतांना त्यांच्या योग्यतेनुसार निसर्गाने विशिष्ट स्थान दिलेली आहेत. योग्य स्थानी वास्तूमध्ये या पंचमहाभूतांना स्थान दिले गेल्यास आपण निसर्गाशी एकरुप होतो.

तसेच सृष्टीच्या आरंभ काळात तेथे उत्पन्न होणाऱ्या प्राण्यांना कसलाच आधार नव्हता. त्यांना आधार देण्यासाठी देवाने संकल्पना करून दिशांची निर्मिती केली असे वराहपूराणात २१व्या अध्यायात दिशांच्या उत्पत्तीची कथा आहे. देवांनी केलेल्या संकल्पातून दहा तेजस्वी कन्या उत्पन्न झाल्या. पूर्वा, दक्षिणा, पश्चिमा, उत्तरा, उर्ध्वा, व अधरा या मुख्य कन्या मानल्या गेल्या तर अग्नीये, वायव्यी, नैऋति, ईशान्य या उपकन्या मानल्या गेल्या. या दहा कन्यांना देवांनी पतीसमेत राहण्याची आज्ञा दिली व अधिपत्य देण्याची आज्ञा दिली.

**माणूस हा आधूनिक बनत चालला आहे. पण त्याला आपले राहते घर हा जिव्हाळ्याचा विषय आहे. प्रत्येक मनुष्य आयुष्यभर आपल्या परीने कष्ट करून एकच स्वप्न पाहत असतो आणि ते म्हणजे स्वत:चे एक घर असावे. प्रत्येक मनुष्याची भावना एकच असते की आपण जिथं राहतो वस्ती करतो ती जागा म्हणजे 'वास्तु' आपल्याला लाभदायक असावी.**

मानव हा निसर्गातील एक महत्त्वाचा घटक आहे. निसर्गातील प्रत्येक घडामोडीचा त्याच्या जीवनावर कळत नकळत परिणाम होत असतो. आपल्याला उर्जा व चैतन्य सुर्यापासून मिळते. ऊर्जेच्या उत्पत्तीचे सर्वात मोठे केंद्र म्हणजेच सुर्य.

पृथ्वीच्या पोटातील चुंबकीय ऊर्जा ही सतत

पृष्ठभागावर कार्यरथ असते. त्या मध्ये सुर्याची सौर ऊर्जा व जैविक ऊर्जा यांचा संगम होतो. तर काही ठिकाणी ह्या ऊर्जा चुंबकत्व एकमेकांच्या विरोधात येतात. जैविक ऊर्जा हि विषमत्त्वात आहे. त्यांचे परिणाम विषमत्त्व प्राप्त झाले असून त्या विषमत्वाचे स्वरूप समत्वात करण्याची गुरुकिल्ली निसर्गात सामावलेली आहे. निसर्गाचे हे कवच म्हणजे हेलिक्स होय. विषम ऊर्जा रोखून त्याला संजिवक करण्याचे कार्य हेलिक्स करते.

'निसर्ग देवो भव।' निसर्ग हाच खरा देव आहे. निसर्गाचा भावनांशी व भावनांचा व्यक्तींशी संबंध आहे. संपूर्ण निसर्ग एका चुंबकीय वातावरणाने भारावलेला आहे. तसेच काळ हा बदललेला आहे. त्याला आधुनिकतेची उपमा दिली आहे. आजच्या आधुनिक बदलाने अनेक बाबतीत निसर्गा विरूद्ध युद्ध पुकारलेले दिसते. उदा.कृत्रिमरित्या पाऊस पाडणे वगैरे. जो निसर्ग डोळ्यांना दिसतो. जी पंचमहाभुते आपणास प्रत्यक्ष प्रचिती देतात. त्यांच्या विरोधात जाणे म्हणजे विनाशाकडे जाणे होय. वास्तू सभोवतालचा परिसर लक्षात घेऊन मानवाच्या हितासाठी पूर्वीच्या ऋषिमुनींनी वास्तुशास्त्र बनविले आहे.



माणूस हा आधूनिक बनत चालला आहे. पण त्याला आपले राहते घर हा जिव्हाळ्याचा विषय आहे. प्रत्येक मनुष्य आयुष्यभर आपल्या परीने कष्ट करून एकच स्वप्न पाहत असतो आणि ते म्हणजे स्वत:चे एक घर असावे. प्रत्येक मनुष्याची भावना एकच असते की आपण जिथं राहतो वस्ती करतो ती जागा म्हणजे 'वास्तु' आपल्याला लाभदायक असावी. त्या वास्तुत आपल्याला समाधान मिळावे, संपत्ती मिळावी. संतती लाभावी व सर्व प्रकारचे सुख मिळावे. अशी प्रत्येक सर्वसामान्य माणसाची अपेक्षा असते.

धकाधकीच्या जिवनात माणूस थकून जातो. तो घरी परतल्यावर प्रसन्न वातावरण त्याला हवे असते. आज जेव्हा अनेक समस्या आयुष्यात उभ्या राहिल्या तेव्हा आपल्या जुन्या वास्तुशास्त्राला पुन्हा प्रकाश मिळाला. आज ज्या प्रमाणे लोकसंख्या वाढत गेली. तशीच घरं व इमारतींही वाढत गेल्या. त्या वास्तू नियोजन शुन्य असु शकतील. पण त्या इमारती पाडून नव्याने बांधणे शक्य नाही. म्हणून अंतर्गत रचना थोडीफार बदलून व सजावटीतून आपल्याला हवे असलेले समाधान प्राप्त करून घेता येते.

वास्तूचा विचार करताना दिशांना अग्रगण्य मानले पाहिजे. कारण वास्तुशास्त्रा प्रमाणे दिशांचा वास्तुवर विलक्षण परिणाम होत असतो. म्हणूनच वास्तुचे मुख्यप्रवेशद्वार हे कोणत्या दिशेमध्ये येते हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पूर्व दिशेला वास्तुचे प्रवेशद्वार आले तर ही उगवती दिशा आहे. सात्विक व राजस गुणांची बढती. तसेच येथे ऐश्वर्य लक्ष्मी असते. येथे संपत्तीचा लाभ होतो. पश्चिम दिशेला मुख्य प्रवेशद्वार असेल तर या घरातील लोकांना परीश्रम जास्त असतात. तसेच ते आशावादी असतात. दक्षिणेकडे प्रवेशद्वार आले तर कमी श्रमात भरपूर पैसा. त्यामुळे माणूस विलासी वृत्तीकडे जातो. उत्तरेचे मुख्यप्रवेशद्वार असेल तर या घरात सात्विक पैशाचा ओघ असतो.

आग्नेयला मुख्य प्रवेशद्वार आले तर असमाधानी वृत्ती. जीवनात नैराश्य येण्याची शक्यता. या घरातील लोकांना पैशाचा उपभोग घेता येत नाही. पण येथे स्त्रीयांची प्रगती होते.



वायव्येचे मुख्य प्रवेशद्वार म्हणजे चंचलता, घरातील लोक सतत फिरतीवर, घराबाहेर, वायुदेव स्वस्थ बसु देत नाही. तर स्त्रीवर मानसिक दडपण.

नैऋत्य दिशेला प्रवेशद्वार आल्यास या घरावर संकटाचा मारा प्रचंड प्रमाणात असतो. जिवन अस्थिर, योग्य निर्णय घेता येत नाही. आत्मविश्वास नसतो.

ईशान्य दिशेला मुख्य प्रवेशद्वार आल्यास जिवन सात्विक होते. प्रगतिचा महामार्ग दाखविणारी, समाधान देणारी लक्ष्मी येथे असते. आध्यात्मिक प्रगती चांगली होते.

तसेच ईशान्य दिशेस पूर्व व उत्तर दिशेला देवघर असावे. पूर्वेला स्नानगृह तर स्वयंपाक घर हे आग्नेयलाच असणे योग्य आहे. वायव्य दिशेस धान्याचे कोठार असावे. पश्चिम दिशेस शोचकूप असावे. वास्तुतील जड साधने नैऋत्य दिशेस असावीत. घरातील मुख्यशयन या दिशेस असल्यास उत्तम.

उत्तर ही कुबेराची दिशा असल्याने वास्तुतील देवघर, प्रवेशद्वार व दिवानखाना या दिशेस असावा. पण शौचकूप मात्र कदापि नसावे.

टेरेस व बाल्कनी हे शक्यतो ईशान्य, पूर्व व उत्तर दिशेस असावेत. वास्तुमधील दरवाजाची उंची ही त्याच्या रुंदिच्या दुप्पट असावी. दारे ही नेहमी आतिल बाजुस उघडावेत. ते आवाज करणारे नसावेत.

वास्तुतील विशिष्ट वातावरण निर्मितीस रंगसंगतीचा वाटा महत्त्वाचा आहे. कारण माणसाची विशिष्ट मानसिक स्थिती विशिष्ट रंगाने तयार होऊ शकते. म्हणजे लाल, पिवळा, ऑरेंज हे उष्णरंग नवनवीन कल्पना सुचण्यास कारणीभुत ठरु शकतील. हिरवा, निळा या शांत रंगामुळे आरामदायक व प्रसन्नतादायक वातावरण तर काळा रंग भयाणता वाढवतो. पांढरा रंग मांगल्याचे वातावरण तयार करतो. गुलाबी रंग हा तारुण्याचा स्वप्नांचा रंग असल्याने शयनगृहास तो अधिक उपयुक्त ठरतो.

अंतर्गत सजावटीत कुठल्याही एकाच रंगाचा प्रभाव टाळावा.

नैसर्गिक प्रकाश बरोबर कृत्रिम प्रकाशाचीही आवश्यकता असते. घरात रंगीत दिवे शक्यतो टाळावेत. सारखे चालू बंद होणारे दिवे टाळावेत.

आजकाल कारंजी, चित्रे यांचा अंतर्गत सजावटीत वाटा असतो. कारंजाची रचना शक्यतो ईशान्येस करावी. ज्यामुळे समृद्धी होईल. ज्या चित्रातून अर्थ व बोध होईल अशी चित्रे लावावीत. क्रोध, वैराग्य, भयकारी, उदासिनता अशा भावना निर्माण होतील अशी चित्रे घरात लावू नयेत.

वृक्षप्रेमी लोक आपल्याकडे बरेच असल्याने शोभिवंत झाडांनी सुशोभित केलेली दारे मोठ्या प्रमाणावर आहेत. परंतु निवडूंग कोरफड अशा कुठल्याही काटेरी वनस्पती गुलाब सोडून शक्यतो घरात ठेवू नये. घरातील वातावरण शुद्ध रहावे व औषधी वनस्पती म्हणून घरात तुळस असावी.

ब्रह्मस्थानी म्हणजे घरातील मध्यबिंदु हा नेहमी उघडा/मोकळा असावा. आपल्या गावाच्या ठिकाणी घरामध्ये हे विशेषतः आढळते. आधुनिक फ्लॅट सिस्टममध्ये ते शक्य नाही.

वास्तुपुरुषाच्या प्रसन्नतेसाठी बांधलेले घर, आरोग्य, निर्विघ्नता, संपत्ती आदी गोष्टींना शुभ होण्यासाठी वास्तुशांतीचा विधी करावा.

मी जे शिकले व मला जे शिकवण्यात आले आहे ते मी या लेखाद्वारे माझे मनोगत वाचकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीत आहे. मी आभ्यासलेल्या पुस्तकांतुन, माझ्या गुरुंच्या चर्चेतुन आणि माझ्या अनुभवातून माझे हे विवेचन आहे. माझा अनुभव सांगतो की वास्तुशास्त्र व त्यावर आधारलेली अंतर्गत सजावट ही सुखकारक, प्रसन्न असते. अर्थात आरोग्य, संपत्ती, संतती आणि विद्या प्राप्त करण्यासाठी वास्तुशास्त्राचा खूप उपयोग होतो.

शेवटी एवढेच म्हणणे आहे की सुर्य मावळल्या नंतर आपण आपल्या घरात दिवा लावतो. कारण अंधार दुर करण्यासाठी. त्याच प्रमाणे आधुनिक बनण्याच्या भावनेतून आणि विसरलेल्या जुन्या वास्तुशास्त्रामुळे अंधःकार दाटला आहे. तो दुर करण्याचा प्रयत्न करुया.

या वास्तुशास्त्राचे उपकार मानून नम्र होऊ. आणि त्याच्या मार्गवरून पुढे जाण्यास सिद्ध होऊ.

## घरातील पाणी - जलसाठा...

**१) पिण्यासाठी पाणी हे फक्त ईशान्य भागातच ठेवणे, घराच्या प्रगती व आरोग्यासाठी चांगलं आहे.**

**२) पूर्व, उत्तर, ईशान्य भागात पिण्याचं पाणी किंवा भांडी ठेवणे.**

**३) काहीही झालं तरी आग्नेय भागात पिण्याचं पाणी ठेवू नये.**

**४) जर पूर्व, ईशान्य या दिशा नाही मिळाल्या तर दक्षिण-नैर्ऋत्य-पश्चिम या भागात पिण्याचं पाणी ठेऊ शकता.**

**५) पण जर फक्त पाणी दक्षिण-नैऋत्य-पश्चिम भागात आलं किंवा ठेवलं तर पाणी साठवणुकीचा ओटा लगेच साफ ठेवा व ईशान्येला पाण्याचा जग भरून पिण्यासाठी वापरावा.**



# ओलावा-नात्याचा

**- संतराम पाटील**

मार्च २०२० मध्ये पंतप्रधानानी अचानक लॉकडाऊन जाहीर केला आणि देशभर एकच गोंधळ माजला. सुरवातीला कारखाने,दुकाने बंद जरी आसली आणि गोरगरीबांचा रोजगार जरी बुडाला तरी त्याना पगार देणेचे बंधन सरकारने व्यापारी कारखान दारावर घातलं होते. पुढे हा पगार कुणाला मिळाला का नाही ; पुढे काय झालं याचा विचार सुरू आसतानाच नागपूर येथील गोपाल फुल उंबरकर आणि त्यांच्या साहित्यीक सहकारी यांनी व्हॉटसअप वर एक साहित्यिक आणि कविंचा एक ग्रुप ओपन केला .

**मला त्या मिसकॉल आलेल्या फोन वर फोन करायला लावला. मी रिडायल केला आणि तिकडून मला रिप्लाय आला 'हॅलो दादा, मी अनु बोलते तुमची बहीण अनु.' परत मी बुचकळयात पडलो.**

मी काही फार मोठा साहित्यिक किंवा कवी ही नाही,पण कुणाच्या सांगण्यावरून का? खुठल्या तरी ग्रुप मधून त्यानी माझा फोन नंबर घेऊन, मला त्यांच्या ग्रुप मधे सामावून घेतले. सुरवाती पासूनच गोपाल सरांनी एखादा विषय द्यायचा, आणि त्या विषयावर या नवोदित आणि मुरलेल्या कविनी कविता करायच्या व ग्रुप वर टाकायच्या. आसा दिन क्रम चालू होता. सुरवातीला मी थोडं या ग्रुप कडे दुर्लक्ष केले आणि नंतर दोन एक दिवसांनी लिहीता झालो. अलीकडे स्मार्ट फोन आल्या पासून पुस्तक वाचण्यासाठी वाचकांना वेळच मिळेनासा झालाय. उठसूठ प्रत्येकाने उठायचे आणि या फोनवर बोट फिरवत बसायचे. आसा वाचकांचा ही दिनक्रम झाला आहे. या मुळे वाचन संस्कृती थोडी वेगळ्या दिशेने जात आसल्याची जाणवत आहे.

त्यातच हा रचियता साहित्य मंच हा ग्रुप कविंचा ग्रुप. आता लोक पुस्तकच वाचत नाहीत, तर आमच्या कविता कोण वाचणार. हा माझा अव्वल दर्जाचा प्रश्न. मग कविता कशाला करायची म्हणत म्हणत; मी कविता लिहुन ग्रुप वर टाकत रहायचा. आणि मग आम्ही कविच एकमेकांच्या कविताना कमेंट द्यायचे. म्हणजे काय आपण आपली पाठ थोपटू शकत नाही. म्हणून दुसऱ्याची थोपटायची; आणि दुसऱ्या कडून आपली पाठ थोपटून घ्यायची. आसाच काहीतरी प्रकार ग्रुप वर चालू होता .

माझ्या कविता थोड्या इतरापेक्षा वेगळ्या आसायचा; मी थोडं म्हणन्या पेक्षा माझ्या जीवनातील तीस वर्षे; सोशल वर्क मधे पुर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम केले आहे. त्यामुळे त्याचे प्रतिबिंब त्या कवितेत उमटायचे. मग ते ग्रुप मध्ये कुणाला आवडायचे कुणाला नाही. पण चार पाच महिला कवी आणि गोपाल सर कधी

कधी माझ्या कवितेला कमेंट करायचे. मग मी सुद्धा त्या महिला कवयित्रींच्या कविताना कमेंट द्यायचे. म्हणजे काय ? माझ्या शेतकरी भाषेत, उसना पैरा फेडल्यासारखेच. पण आम्ही एकमेकांना कमेंट द्यायचोच .

आशिच कमेंट माझ्या कवितेना अनुराधा उपासे ताई करायची. मी ही तीला कमेंट द्यायचो. आणि या कमेंट मधुन आम्ही दोघे एका अतूट नात्याची विण गुंफत गेलो. आणि ग्रुप मधील सगळे आम्ही बहीण भावाच्या नात्यात गुंफत गेलो. ते फक्त रचियता साहित्य मंच मुळेच. आसं मला म्हणावं लागेल.



हे सर्व काही महिने रोजच चालू आसताना. मी अचानक माझ्या कविता संग्रह प्रसिद्धीचे काम हातात घेतल्या मुळे; त्या साहित्य ग्रुप मधून बाहेर पडलो आणि माझा आणि ग्रुप मधल्या सर्व कवी, कवीयत्रींचा संपर्क तुटला आणि ग्रुप वरच माझं दर्शन दुर्मिळ झालं. याची खंत अनुराधाला जाणवत राहीली. पण याची कल्पना मला कधीच आली नाही. आणि मी तसा विचार सुद्धा केला नाही. पण त्याची सल तीला मात्र सतत बोचत राहीली. आसं तीला सतत वाटायच; काही वेळ आम्ही व्हॉटसअप वर एकमेकांची खुशाली विचारायचो. त्यातुन तीला मी शेती करतोय आसं बोलुन दाखवल होतं. आता दिवस सुद्धा पावसाचे असल्याने; मी शेतीत रमलो आहे. आसं समजून ती थांबली आसताना.

नारळी पौर्णेमेच्या निमित्ताने; भावाला बहिणीने पत्र पाठवण्याचा उपक्रम जाहीर केला. पण हे पत्र आपण कुणाला लिहायचे ? हा प्रश्न तीच्या समोर उभा होता. या पुर्वी सुध्दा रचियताने बहीणीस पत्र लिहायचा उपक्रम घेतला होता. तेंव्हा मी बहीण म्हणून तीला पत्र पाठवले होते. माझा हेतु सुद्धा स्पष्ट होता. आम्ही सर्वच कवी कवयत्री बहीण भाऊ तर आहेच,पण मला सुद्धा सख्या पाच बहिणी आहेत, पण आमच्या घरात मी वगळता कुणीही शाळा शिकलेलं नाही. मग सख्या बहिणींना लिहील्या पेक्षा कवी बहिणीला लिहावं; आणि तीची कमेंट मिळवावी ईतकाच माझा हेतु होता. आणि अनुराधाने मला कमेंट तर दिलीच. तर पुढे मला तसं स्वीकारलं. आता रक्षाबंधनांच्या निमित्ताने तीन सुद्धा मला भाऊ म्हणून पत्र लिहीलं पण भावाची कमेंट नाही; काय झालं, कसं झालं, याचा विचार तीला सारखा सतावत आसताना; आणि मी माझ्या घरी निवांत क्षणी दुपारी वामकुक्षी घेत आसताना, मला कुणाचा तरी मिसकॉल आला. शक्यतो दुपारी मी कुणाचाच फोन घेत नाही.

पण का कोण जाणे माझी सौ.मला आतल्या खोलीतुन म्हणाली “आहो तो फोन वाजतोय तो घ्या,पोरीचा फोन आला आसेल. चार दिवस झालं आला नाही”

“गप्प बसं तीचा नाही, कुणाचा तरी चुकुन लागला आसेल, हा फोन सेव केलेला नाही,” दरम्यानच्या

काळात माझी मुलगी प्रतिज्ञा हीने आपल्या फोन वर बॅलन्स मारला नसल्यामुळे तीन कुणाच्या तरी फोन वरून फोन केला आसेल; आसं समजून मला त्या मिस्कॉल आलेल्या फोन वर फोन करायला लावला. मी रिडायल केला आणि तिकडून मला रिप्लाय आला

"हॅलो दादा, मी अनु बोलते तुमची बहीण अनु."

परत मी बुचकळयात पडलो. माझ्या पाठची बहीण अनुच आहे. पण ती मला दादा कधीच म्हणत नाही आणि अचानक आसं काय झालं मी ठरवलं हिला वेगळं काय बोलायचं नाही फक्त बोलत करायचं आहे .

परत मी बोललो "हां बोल बोल, कशी आठवण केलीस. बरी आहेस नव्ह. "

"दादा मी बरी आहे, तुमच्या शेतात काम चालू आहेत काय ? ग्रुप वर सध्या दिसत नाहीस, मी अनुराधा उपासे बोलतेय"



तुमचं भाऊजी सुद्धा शेतकरी आहेत. त्यांना सुद्धा बऱ्याच वेळा वेळ मिळत नाही; म्हणून म्हटले,"ठिक आहे माझं तसं काही नाही. मी घरातच आसते; कारण मी शुगर पेशंट आहे."

"मग दादा तब्बेत सांभाळून रहा" आणि पुढे बोलत राहीली "दादा या राखी पौर्णिमा निमित्ताने, रचियताने बहिणीने भावाला पत्र लिहायचा उपक्रम घेतला होता. तेंव्हा मी बहीण म्हणून तुला पत्र पाठवले होते. पण तुम्ही मला रिप्लाय दिला नाही.

म्हणून तुमचा फोन मी शोधुन काढून हा फोन केलाय. मला विसरला नाहीस नव्ह; ?आसा प्रश्नही तीन उपस्थित केला" तीच हे संभाषण आम्ही दोघे पती पत्नी ऐकत होतो. आणि या संभाषणातुन एक नवा मेसेज प्राप्त करून घेत होतो. नव्या नात्याचा जन्म होत आसल्याची जाणीव आम्हा दोघांना जाणवत होती. संभाषणा नंतर ती मला म्हणाली "दादा मी तुम्हाला जे पत्र लिहीलं आहे. ते व्हॉटसअप वर पाठवते. वाचा आणि मला रिप्लाय द्या" मी फोन ठेवला आणि तीन लिहिलेल पत्र मला पाठवल . ते आसं .

रचियता साहित्य मंच नागपूर आयोजित रक्षाबंधन निमित्त भावास पत्र.सौ अनुराधा रत्नाकर उपासे, मंगरूळ ता तुळजापूर, जी. उस्मानाबाद.

प्रीय संतराम दादा

स.न. वि . वी.

रचियता समुहा मुळे तुझी नी माझी या मंचावर भेट झाली. माझ्या कवितांचे तु भरभरून कौतुक केले. रोज रिप्लाय देऊ लागला. मला ही तुझ्या कविता आवडू लागल्या आणि आपण भावा बहिणीच्या नात्याने जोडले गेलो. पण खुप दिवस झाले तु समुहात सहभाग घेत नाहीस. कस विचाराव अस वाटत होत आणि भावाला रक्षाबंधन

निमित्त पत्र लिहिण्याची संधी गोपाल दादांनी दिली. त्यानी उपक्रम-साठी भावाला पत्र लेखन हा विषय निवडला आणि हे तुला पत्र लिहिण्याची संधी आपोआप मिळाली.



खर म्हणजे आज मी तुला रक्षाबंधन निमित्त पत्र लिहित आहे व राखी पाठवत हे भावा बहिणीचे आपले नाते अखंड राहो, तुला दिर्घ आयुष्य लाभो; हीच ईश्वरचरणी प्रार्थना. मला मनापासून वाटल म्हणुन विचारते शेतीच्या कामामुळे समुहात सहभागी होता येत नाही ना ? कारण तुझ्या भावजींना ही शेतीमूळ वेळ मिळत नाही. स्वता:ची काळजी घे. भावा बहिणीचे नाते अतुट हे प्रेमाचे घट्ट बांधलेले ते रेशीम धाग्यांचे, नको मला काही चोळी नी बांगडी, फक्त टिकून रहावी, भावा बहिणींची गोडी तु मला पाहिले नाही, मी तुला पाहिले नाही तरी मला रक्षाबंधन ला तुझी आठवण आली आणि तुला पत्र लिहिण्याची संधी गोपाल दादांनी प्राप्त करून दिली. त्या बद्दल गोपाल दादा चे मनापासून आभार. तुझीच बहिण अनु.

आसं हे पत्र मी वाचलं आणि मी सुद्धा तीच्या आणि बहीण भावाच्या नात्यात न्हाऊन निघालो. भगिनी प्रेमाने तीन मला जी साद घातली. तील मी दाद दिली आणि आमच्या दोघांची नात्याची घट्ट विण विणली ती कधीच अलग न होण्यासाठी. आज ही आम्ही दोघं एकमेकांना भेटलो नाही. शे पाचशे किलोमीटरवर आम्ही दोघंही रहातो. तो बहीण भावाच्या नात्यानेच. हा नात्याचा ओलावा आसाच आमच्या दोघांच्या ह्रदयात झीरपत राहील आसं मनात समजूनच.....

## आपल्या घरात असलेली अडगळ

१)सर्वप्रथम अडगळीची खोली वास्तुशास्त्राला मान्य नाही, आपल्या घरात अडगळ-अडचण असू नये. २)आपल्या घरातील प्रत्येक वस्तू ही सतत वापरात असली पाहिजे, काही अशा वस्तू आहेत की ते सतत लागत नाही पण त्या आठवड्यातून एकदा तरी वापराव्यात. ३) वस्तू सतत वापरायला पाहिजे कारण ती स्थिर राहिली तर त्याची एनर्जी थांबते व ती थांबली तर त्यावर धूळ साठते. मग तिच्यात फंगस तयार होतात, जेव्हा वस्तूला बुरशी लागते तेव्हा ती सडायला लागते. ४)वर्षोनुवर्ष वस्तू जपून ठेवू नये, ज्या वस्तूंना आपण १,२,३,४ वर्षे हात लावत नाही त्या वस्तूत निगेटिव्ह एनर्जी तयार होते. मग त्या एनर्जी आपल्याला घातक ठरतात. ५)जर चौरंग असेल तर तो इतर लोकांना वापरायला द्या, सतत त्या वस्तूचा वापर झाला पाहिजे.

# लाडो

**डॉ. सुवर्णा पाटील**

'पुन्हा तेच स्वप्न. ती दचकून जागी झाली . घशाला कोरड पडली होती, अंग घामाने चिंब भिजले होते. ह्या स्वप्नाचा नेमका अर्थ तरी काय ? का पडतात ही स्वप्ने . काय अर्थ ह्या सगळयाचा ?'

तिला दरदरून घाम फुटलेला होता. का हे स्वप्न वारंवार मला दिसते. का मला अस्वस्थ करत असते. याचा अर्थ काय असेल. माझं काही देणे असेल कुणाशी, माझा काय संबंध असणार. असे एक ना अनेक प्रश्न ती स्वतःलाच विचारत होती. असे कोणते स्वप्न होते जे तिला नेहमी अस्वस्थ करून जात होते. ती निवांत बसली, तिची नजर शून्यात होती. आता तर डोळे उघडे ठेवूनही तिला ते स्वप्न दिसते असा भास होऊ लागला. तिला दिसत होते ते खाच खळग्यातून काट्या-कुट्या ती बेभान होऊन पळत आहे. तिला कसलेच भान नाही. पायात वाहन नाही. दगडांमध्ये ठेचाळत आहे, पायांना काटे टोचत आहे, रक्तबंबाळ तिचं शरीर झालेला आहे. कपड्यांची तर अक्षरशः लक्तरे झालेली आहे. तरी स्वतःचा जीव मुठीत घेऊन ती पळत आहे. शरीरात जेवढा त्राणअसेल तेवढा त्राण घेऊन ती फक्त पळत आहे, पळत आहे. तिच्या मागे जंगली कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी लागलेल्या आहेत. त्यांच्यापासून ती स्वतःचा जीव वाचत झाडाझुडपातून पळत आहे. थी किंचाळत आहे परंतु तिचा आवाज कुणापर्यंत ही पोहोचत नाही. आजूबाजूला दूर दूर पर्यंत कुणी माणूसही मदतीला दिसत नाही. पडकी मातीची घरे आहेत परंतु ती बंद आहेत. त्यातून कुणी मदतीलाही तिच्यासाठी बाहेर येत नाही. ती प्रत्येक दार ठोठावते, मदतीची याचना करते परंतु तरीदेखील तिला कोणीच मदत करत नाही. अशीच पळता-पळता ती जमिनीवर पडते आणि त्या कुत्र्यांच्या झुंडी तिच्या अंगावर येऊ लागल्या. तिचा लचका तोडण्यासाठी ते जबडा फाडतात आणि ती जोरात किंचाळते नि खाडकन डोळे उघडते.

**"राम्या ये राम्या, तुला म्हटलं होतं ना माझी पोरगी जित्ती हाय. बघ आली माझी पोरगी माझी लाडो आली बघ रे. आर कुठे गेले ते नालायक गाववाले जे म्हणत होते माझ्या पोरीला जित्ती जाळून टाकलं. कुठे आहे ते नालायक. बघ माझी लाडो आली."**

रेखाचं हे स्वप्न त्यात तिचं असे किंचाळणे हे तिच्या पतीसाठी नवीन नव्हते. परंतु आता त्याचे प्रमाण वाढतच चालले होते. म्हणून त्यांनी तिला सायकॅट्रिस्ट कडे दाखवायचे ठरवलं. डॉक्टरांनी त्यांना सल्ला दिला काही दिवस ह्या वातावरणापासून दूर जाण्याचा. मग रेखाच्या पतीने एक ट्रिप प्लॅन केली. दोघेजण पती-पत्नीफक्त म्हणजे त्यात तरी तिचं मन मोकळं करेल असे त्याला वाटले. रेखा देखील त्यासाठी तयार झाली.

सर्व तयारी करून ते ट्रीपसाठी निघाले. रस्त्याने जात असताना त्यांना एक छोटसं गाव लागले. का कुणास ठाऊक पण रेखाला त्या गावाच खूप ओढ वाटू लागली. तसं ते गाव जवळपास उध्वस्त झालेलेच वाटत होते. फक्त एक दोन माणसांची डोके तिथे दिसत होती, तरी देखील तिथे थांबण्याचा तिने तिच्या पतीला आग्रह केला. त्यानेही ठरवले की तिच्या समाधानासाठी थोडा वेळ तिथे थांबूया.

कार मधून उतरल्या बरोबर रेखा झपझप त्या गावाकडे निघाली. जणू काही ते गाव तिच्या ओळखीचे होते. ती अशी चालत होती की आधीही बऱ्याचदा गावात आली होती. ती एक एक घरपार करू लागली. तिला ती तुटलेले घरही ओळखीचे वाटू लागले. का असं वाटू लागलं रेखाला, तिला तिचच कळेना. ती एका झोपडीवजा घराजवळ येऊन थांबली. जणू काही तिला कुणीतरी संमोहित केले होते.



तेवढ्यात त्या झोपडीतून एक म्हातारी बाहेर आली विस्कटलेले केस, फाटलेले लुगडं, ज्याला ठिकठिकाणी ठिगळे लावलेले होते. थरथरते हात, चेहऱ्यावरच्या सुरकुत्या मधून दु:खाची छाया उमटत होती. रेखा तीच्या झोपडी समोर जाऊन पुतळया सारखी उभी राहिली. म्हातारीने किलकिल्या डोळयांनी रेखाकडे बघितले. तिचा चेहरा काळजी पूर्वक न्याहाळला आणि त्या म्हातारीच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा दिसू लागली. थरथरत्या ओठांवर हास्य उमटायला लागले. अचानक विजेरी संचारावी तसा आनंद तिच्या संचारला आणि ती जोरजोरात ओरडू लागली, "राम्या ये राम्या, तुला म्हटलं होतं ना माझी पोरगी जित्ती हाय. बघ आली माझी पोरगी माझी लाडो आली बघ रे. आर कुठे गेले ते नालायक गाववाले जे म्हणत होते माझ्या पोरीला जित्ती जाळून टाकलं. कुठे आहे ते नालायक बघ माझी लाडो आली."

म्हातारी नेहमीसारखंच वेड्यासारखी बडबडते म्हणुन राम्या काहीच बोलला नाही. तो आपल्या डोक्यावर चारा घेऊन तिथं येऊन उभा राहिला. पण समोर रेखाला बघतो काय त्याच्या शरीरातील त्राणच गेले आणि तो गपकन खाली बसला. म्हातारी परत बोलली, "बघ मी म्हणत होते ना माझी लाडो जित्ती हाय ती परत येईन म्हणून."

रेखाच्या पाठोपाठ तिचा नवराही तिथे आला आणि रेखाला स्तब्ध बघून आणि म्हातारी काय बोलते याचा संदर्भ लावून तो खूपच गोंधळला. राम्या भूतभूत म्हणून तिथून पळाला. राम्या सोबत गावातील दोन-तीन वयस्कर माणसे तिथे आले. ते पण रेखाला बघून दचकले. रेखाच्या पतीने त्यांना विश्वासात घेत हा काय प्रकार आहे ते विचारलं आणि रेखा सोबत घडणाऱ्या गोष्टीबद्दल ही सांगितले. आधीच त्या लोकांना रेखाबद्दल जरा संभ्रम होता. त्यांनी २२ वर्षांपूर्वीची एक घटना सांगितली.

लाडोची 'लाडो' म्हणजे त्या म्हातारीची मुलगी. दिसायला अतिशय सुंदर, बोलायला फटकळ, चुणचुणीत तिला बघताक्षणी तिच्या प्रेमात पडणारे. त्यामुळे गावातल्या काही उनाड मुलांची तिच्यावर वाईट नजर होती आणि एका रात्री मात्र त्यांनी त्यांचा डाव साधला. एकदा लाडोला चारा आणायला उशीर झाला. बाहेर अंधारून आलो होत, त्यादिवशी कुत्रे खूपच भुंकत होते, अंधाराचा फायदा घेत त्यांनी लाडोला गाठले. तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. ळाडो

बिचारी जंगलातून जीव वाचवत पळत सुटली. तसेहे कुत्रेही तिच्यामागे सुटले तिचे लचके तोडण्यासाठी. ती जीव मुठीत घेऊन धावत सुटली दगडांमध्ये ठेचाळत, काट्या-कुट्यां मध्ये चालत, रक्तबंबाळ होत होती. तिचे कपडे सगळे फाटले तरीसुद्धा तिने हिंमत सोडली नव्हती आणि आपलं शिलवाचवण्याचा प्रयत्न करत होती. तिच्यातलं त्राण गेले आणि ती खाली कोसळली जशीही ती खाली कोसळली हे लांडगे तिच्यावर तुटून पडायला सज्ज झाले. परंतु ती शीलवान, तिने जवळच पडलेल्या झाडाच्या टोकदार फांदिने स्वतःला भोसकून घेतलं आणि गतप्राण झाली. गावात चर्चा होऊ नये म्हणून त्यांनराधमांनी तिला जंगलातच काट्याकुट्या टाकुन जाळून टाकले. हा राम्या तिचा धाकटा भाऊ याने सगळं डोळयांने बघीतले होते आणि त्याच्या आईला येऊन सांगितले ते ऐकून तिला वेड लागले तेव्हापासून ती म्हणते माझी लाडो येईल बघ आणि देवाची करणे बघा तुमची पत्नी आणि लाडू सारख्याच दिसतात."



म्हातारीने रेखाचा चेहरा गोंजारत बोलली, "लाडो कुठे होती इतके दिस. मी किती वाट पाहत होती तुझी. आता आली होय तुझी माय मरायला आली तेव्हा. बर आता नको जाऊं बाहेर. अग तुझी वाट बघून बघून डोळयातला आसव बी सुकून गेले. राम्या बी लई रडला तुझ्यासाठी. माझ्या माघारी त्याची काळजी घे बरं त्याला कोणीच नाही ग. घेशील ना बाई भावाची काळजी. बोल ना बोल लाडो."

म्हातारी ची वटवट चालूच होते. रेखाने म्हातारीचा हात हातात घेतला आणि बोलली, "व्हयमाय राम्या माझ्या संघच राहीन काही काळजी करू नको." रेखाचे हे शब्द कानावर पडल्याबरोबर म्हातारीच्या चेहऱ्यावर एक समाधान दिसू लागलं आणि तिने रेखाच्या मांडीवरच आपला जीव सोडला. इतके वर्ष जणू ती हाच दिवसासाठी जिवंत राहीली होती. तीची लाडो तिला येऊन भेटणारतोपर्यंत आपण जगायचंअसेच तिने ठरवले होते जणू.

रेखाला भोवळ आली तिच्या पतीने तिला सांभाळून तिच्या चेहऱ्यावर पाणी मारून तिला शुद्धीवर आणले. आता रेखाला खूप हलकं वाटू लागले. मनावरचे एक प्रकारचं दडपण होतं ते क्षणात निघून गेले. तिच्या मनातली भीती आणि संभ्रमही गायब झाला होता. तिचा चेहरा प्रफुल्लित दिसू लागला होता. तिने राम्याकडे बघितलं आणि पतीला म्हटले याला आपल्या सोबत नेऊया. पतिने ही होकार दिला.

जणू मागील जन्मातील तिची जबाबदारी पूर्ण करण्यासाठीच हे स्वप्न पडत होते. त्या माऊलीचा आपल्या लेकी साठीच प्रेम आणि लेक पुन्हा भेटेल हा दुर्दम्य आशावाद रेखाला पुन्हा तिच्या मागील जन्माच्या गावात घेऊन आला होता.

**हुशार नवरा**

*पेपरमध्ये जाहिरात होती. एक साडी घ्या व ५० % वाचवा*

*नवऱ्याने पटकन पेपरच फाडला व १०० % वाचवले.*

*एक हुशार नवरा.*

*With best compliments from*



# KALE & SUDAM ASSOCIATES

Contractor in Civil, Interior & Structural Works

We Believe in Perfection
(V.J.Kale)



Mumbai Reg. Off. :
7/6 Municipal Tenament Marathi Granth Sangrahalay Marg,
Next to Sharda Cinema, Dadar (E), Mumbai - 14
Email: kalesudam@hotmail.com/rscsudam@gmail.com

# भेटीत तुष्टता मोठी

**- रूपश्री वनारसे**

राधाबाई रहायच्या पुण्यात मोठ्या लेकाकडे, सुधीरकडे. मुलगी सुमन मुंबईत आणि धाकटा लेक सुहास नोकरी निमित्त कोल्हापूरला. राधाबाई ८१ वर्षांच्या झाल्या होत्या, आता थकल्या होत्या. घरातल्या घरात हळूहळू थोडं चालायच्या. कोणी बरोबर असेल तर लिफ्टने थोडावेळ खाली जाऊन यायच्या. टी व्ही वरील ठराविक कार्यक्रम आवडीने बघायच्या. जे घरात असतील त्यांच्याबरोबर त्यांच्या कधी गप्पा व्हायच्या. पण मुलगा, सून नोकरीत व्यस्त, नातू पण नुकताच नोकरीला लागलेला आणि नात कॉलेजमध्ये बिझी. तिकडे सुमनची पण नोकरी आणि तिच्या मुलांच्या सुट्ट्या बघून यायचे म्हणजे अवघड व्हायचे. त्यामळे सुमनचे दादाकडे क्वचितच येणे व्हायचे. धाकटा सुहास पण कामानिमित्त पुण्यात आला तर सुधीरकडे धावती भेट देऊन जायचा. एकूण सगळे आपापल्या रूटीनमध्ये व्यस्त होते, आणि राधाबाई रिकाम्या असायच्या. जुन्या आठवणी काढत बसायच्या. लागलंच तर फोनवर, व्हॉट्सॲपवर लेकीशी, धाकट्या लेकाशी, नातवंडांबरोबर बोलणे व्हायचे.

**'आज्जी आज्जी!! आजी, ओळख पाहू आम्ही तुझ्यासाठी कायगिफ्ट आणलं आहे?'**
**राधाबाईंनी तिला पुढे घेतले आणि तिचा गालगुच्चा घेत म्हणाल्या, 'मला तर गिफ्ट मिळालं '**

राधाबाईंना कोणाबद्दल काही तक्रार नव्हती. सगळे जमेल तेवढे करायच हे त्यांना माहित होते आणि सर्वजण नोकरी आणि कामांमध्ये व्यस्त असणार हे पण त्या समजून घ्यायच्या. पण आजकाल राधाबाईंना थोडी अस्वस्थता, अधिरता जाणवत होती. काहीतरी चुकल्यासारखे, राहून गेल्यासारखे वाटत होते. पण काय ते कळत नव्हते.

काही दिवसांनी सुधीरची एकसष्टी साजरी करायची ठरली. आमंत्रणं गेली. राधाबाईंना आनंद झाला, त्या एकेकाला आठवत होत्या, नातेवाईक, जुन्या घरचे शेजारी आणि त्यांना कोणाची आठवण झाली की त्या सुधीरला विचारायच्या, यांना आमंत्रण केले का? त्यांना आमंत्रण केले का? घरातील कार्यक्रमामुळे बऱ्याच जणांच्या गाठीभेटी होतील, या विचाराने त्या सुखावल्या होत्या.

कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी लाडकी लेक सुमन आली मुलांना घेऊन. मुला-मुलांची दंगा मस्ती सुरू झाली. घर भरल्यासारखं वाटू लागलं. समारंभाच्या दिवशी सकाळी सुहास, त्याची बायको आणि गोडूली नात अनन्या येताना दिसली. राधाबाईंना अचानक खूप समाधान मिळाल्यासारखे वाटले.

हेच ते, जे आपल्याला राहून गेल्यासारखे वाटत

होते. याचमुळे आपल्याला अस्वस्थ वाटत होते. कितीतरी दिवस असे सगळे एकत्र भेटलोच नव्हतो. कधी भेटलो होतो आम्ही, मी, माझी तीनही मुलं, सुना, जावई, नातवंडं असे एकत्र ? त्या आठवायचा प्रयत्न करत होत्या, ‘हे’ गेले ४ वर्षांपूर्वी, तेव्हा सगळे एकत्र जमले होते ! त्यानंतर आत्ताच ?

राधाबाई अशा विचारात असतानाच अनन्या पळत पळत कॉटवर बसलेल्या राधाबाईंकडे आली आणि मागून येऊन त्यांच्या गळयात पडत म्हणाली, ‘आज्जी आज्जी!! आजी, ओळख पाहू आम्ही तुझ्यासाठी कायगिफ्ट आणलं आहे ?’

राधाबाईंनी तिला पुढे घेतले आणि तिचा गालगुच्चा घेत म्हणाल्या,‘मला तर गिफ्ट मिळालं पण, तुम्हा सगळया एकत्र भेटण्याचे.’ आणि त्या भरून पावल्या.



# वास्तू टिप्स



१.आरोग्यदायी जीवनासाठी झोपताना पुर्वेला व दक्षिणेला पाय करून झोपु नये . आपण कुठे व कसे झोपतो यावर आपले आरोग्य अवलंबुन असते.

२.उत्तम आरोग्यासाठी उत्तर दिशेला पाय करून झोपावे म्हणजे आर्थिक, मानसिक, शारीरिक प्रगती चांगली होते.

३.आजार बरे होत नसतील तर झोपण्याची जागा बदलून पाहा. म्हणजे आजार लवकरात लवकर बरा होईल.

४.बेड समोर आरसा अथवा आरशाचे कपाट येऊ देऊ नये. त्यामुळे शरीरातील उर्जेची हानी होते व आजार वाढतात.

५.आरोग्यदायी जीवनासाठी बॉक्स बेड वर झोपू नये बॉक्स बेड वर झोपणे म्हणजे आजारांना निमंत्रण देण्यासारखे आहे.

६.घरामध्ये सुख-समृध्दीदायक आयुष्यासाठी फुटलेले आरसे, फुटलेली खेळणी, तुटलेले फर्निचर इ .वस्तु ठेऊ नये .

७.भरपूर प्रगतीसाठी आणि यशदायी गतिमान आयुष्यासाठी बंद पडलेले घडयाळ घरामध्ये ठेऊ नये .

# सुंदर माझं घर

- सुनिता देहेरकर

प्रत्येकालाच आपलं घर सुंदर वाटत असते त्याला मी ही अपवाद नाही. घर म्हणजे नुसत्या चार भिंती नव्हेत. घराला घरपण येते ते तिथे रहाणाऱ्या माणसांमुळे व शहाणपण येते ते वडीलधाऱ्यां व थोरामोठ्यांमुळे. घरात राहणाऱ्या माणसांना एकमेकांविषयी वाटणारे प्रेम, आपुलकी, जिव्हाळा यामुळे घर टिकून राहते. त्या घरांत जर भानगडी, कटकटी असतील, भांडण-तंटा असेल, हेवे-दावे असतील तर घर दुभंगायला वेळ लागत नाही. घरातल्या साऱ्यांना एकमेकांचा विश्वास वाटला पाहिजे, आधार वाटला पाहिजे. सुखदु:खातही घरातल्या मंडळींनी एकोप्याने व एकजुटीने रहायला पाहिजे. संकटाशी सामना करायला पाहिजे तर ते घर सुंदर घर म्हणता येईल. या उलट जर वातावरण घरात असेल तर ते घर, घर न वाटता लॉजिंग-बोर्डींग वाटेल. घरचे मंदिर बनवायचे की कोंडवाडा याचा निर्णय घरात राहणाऱ्या साऱ्यांनी घ्यायला पाहिजे. बाहेरच्यांनी नव्हे! सुदैवाने माझे घर खरच एक मंदिर होते व आजही आहे. याला कारण लहानपणापासूनच आई-वडीलांनी आमच्यावर केलेले संस्कार!

**घराच्या मागील भागात फळझाडे व फुलझाडे नाहीत त्या घरला 'सुंदर माझ घरं' म्हणता येईल का? घर म्हणजे ओटी, माजघर, देवघर, स्वयंपाकघर पाहुण्यांची खोली, बाळंतिणीची खोली, धान्याची कोठी. एवढे असून चालत नाही तर घराला लागून परस हवा.**


माझा जन्म पूर्वीच्या कुलाबा व आताच्या रायगड जिल्ह्यातला माझे गाव जासई हे रायगड जिल्ह्यातल्या पनवेल व उरण या दोन शहरांच्या बरोबर मध्यभागी आहे. पनवेल व उरण आम्हा जासईवासीयांना खूप जवळ आहे. एस.टी.ने फार फार तर अर्धा तास लागतो त्यामुळे शिक्षण घ्यायला कधी अडचण भासली नाही.

आमच्या गावाला निसर्गाचे वरदान लाभले आहे. गावाजवळ खाडी आहे. डोंगर-दऱ्या आहेत आणि मुख्य म्हणजे शानदार तळे आहे. या तळ्यातच आम्ही भावंडे पोहणे शिकलो. आमच्या घरापासून तळे १० मिनिटांच्या अंतरावर आहे. या तळ्यात उगवणाऱ्या कमळांना पाहून मला माझी प्रतिभा कळली व मी ७ वीत असतांना माझी पहिली कविता लिहीली. ती खालील प्रमाणे :-

**कमळ**

चिखलातून उगवते जरी कमळ
देवादिकांना प्रिय आहे कमळ
देवी-देवतांचे आसन आहे कमळ
साऱ्यांच्या पूजेमध्ये असते कमळ
कमळ देवाच्या हातात आहे
कमळ देवाच्या नाभीत आहे
देवीचे नाव कमला आहे
स्वत: देवही कमलाकर आहे.

कमळावर केलेली ही छोटीसी कविता मी जेव्हा आईला ऐकवली तेंव्हा तिला खूप आनंद झाला ती मला म्हणाली, ''लता (माझे माहेरचे नाव) तू कविता करत जा. तुझ्याजवळ काव्य प्रतिभा आहे. त्याचा तू उपयोग कर. तू जर कविता केल्यास तर मी तुला एका कवितेला एक रूपया देत जाईन. उत्तेजन म्हणून.'' आमची आई नेहमीच आमच्या कलागुणांना उत्तेजन द्यायची. आई स्वतः प्राथमिक शाळेत शिक्षिका होती व ती स्वतः चांगल्या कविता करायची. तिच्यातला तो गुण माझ्यतही उतारला आहे. सुरूवातीला आमचे घर बैठे होते. आता जुन्या घरावर एक मजला चढल्याने (बांधल्याने) ते उभे राहिले आहे असे म्हणायला हरकत नाही. पूर्वी घरासमोर अंगण होते मागे परस. त्यावेळी अण्णा (माझे वडील) ओटीवर बसून सोनारकाम करायचे. गिऱ्हाईकांची वर्दळ असायची. ओटी ऐसपैस व लांबरूंद होती. ओटीवरच पण एक बाजुला झोपाळा टांगला होता. त्यावर बसून आम्ही भावंडे झोके घ्यायचो. खूप मजा यायची.



ओटीच्या शेवटच्या टोकाला पाहुण्यांकरता एक खोली काढली होती. माजघरात देखिल एक खोली बाळंतिण बाईसाठी राखीव ठेवलेली होती. त्या खोलीत मात्र अंधार असायचा. एक छोटीशी खिडकी हवा आत येण्यासाठी होती तेवढीच. पुढे मोठी झाल्यावर कळले की, बाळंतिणीच्या खोलीत त्यावेळी जाणीवपूर्वक अंधार करत असत. खऱ्या अर्थाने त्यावेळी ती मनात म्हणत असेल की, 'अंधार माझा सोबती' म्हणून आता मात्र जुन्या संकल्पना मागे पडून भरपूर उजेड व प्रकाश ठेवला जाते. 'कालय तस्मै नमः' म्हणतात ते काही खोटे नाही आमचे बैठे घर एवढे प्रशस्त व लांबरूंद होते की, जागेची कमतरता भासू नये. मला तर ते एखाद्या जाडजूड व फतकल घालून बसलेल्या बाई सारखे वाटायचे.

घरातली मुले अंगणात खेळत तर मुली परसदारी. आमचो घर वडलोपार्जित नव्हते. वडलोपार्जित घरावर हक्क सांगणारे बरेचजण असल्याने अण्णांनी त्यावेळी स्वतःच्या पैशानी जागा विकत घेऊन ते प्रशस्त व ऐसपैस घर बांधले होते. आमच्या कुंटुंबात ४ मुलगे व ५ मुली आणि आई-वडील मिळून ११ जण होते त्यामुळे आम्हांला प्रशस्त, लांबरूंद घराची आवश्यकता होतीच. अण्णा सोनारकाम करत पण त्यांनी आपली सचोटी कधी सोडली नाही आणि म्हणून गावात इतर सोनार असतांना आमच्या दुकानात गर्दी व्हायची. अण्णा साधे-भोळे, देवावर प्रचंड श्रध्दा असणारे, देवपूजा व भजन-कीर्तन यात रमणारे होते. गावात त्यांना खूप मान होता व सर्वजण त्यांना 'देवमाणूस' म्हणत.

मला वाटते सोनाराला देवमाणूस म्हणणाऱ्याला कुणीही वेड्यात काढेल पण आमचे अण्णा याला अपवाद होते आणि म्हणून आम्हा सर्व भावंडांना व आईला त्यांचा खूप अभिमान वाटायचा. अण्णानी सोनारकामा बरोबरच शेतीपण केली आमची बरेच ठिकाणी शेती होती व आम्ही भावंडे पावसाळ्यात भाताची रोपे लावायला अण्णांबरोबर जात असू. आमची आई शिक्षिका होती तरी देखिल ती अण्णांबरोबर शेतात उतरायची व अण्णांना मदत करायची.



आमच्या परसदारी काय नव्हते फुलझाडे होती. फळझाडे होती. गुलमोहराचे झाड होते. त्याची रंगीत फुले खाली पडत तेंव्हा जमिनीवर लाल फुलांचा खच पडायचा. एक गुलमोहर लाल होता तर दुसरा पिवळा. एक नारळाचे (माड) उंच झाड होते. ते पहिल्यावर उंच माणसाला ताड-माड उंच असे का म्हणतात ते कळून यायचे. आंब्याचे झाड, शेवगा, फणस अशी इतरही झाडे होती. एक पेरूचे व जांभळाचे अशी आणखी झाडे होती. शेवग्याच्या शेंगातर एवढ्या येत की शेजाऱ्या-पाजाऱ्यांना आम्ही फुकट वाटत असू. तेंव्हा शेजारी एकमेकांच्या सहाय्याला धावून जात. आता ते शेजारी गेले आणि दिवसही. फुलझाडांमध्ये पारिजात, जास्वंद, गुलाब, मोगरा, चाफा अशी फुलझाडे होती. त्यामुळे परसात फिरायला मजा येई. आमच्याकडे सर्व तऱ्हेचे गुलाब होते. लाल-पिवळा, सफेद वगैरे वगैरे. मी लावलेल्या गुलाबांच्या झाडावर जेंव्हा गुलाब फुलले तेव्हा मला खूप आनंद झाला व माझ्यातली कवयित्री जागी झाली व मला एक कविता स्फुरली. ती अशी.

गुलाब

लाल पिवळ्या गुलाबाचे सुंदर फुल
पाहूनी साऱ्यांना पडते भूल
त्याचे विविध रंग पाहून
मन जाते आपले मोहरून
देवाचे हास्य मला
गुलाबात दिसते
मरगळलेल्या माझ्या मनाला
उभारी देते सुखा बरोबर दुःखही
असते गुलाबाच्या काट्यावरून ते कळते.

आई कडून मला लगेचच दुसरा रूपया मिळाला व पाठीवर शाब्बासकीची थाप. परसदारी खेळणे, झाडांखाली बसून पुस्तक वाचणे मला खूप आवडायचे. आई म्हणायची माझी लता फुलवेडी आहे. होय, मी फुलवेडी च होते. आईला मी एक दिवस म्हटले, ''आई मी फुलवेडी आहे कारण माझे नाव लता आहे. लता म्हणजे वेल आणि वेलीवर फुले यायचीच. ती न आवडून कसे चालेल.'' आई हसली व म्हणाली, '' शहाणं माझं बाळ !'' मी लगेच आईच्या कुशीत शिरले.

परस म्हणजे माझे उठण्याचे, बसण्याचे, खेळण्याचे आवडते ठिकाण होते. तिथल्या झाडांशी फळा-फुलांशी माझे अतूट नाते होते. आता फ्लॅट

संस्कृती आली आहे. अंगण, ओटी, पडवी, परस या गोष्टी आता कालबाह्य झाल्यात. मला मात्र आमचे जुने घरच आवडते. ज्या घराला अंगण नाही, ओटी नाही, ओटीवर झोके घ्यायला झोपाळा नाही, त्याला काय घर म्हणायचे. तसेच ज्या घराला परसदार नाही, बाग नाही, तुळशी वृंदावन नाही, गुरा-ढोरांचा गोठा नाही, घराच्या मागील भागात फळझाडे व फुलझाडे नाहीत त्या घरला 'सुंदर माझ घरं' म्हणता येईल का? घर म्हणजे ओटी, माजघर, देवघर, स्वयंपाकघर पाहुण्यांची खोली, बाळतिणीची खोली, धान्याची कोठी. एवढे असून चालत नाही तर घराला लागून परस हवा. हल्लीच्या मुला-मुलींना परस म्हणजे काय ते कळत नाही. माहित ही नाही. माहित असण्याचे कारण ही नाही. हल्लीची मुले फ्लॅट संस्कृतीत वाढलेली. त्यांना ओटी, पडवी, अंगण व परस काय कळणार? मग मीच माझ्या मुलांना सांगितले की, ''हे बघा बाळानो, परस म्हणजे घराच्या मागे असलेली जागा. या जागेत भाजी लावतात. झाडे लावतात, फुलबाग करतात. शिवाय अगोदरच तिथे असलेली फळझाडे व फुलझाडे यांचीही घरासारखीच गरज असते. शुध्द हवा, फळे, फुले आपल्याला मिळतात व ताजा ताजा भाजीपाला परसात असलेल्या व लावलेल्या भाज्यांमुळेच मिळतो. परसदाराला (Back Door) परसदार म्हणण्याचे आणखी एक कारण आहे ते म्हणजे प्रात:विधीसाठी स्त्रिया परसात जात असत. परसात स्त्री-पुरूषांसाठी शौचालय बाकी बांधले जाते व त्याचा उपयोग घरातील सर्वांना करता येतो. कळलं!'' एवढे विस्तार पूर्वक सांगितल्यावर मुलांचे समाधान झाले.


प्रत्येक फुलझाडाशी कळत नकळत नाते निर्माण होते आणि मग उरतात त्या आठवणी. मी लावलेला मोगरा जेंव्हा फुलला तेंव्हा मला खूप आनंद झाला. मी मोगऱ्याची वेणी करून केसात माळली. त्यावेळी मी एक चारोळी लिहिली ती अशी

मोगरा
मोगरा फुलला
त्याचा सुगंध दरवळला
सुंदर बालेच्या वेणीत तो शोभला
अत्तरात जाऊन लपला

मोगऱ्याचे अत्तर करतात हे मला माहित होते. पारिजाताच्या फुलांचाही सडा पडायचा. त्या फुलांचे देठ पोवळ्या सारखे वाटायचे. मी अण्णांना मग देवपूजेसाठी सुंदर सुंदर हार करून द्यायचे. आमचे देवघरही खूप मोठे होते. उदबत्त्याचा धूर, कापराने केलेली आरती व अण्णांची प्रसन्न मूर्ति आजही माझ्या नजरे समोरून जात नाही. देवांच्या मूर्तिवरील भाव व देवघरातले मंगलमय वातावरण यामुळे माझ्या मनाला उदात्त भावना निर्माण होऊन आपोआप हात जोडले जायचे. देवघरात अपवित्रेला थारा नव्हता. सारे वातावरण पवित्र असायचे. संध्याकाळी आम्ही सर्व भावंडे देवघरात बसून प्रार्थना व शुभंकरोती म्हणायचे. अण्णा प्रार्थना सांगत. त्यांच्या गोड आवाजात प्रार्थना ऐकणे मला खूप आवडायचे. हल्लीची मुले मात्र देवघरात न बसता टी.व्ही. समोर बसतात. शंध्याकाळची प्रार्थना आता जवळ जवळ बंदच पडली आहे. याला जबाबदार आम्ही देखिल आहोत.

आमच्या गोठ्यात एक गाय, एक म्हैस व दोन बैल होते. गायीचे नाव तांबू होते. कारण तिचा रंग तांबूस होता. बैलांना अण्णांनी हीरा आणि मोती अशी नावे दिली होती. खूप छान खिलारी जोडी होती. बैलगाडीला जुंपले की सुसाट पळत. मला मात्र भीती वाटायची व मी अण्णांना म्हणायची, ''अण्णा, हे तर पंजाब मेल सारखे

जोरांनी पळतात. यांची भुसावळ पॅसेंजर करा.'' त्या वेळी पंजाबमेल सर्वात फास्ट ट्रेन होती. तर भुसावळ पॅसेंजर सर्वात हळू चालणारी. अण्णा हसत व कासरा ओढून वेग कमी करत. आमच्या म्हशीची शेपटी अर्धी तुटलेली होती म्हणून आम्ही तिला लांडी म्हणायचो. पण ती लांडी म्हैस दूध मात्र भरपूर द्यायची. तिच्या करता अण्णा भूईमुगाची व खुरासणीची पेंड आणायचे. अण्णांची ती खूप लाडकी होती. एकदा मी शेंगदाण्याची पेंड कशी लागते हे बघण्यासाठी तोंडात पेंडेचा तुकडा टाकला. नेमके त्यावेळी अण्णा तिथे आले व म्हणाले, ''लता, ते म्हशीचे खाणे आहे. माणसाचे नव्हे! टाकती पेंड नाहीतर उद्यापासून तुला पण गोठ्यात बांधावी लागेल.'' अण्णा हसत-हसत म्हणाले. मला माझ्या मूर्खपणाची लाज वाटली. अशा कितीतरी गंमतीजमती घडत असत.



आमच्या घरी गणेश चतुर्थी व दिवाळी हे दोन सण धूम धडाक्यात साजरे करत. आमचे एक काका ठाण्याला रहात तर एक कल्याणला. ते व त्यांची मुले सर्वजण गणपतीच्या सणाला आवर्जुन येत. मग पाच दिवस नुसता धांगडधिंगा चालायचा. झिम्मा, फुगडी, पत्ते कुटणे व गाण्याच्या भेंड्या लावणे असले खेळ आम्ही खेळायचो. नुसती धम्माल यायची. असे पाच दिवस चालायचे. गणपती व गौरीचे विसर्जन एकाच दिवशी व्हायचे. महिला मंडळाकडे गौरीची सजावट असे तर पुरूष वर्ग व मुले गणपतीचे मखर आदल्या दिवशी तयार करत. त्यावेळी झुंबर, हंड्या व इतर कागदी व रंगीत पताका मखराच्या छताला लावल्या जात मखर करताना साऱ्याना किती आनंद वाटायचा तो हल्ली विकत घेणाऱ्या मखरवाल्यांना कसा कळणार? खाण्यापिण्याची चंगळ असायची. गणपतीकरता विविध प्रकारचे मोदक बनविले जात. खव्याचे मोदक, उकडीचे मोदक आणि इतर पंच पक्वान्न. खूप मजा यायची. दिवाळीत आम्ही अंगणात खूप फटाके फोडायचो. ओटीवर आकाश कंदिल लावायचो. माझे भाऊ आकाशकंदिल बनवत. आता मिळणाऱ्या विकतच्या आकाशकंदिला पेक्षा त्यावेळी रंगी-बेरंगी कागद घायचे त्याला तोड नाही. पैशांनी वस्तू मिळतात पण आनंद नाही. हेच खरं! अंगणात ओटा करून त्यावर रांगोळी काढण्यात जो आनंद होता त्यालाही आपण मुकलो कारण ओटाच नाही तर रांगोळी कुठली.

दिवस भराभरा जात होते. वडील व आई जिवंत असतानाच आम्हा सर्वांची लग्ने झाली. मोठे दोन भाऊ मुंबईला. एक नवी मुंबईला कामानिमित्त शिफ्ट झाला. छोटा भाऊ आई-वडीलांजवळ राहिला. आम्हा

सर्व बहिणींना लग्न होऊन सासरीजावे लागले. छोट्याभावाचे लग्न झाल्यावर त्यानी जुन्या बैठ्या घराचा आकार न बदलता घरावर एक मजला बांधला व आतून वर जाण्याकरता तसेच बाहेरून दोन जिने काढले. तेवढाच काय तो बदल नुतनीकरण केलेल्या आमच्या घराला त्यानी 'आनंद निवास' असे नाव दिले. आम्हा सर्वानाच ते आवडले.

वडील छोट्या भावाला म्हणाले, ''हे बघ संजय आपल्या घराचे नाव आनंद भुवन आहे. तेंव्हा या घरात नेहमी आनंदच असायला हवा. आपल्या घरात दुःखाला थारा नाही. सारेजण गुण्यागोविंदाने रहा.'' भावानी वडीलांना तसे वचन दिले व ते वचन आजतागायत पाळत आला आहे. आता आमचे वडील ह्यात नाहीत पण आमच्या सर्वांच सुंदर घर मात्र आहे. आजही आम्ही सर्वजण गणपतीच्या सणाला आमच्या गावी जातो तेंव्हा भूतकाळ जागा होतो. परवा मी शाळेच्या दाखल्यासाठी आमच्या गावी गेले, सर्वांनी माझे स्वागत केले. मी परसात जाऊन माझ्या आवडत्या गुलमोहराला भेटले. मला खूप आनंद झाला व माझ्याकडून नकळत काव्य लिहिले गेले. कारण तो माझा बालपणापासूनचा मित्र होता.

**गुलमोहर**

गुलमोहराच झाड खरच खूप आहे वाढल
आणि आता ते आकाशाकडे आहे झेपावल
गुलमोहराला पाहून मला खूप बर वाटल
फुलांचा सडा पाडून तेही मनापासून हसलं
मी पण गेले मग अगदी त्याच्याजवळ
स्पर्श करून म्हणाले, मला ओळखल
फांद्यानी पाठीला स्पर्श करून ते होय म्हणाले
माझ्या डोळ्यात मात्र पाणी तरळलं.
लहानपणापासूनच त्याची माझी मैत्री होती
त्याच्या सावलीखाली खेळण्यात गंमत होती
कधी लंगडी तर कधी लगोरी
तर कधी खेळायचो आम्ही चेंडू रबरी
दमून-भागून आम्ही त्याच्याजवळ बसायचो
गुलमोहराच्या सावलित थकवा विसरायचो
त्याची सुंदर-सुंदर फुले पाहून आनंदी व्हायचो
ओजळीत फुले घेऊन घरात पळायचो.
ऊन- पावसातही त्याची आम्हाला साथ होती
गुलमोहराला पाहून पळून जायची भीती
सुंदर फुलांचा सडा पाडून तेही हसायचे
वाऱ्याच्या झुळकीने मान डोलवायचे
खरच वृक्ष असतात माणसाचे खरेखुरे मित्र
माणसाच्या सेवेकरता उभे असतात अहोरात्र
माणसे मात्र करतात त्यांच्यावरती प्रहार
उपकार कर्त्यालाच ते का बरे करतात ठार ?

आमचा सुंदर घर व माझा आवडता गुलमोहर पाहून मला खूप बर वाटलं व पुन्हा परत येईन असे छोट्या भावाला सागूंन घर सोडलं.

**विनोद**

**बायकोची ताकद**

अचानक बायकोने आपल्या नवऱ्याला "बोटाने" इशारा केला. आणि बोलाऊन घेतले..

.

.

नवरा– काय झालं का बोलावलस??
बायको– काम तसं काही खास नाही, मी फक्त ह्या "बोटात" किती ताकद आहे ते तपासत होते..

# ठराव

**- संतराम पाटील**

जिल्हा मध्यवर्ती बँक आणि जिल्हा दुध संघाच्या निवडणूकीचे नुकतेच पडघम वाजायला सुरवात झाली होती. ईच्छुक उमेदवाराना या निवडणुकीसाठी लागणारे ग्रामीण पतसंस्था, दुधसंस्था आणि सेवासंस्थाचे ठराव गोळा करण्याचे आदेश जिल्हा नेत्यांनी दिले होते. त्यामुळे गावगल्लीतल्या राजकारणाला ऊत आला होता. गल्ली बोळातील राजकारण तापले होते.

एक हजार बाराशे लोकवस्तीचे आमचं तळेगाव सुद्धा याला अपवाद नव्हते. गावात चार गट आणि चार गटात तितकेच पोट गट होते. तशी राजकारण करायची ऐपत गावात कुणाची नव्हती. पण तालुक्यातील नेत्यांनी या गाव कार्यकर्त्यांना आपल्या सोयी साठी ही राजकीय दुकाने उघडून दिली होती. त्यामुळे गल्ली बोळात पुढाऱ्याचे पेव फुटले होते. आणि त्या प्रत्येकाला वाटत होते ठराव माझ्याच नावावर हवा. तसा नेत्याचा आदेश आहे.

**'जानेवारी पस्न तुझा पगार तीन हजार केलाय. म्हंजी दुधातन तीन नी सोसायटीतन तीन हजार. लेका सहा हजार महीना पगार. कुठल्या सायेबाला तर हाय काय' अर्जुनने प्रोसिडिंग काढून पगार वाढीचा ठराव लिहिला.**

शामराव शिंदे हे या गावातील उगवते नेतृत्व, हे नेतृत्व, गावात मयताच काम आसुदे नाहीतर लग्नाचे शामरावच तीथला पुढारी. त्याच्या गटाच्या ताब्यात सुद्धा दोन संस्था होत्या. एक दुध संस्था आणि एक विकास संस्था. या संस्थेचा संस्थापकच तो होता. त्यानेच पुढे होऊन या संस्था काढल्या, पण त्याला चेअरमन मात्र होता आले नाही कारण काय होते कुणाला ठाऊक पण याला चेअरमन कोणच होऊ द्यायचे नाहीत. संचालक मात्र हा पठ्या असायचा आणि कारभार सुद्धा याच्या मर्जीप्रमाणे चालायचा. असं सत्ता नसताना सुद्धा कारभार पहाणारं एक मुखी नेतृत्व होतं त्यांच हे सर्वांना माहित होते.

दुध संघ आणि मध्यवर्ती बँक या जिल्ह्यातील प्रमुख संस्था. या संस्थेच्या निवडणूकीत उमेदवारी जरी मिळाली नाही, तर चालेल पण ठराव मिळाला पाहिजे. ही प्रत्येक संचालकाची इच्छा. या संस्थेच्या निवडणूकीत मताचा अधिकार म्हणजे तळहातावर लक्ष्मीच वास्तव, म्हणून शामरावच्या हनुमान दुध, हनुमान विकास या संस्थेच्या ठरावा साठी काही मोजक्या संचालकामधे स्पर्धा लागलेली होती. या वेळी या स्पर्धेत शामराव प्रथम स्थानी होता. शामराव शिंदे, रामचंद्र पाटील, अंकुश चौगुले, धर्मा चांभार, बायाक्का माने, श्रीधर वाणी असे संचालक होते आणि गाव लहान आसल्याने आलटुन पालटुन यांच्याच

घरातील मंडळी, दुसऱ्या संस्थेच्या संचालक मंडळात होती. एकूणच काय या पाच सहा घरांची सत्ता त्यांच्या गटावर होती. तर अर्जुन भाट हा सेक्रेटरी होता त्यामुळे त्याचे सुद्धा डिमांड वाढले होते. ठराव जिल्ह्याला पाठवायची तारीख जवळ आली; तसा शामरावने सेक्रेटरीला बोलवून घेऊन हुकुम दिला.

"आरे....अर्जुना सोसायटी आणि डेरीचे दप्तर आमच्या घराकडे घेऊन ये"

"कशाला तात्या दप्तर घराकड बसु या की ईथंच आज राच्याला''अर्जुन बोलला

"आर काम जरास जिकिरीचे हाय म्हणून म्हणतोय "

"आसु दे की ...आम्ही दोघं आसताना कसली जीकीरी आलीया, या की आज राच्याला"



"आरे...भडवीच्या तुझ्यासंग ठरावा बद्दल बोलायच हाय म्हणतो " शामराव त्याच्या कानात हळूच बोलला आणि मग काय अर्जुनाचे कान हालवले. कारण कधीच नाही ईतकं महत्व शामराव तात्याने दिलं होतं. त्यामुळे तात्याच्या शब्दाला जागायच आसं त्यान ठरवलं. आणि या दोघांनी रात्री बारा वाजता संस्थेत बसायचा बेत केला आणि लोकांची पांगापांग झाली.

रात्री ठीक बारा वाजता शामरावची गाडी अर्जुनच्या दारात दत्त म्हणून उभी राहीली. अर्जुन ठरल्याप्रमाणे गाडीवर बसला दोघंही संस्थेत आले. दोन्ही ही संस्था एकाच घरात होत्या. फक्त दोन्ही संस्थाची कपाटे तेवढी वेगळी होती. बाकी कामगार सेक्रेटरी दोन्ही संस्थाना एकच होते. त्यामुळे एकाच खुर्चीवर बसून हा गाडा चालू होता .

"अर्जुन दोन्ही संस्थाचे प्रोसिडिंग बाहेर काढ. तुला एक गोष्ट सांगतो " शामराव

"आहो...चेअरमन ,संचालक काय तरी म्हणतील " अर्जुन

"काढकी मर्दा कशाला लांबड लावतोस "

अर्जुनाने थरथरत्या हाताने दोन्ही प्रोसिडिंग बाहेर काढली. तसं शामराव त्याला म्हणाला "पहिल्यांदा हा ठराव लिवं "

"कंच्चा " अर्जुन

"तुला पगार किती हाय ?"

"दोन्ही कड मिळुन तीन हजार"

"आर सुकाळीच्या तीन हजारात काय गाजर ऐत्याती काय ?"


"नाही तात्या, खरं करायचं काय, कोण वाढीवतय व्हय, माझा पगार "

"आरं ..लेका मी वाढीवतो. घे त्यो प्योन आणि लिव ते प्रोसिडिंग "

"काय लिवायचं "

"जानेवारी पस्न तुझा पगार तीन हजार केलाय. म्हंजी दुधातन तीन नी सोसायटीतन तीन हजार. लेका सहा हजार महीना पगार. कुठल्या सायेबाला तर हाय काय"

अर्जुनने प्रोसिडिंग काढून पगार वाढीचा ठराव लिहिला आणि शामराव कडे बघत म्हणाला “हे ला सुचक अनुमोदन कोण”
“राम्या नी धर्म्याची नाव टाक बसुंद्यात बोंबलत रांडच”
रामा पाटील आणि धर्मा चांभारचं नाव टाकून ठराव लिहिला आणि शामरावला वाचुन दाखवला. तसं शामरावने त्याच्या पाठीवर थाप मारली म्हणाला “शाब्बास रे माझ्या बहाद्दर” आसं म्हणत ठरावाच्या दोन्ही प्रती त्याच्याकडे देत म्हणाला “ह्या ठरावाच्या प्रती हाईता दोन्ही संस्थाचे ठराव माझ्या नावावर लिव नी तसंच प्रोसिडिंग लिव”



आता अर्जुन माशाच्या जाळयात आडकला होता. त्याला नाही म्हणता येत नव्हते कारण ईकडे पगार वाढीच्या प्रकरणात तो पुर्ण अडकून पडला होता. नाईलाजाने तो ठराव लिहीण्यासाठी राजी झाला आणि दोन्ही संस्थाचे ठराव त्याने शामरावच्या नावाने केले .
अर्जुनला थंडीच्या रात्रीच दरदरून घाम सुटला होता . घाम पुसतच तो शामरावला म्हणाला “तात्या या ठरावर आणि प्रोसिडिंग वर सह्या कशा घ्यायच्या”
“अरे लेका, तुला त्याची काळजी कशाला मी हाय की. त्यो सगळा बीस्तारा गुंडाळून कपाटात ठेव. नी चल घराकडं झोपायला”
अर्जुनाने दप्तर गुंडाळून कपाटात ठेवले आणि दोघेही आप आपल्या घराकडे झोपायला निघुन गेले .

शामरावनेच सगळया संस्था काढल्या आसल्या आणि गट नेता जरी तोच आसला तरी महत्वाचे पद त्याला कधीच मिळाले नव्हते. तर झारीतल्या शुक्राचार्यानी ते मिळू दिले नव्हते. याची सल त्याच्या मनात होती. म्हणून या वेळी दोन्ही ठराव आपल्या कडे घेण्याचे कुटील राजकारण केले होते. शामराव तसं तयारीचे पात्र होते. त्याने या सर्व संचालकाच्या सह्या घेण्यासाठी परत एकदा डोकं चालवल. त्याने दोन्ही संस्थाच्या जनरल सभा लावुन घेतल्या. त्याही एकाच वेळी एकाच ठिकाणी आणि जनरल सभेच्या सह्या हजर आसलेल्या सभासदा मधुन घेतल्या; तर सर्व संचालकाच्या सह्या ठरावावर प्रोसिडिंग वर घेतल्या. या सह्या करताना संचालक मंडळात ईतका गोंधळ झाला की कोण कीती, कशा कशावर सह्या केल्या याचं भान सुद्धा त्याना राहील नाही. आशा तऱ्हेने शामरावने आपले काम साधुन घेतलं होते. ईतकच काय तर ते ठराव सुध्दा निवडणूक विभागाकडे तात्काळ जमा करून टाकले होते. सगळया संस्थाचे

ठराव तालुका पातळी वर एकत्र करून; ते ठराव जिल्हा नेतृत्वाला द्यायचे आसे तालुका गटाच्या मिटींग मधे ठरले होते. त्यापद्धतीने तालुक्यातील सगळे ठराव जमा झाले होते. पण तळेगावचा ठराव तेवढा आला नव्हता. म्हणून ईच्छुक उमेदवार सदानंद सकपाळ, यांचा फोन धर्मा चांभाराला आला होता. धर्माला संध्याकाळी ताबडतोब मिटींग घेणं महत्वाचे होते. त्यानी दिवसभर संचालकाच्या गाठीभेटी घेतल्या. आणि सेक्रेटरी ला संध्याकाळी सात वाजता दोन्ही संस्थाची मिटींग घ्यायला सांगितले, ठरलेल्या प्रमाणे एक एक करीत सगळे संचालक हजर झाले. पण त्यात शामराव नव्हता. तो सांगलीला आपल्या पाहुण्यांना भेटायला गेला होता. तो आलाच नाही. एक संचालक हजर नसला तरी काय बिघडत नाही. सभेचा कोरम पुर्ण झाला आणि सभेत दुध संस्थेचा ठराव धर्माच्या नावावर तर सोसायटीचा ठराव रामा पाटलाच्या नावावर केला, मंजुरी घेतली आणि ते दोन्ही ठराव तालुका नेत्यांच्या कडे पाठवुन दिले. हा सगळा व्यवहार चालू होता तेंव्हा सेक्रेटरी उघड्या डोळयांनी पहात होता. पण काही बोलायचे धाडस मात्र करत नव्हता. कारण तो ही मिंदा झाला होता.

ठरलेल्या प्रमाणे निवडणूक विभागाने पात्र मतदारांची कच्ची यादी जाहीर केली पण त्या यादीत तळेगावचे नाव नव्हतं. कारण एकाच संस्थेने दोन दोन ठराव दिल्याने; ते राखून ठेवले होते. धर्मा आणि रामाने ती यादी दोन दोन वेळा चाळली पण नावचं नसल्यामुळे ते हादरलेच. त्यानी तालुका नेत्यांच्या कानावर ही गोष्ट घातली आणि थेट जिल्हा उपनिबंधक कार्यालय गाठले. अधिक चौकशी करता हा प्रकार त्यांच्या कानावर आला. त्यानी सुसाट गाव गाठले.



तक्रारीच्या ठरावावर हरकती सुचना मागीतल्या होत्या, ती तारीख सुद्धा जवळ जवळ येत होती. शामरावने घातलेला घोळ गाव भर पसरला होता. यांच्या गटाचे फाटल्या मुळे दुसरे गट गावात चवीने चर्चा करत होते. काही वेळी शामराव, धर्मा आणि रामाला टोचून बोलायचे, पण विरोधी गटाच्या बोलण्या कडे हे तिघेही फारसे लक्ष देत नव्हते .कारण त्यांच्याच गटातून फुटून जाऊन इरेला पेटून त्यानी हा वेगळा गट काढला होता. हरकती सुचना मागवलेली आणि पक्की मतदार यादी करायचा आज अंतिम दिवस. सेक्रेटरीने दोन्ही गटाना जी जी कागदपत्रे हवी होती दिली होती. ठरलेल्या प्रमाणे ही सर्व मंडळी जिल्हा उपनिबंधक कार्यालयात गेली. शामराव एकटेच एका बाजुला; राहीलेले सगळे

संचालक सेक्रेटरी दुसरीकडे. आता शामराव एकटा पडला होता. हुकमाचा पत्ता सेक्रेटरी हा बहुमताच्या बाजुला होता. पण त्याचे धड बहुमताकडे; ह्रदयात शामराव होते. याच कारण पगार वाढीचा ठराव.

आजचा पुर्ण दिवस उपनिबंधक कार्यालयात बसून गेला होता. संध्याकाळी चार वाजता नंबर आला. दोन्ही बाजुच्या ठरावाची पडताळणी झाली. शामरावचा ठराव राखून ठेवला. रामा आणि धर्माचा ठराव फेटाळल्यामुळे; त्या दोघांनी वकील घातला. वकीलांनी त्यांची बाजु मांडली, शामरावने आपली बाजु आपणच मांडली. आपला ठराव योग्य कसा हे निबंधकाना पटवून दिले. निबंधकानी जो निकाल दिला तो आसा "या निवडणुकीसाठी मतदार म्हणून पहीला ठराव आला आहे. तो शामराव शिंदेचा त्याला सुचक अनुमोदन अनुक्रमे धर्मा चांभार व रामचंद्र पाटील आहेत म्हणून हा ठराव कायम करणेत येत आसुन; व पहिल्या ठरावावर जे सुचक अनुमोदन आहेत. त्यांच्या नावे दुसरा ठराव करता येणार नाही. म्हणून हा रामचंद्र पाटील, धर्मा चांभार यांचा ठराव रद्दबातल ठरवित आहे. निकालाची प्रत हातात घेतल्या घेतल्या या मंडळींनी गाव गाठले. दुसरा दिवस उजाडला. तो या लोकांच्या कपाळावर आठ्या घेऊन. शामराव जिंकल्याची चर्चा गावभर होती. मात्र शामराव शांतच होता; कारण तो अल्पमतात होता. पण येता येता तो तालुका नेत्यांना, आणि आमदार साहेबाना भेटुन, झाला प्रकार कानावर घालून आला होता. ईकडे आमदार साहेबाना आणि तालुका नेत्यांना भेटण्यासाठी रामा पाटील आणि धर्मा चांभार यांनी टाटा सुमो काढली आणि तालुका गाठला; झाला प्रकार दोन्ही नेत्यांना माहिती होता. त्यानी यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि गावात गेल्यावर भांडण तंटा करायचा नाही; आशी ताकीद देऊन समजुत घातली. सगळेच लोक माळयाच्या हॉटेल मधे चहाला गेले तिथं यानी विषय काढला. धर्मा म्हणाला "आरे ईतकी सगळी माणसं आम्ही एका बाजुला; आणि एकटा शामराव एका बाजुला; साहेब शाम्याला काहीच बोलले नाहीत आणि आम्हालाच ताकीद दुन सोडलं की भांडायचं नाही म्हणून; हे ला काय म्हणायच" त्यावर टेबल पुसतच हॉटेल वाल्या माळयान उत्तर दिल तो म्हणाला "हे... लाच राजकारण म्हणायच. या पुढाऱ्याचे आसच आसतया; गावा गावात कोंबडी झुझवायची. दोनी कोंबडी आपलीच समजायची. खरं.. त्या कोंबड्यास्नी कुठ ठाव आसतया, आमचा मालक एकच हाय त्यो.




जो कोंबडा जिंकून येईल तेच्या बरोबर आपलीच मिरवणूक काढून घ्यायची आणि हारलेला जगला तर तसाच ठेवायचा. जिंकल्यावर सोडाय आणि मेला तर कापून खायाचा. मालकान काय विठोबाची माळ घातलीया व्हय ...बाबानु जरा शाणं व्हा" आसं म्हणत टेबल वरचे चहाचे ग्लास उचलून घेऊन गेला आणि ठरावाचा विषय बाजुला गेला. पण एक विषय मागं राहिला. तो म्हणजे शामरावला ठराव मुख्यपद आणि पुढारीपण का ? नाही.

शामरावला गावात शेत नाही; घर नाही आसा मोलमजुरी करून खाणाऱ्या घरातील हा माणुस त्याची बायको, आई, वडील आजही दुसऱ्याच्या शेतात कामाला जातात. पण शामराव कर्तृत्ववान माणूस. त्यानं प्रस्थापित राजकारणी माणसांचा रोष पत्करून; अनेक संस्था, मंडळ, स्थापना केली. पण ज्या ज्या वेळी पुढारी पण द्यायची वेळ येईल; तेंव्हा शामरावचे नाव मागे पडायचं. म्हणजे काम सगळ शामाचे; पुढारी पण मात्र दुसऱ्याला त्याचे कारण एकच शामरावची गरीबी. हे त्याला सुद्धा समजून चुकलं होतं. या वेळी त्याने ठरविले होते. गरीब श्रीमंतीच्या राजकीय लढाईत; हा ठराव पैसा जिंकतोय का कार्यकर्ता.....आणि हा ठराव जिंकला होता. शामरावने नाही; त्याच्या आतील क्रियाशील कार्यकर्त्याने ...त्याच्या राजकीय डावपेचाने.... ?...ठराव जिंकला होता.

## ❀ औषधे ❀

१)औषधं आपल्या घरातील अविभाज्य भाग झाला आहे. आपण औषधं जवळ घेऊन झोपतो.
२)जी गोष्ट आपल्याजवळ नको तीच आपण जिकडे तिकडे घेऊन बाळगतो.
३)आपल्या घरातील साधा बाम व विक्सचा पण **display** कमी करायचा आहे.
४)औषधं ही पॅक बंद **box** मध्येच हवी. बाहेरून दिसली नाही पाहिजे. कपाटाच्या आत box मध्ये ठेवावीत.
५)औषधांचा **box** संपूर्ण घराच्या पश्चिमेला ठेवा किंवा संपूर्ण घराच्या पूर्व दिशेला ठेवला गेला पाहिजे.
६)पूर्व व पश्चिम दिशा नाही मिळाली तर दक्षिण, आग्नेय व वायव्य ह्या तीन दिशांपैकी कुठेही ठेवू शकता.
७)चुकूनही नैर्ऋत्य व ईशान्येला औषधे कधीच ठेवू नका. खूपच **negative** आहे. उत्तरेला पण नकोच.
८)योग्य जागी औषधे ठेवली तर त्याचा परिणाम चांगला होतो. आपली बचत चांगली राहते.
९)जी **health tonic** वापरतो, ते म्हणजे च्यवनप्राश यासारखी शक्ती देणारी **tonic** त्यांचा **display** करायचा आहे.



# सुटका

-ऋतुजा पाटील

दुपारची निर्जन शांतता तिच्या घराच्या कौलांवर आणि अंगणात पडली होती. नुकतीच वरच्या मजल्यावरच्या नीनाची शिकवणी संपल्याने मुलांचा घरी जातानाचा कोलाहल सुरु होता. चपलांचे शिट्यांचे बोलण्याचे आवाज संपून आता सारं काही शांत झालं होतं. जणु काही एक मोठं वादळ नुकतच शमलं असुन सर्वदूर एक गुढ शांतता पसरली आहे. याच गुढशांततेत शालिनी तिचं लिखाण करीत होती. प्रमिलाचा निर्णय योग्यच होता. अजुन किती काळ ती नवऱ्याचा छळ सहन करणार. अखेर सहनशीलतेला देखील मर्यादा असतेच. तीच मर्यादा उलटल्याने प्रमिलाने नवऱ्यापासून वेगळं होणाऱ्या निर्णय घेतला. या विषयावर कथा लिहिणाऱ्या शालिनीचं स्वतःचं आयुष्य मात्र काही निराशच होतं.

**आज तिची कथा जरा जास्तच रंगली होती. म्हणुनच वेळेचं भान तिला आलं नसावं. नऊ वाजले होते. भात-डाळ, भाजी पोळ्या करून शालिनी ने आपला स्वयंपाक उरकला. गिरिषच्या येण्याची वेळ झाली होती. .**

पुरुषांचे अत्याचार मुकपणे न सहता त्यांना धडा शिकवणारी स्त्री शालिनीने स्वतःच्या कथांमधुन दाखवली. तिने आतापर्यंत ज्या काही मोजक्या कथा लिहिल्या त्या प्रत्येक कथेतील स्त्री ही कर्तृत्ववान, स्वाभिमानी आणि धाडसी होती. स्वतःच्या कथांमधुन स्त्रीला अन्यायाविरुद्ध लढवणारी शालिनी स्वतःच्या आयुष्यात इतकी सोशिक का? हा प्रश्न तिला ओळखणाऱ्या प्रत्येकाच्या मनात होता.

गिरिषचे अत्याचार त्याचा संशय निमुटपणे सहन करता ती जगत आली लग्न झाल्याापसून तिची प्रत्येक रात्र ही गिरिषची मारहाण सहन करत, संशय, अत्याचार आणि दारुच्या उग्र दर्पात गेली. शालिनीला मारण्यासाठी गिरिषला कोणतंही कारण चालायचं. भाजीत मीठ नसल्यावर शालिनीला बेदम मारणारा गिरिष स्त्रीला नेहमी तुच्छ लेखत आला. शालिनी आपली बायको असल्याने तिच्यावर अन्याय करण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे असं मानणारा गिरिष तिला मारण्यासाठी अनेकदा स्वतःच कारण शोधत असते. गिरिषने केलेली मारहाण त्यातुन झालेल्या जखमा आणि त्या जखमांना इतरांपासून लपवण्यासाठी शालिनीचा चाललेली धडपड हे आणि एवढच तिचं आयुष्य होतं. काल रात्री झालेल्या अत्याचाराच्या खुणा उद्या पहाटे तिच्या शरिरावर दिसून यायच्या.

मध्यम उंचीचा सडपातळ देह, निस्तेज गोरी कांती, पाणीदार डोळ्यांखाली जमलेली काळी वर्तुळ. हाडकुळ्या पण गोऱ्या पाठीवर उठलेले पट्ट्याचे वळ या

साऱ्या खुणा लपविण्यासाठी लांब हाताचं ब्लाऊज घालून मानेवरुन पदर लपेटून घेणारी शालिनी. शालिनीकडे पाहून वाटायचं अजुन किती काळ ही हा अन्याय सहन करणार आहे? कधी होणार तिची या साऱ्यातून सुटका? तिच्या सहनशक्तीला मर्यादाच नाही का? लहानपणीच शालिनीचे आईवडील वारले. भावंड कुणीच नव्हतं. मामा-मामीने तिचा सांभाळ केला आणि वयात येताच तिला या राक्षसाच्या गळ्यात बांधली. शिक्षण जेमतेम दहावी पर्यंतच झालेलं लग्न झाल्यापासून पदरात फक्त गिरिषचा अत्याचार होता. पाच वर्ष झाली त्यांच्या लग्नाला. या पाच वर्षात शालिनीने काही मिळवलच असेल तर त्या तिच्या कथा. सकाळी ऑफिसला गेलेला गिरिष रात्री नऊ-साडेनऊ पर्यंत घरी यायचा. त्यामुळे दुपारचा बराच मोकळा वेळ तिच्याकडे उरत असे. लहानपणापासून तिला वाचनाची आवड होती.



लहानपणी मामीने सांगितलेली कामे करुन झाली की शालिनी मिणमिणत्या प्रकाशात वाचनालयातुन आणलेली पुस्तकं वाचत असे. शिक्षण जरी जेमतेम असलं तरी या पाच वर्षात मिळालेलं अनुभवाचं गाठोडं हे पुस्तकी ज्ञानाशिवाय अफाट होतं. याच अनुभवाच्या जोरावर तिने अनेक स्त्रीवादी कथा लिहिल्या. दुपारची कातरवेळ जसजशी सैलावत जाते तसतशा शिलनीच्या अंतरंगातल्या जख्मा हातातल्या कोऱ्या कागदावर सैलावत जातात. दुपारच्या कातरवेळी तिचं एक वेगळं नातं निर्माण झालं होतं. अनेकदा इतरांना ही दुपारची कातरवेळ नकोशी वाटत असते परंतु शालिनीला मात्र हिच कातरवेळ हवीहवीशी वाटत असे. याच दुपारी तिने आपल्या कोंडलेल्या भावनांना वाट करून दिली होती.

गिरिषच्या अत्याचाराने सुरुवातीला खूप रडलेली ओरडलेली शालिनी हळुहळु सर्व त्रास वेदना आत दाबुन ठेवु लागली. आणि जेव्हा कधी या दाबलेल्या वेदनांचा कोंडमारा होत असे तेव्हा ती त्यांना आपल्या कथेतुन व्यक्त करत असे. म्हणुनच कदाचित तिच्या कथांमधुन सतत एक वेदना ओघळताना दिसायची. लोखंड जसा आगीत ताऊन सुलाखून टणक बनतो तसंच शालिनीच शरिर आणि मन गिरिषच्या अत्याचारांना सहन करुन झालेलं होतं.

तरि ही मनात सतत हाच प्रश्न निर्माण होतो या निगरगट्ट झालेल्या मनात अन्यायाविरूद्ध बोलण्याची जराही ताकद नाही. जी स्त्री शालिनीने आपल्या कथांमधुन मांडली ती तिच्यात केव्हा जागी होणार. गेली पाच वर्ष शालिनीचा हाच जीवनक्रम चालू होता. गिरिषची

मारहाण शरिरावर आणि मनावर झालेल्या जखमा त्या जखमातून ओघळणारी शालिनीची कथा.

त्या दुपारीही ती तिची कथा लिहिण्यात गुंतली होती. आज तिला तिच्या कथेतला शेवट करायचा होता. बघता बघता सायंकाळ होत आली. अंगणातील रणरणती उन्हं ओसरुन सायंकाळची पिवळी धुसर किरण अंगणात सर्वदूर पसरली होती. घड्याळात सातचे टोले पडले आणि शालिनीला सायंकाळचं भान आलं. झपझप कथा लिहिणारे तिचे हात थांबले. सात वाजले तरी अजुन रात्रीच्या जेवणाची कुठलीच तयारी नव्हती. गिरिषला तो घरी यायच्या आत जेवण तयार लागतं. शालिनी झपाझप जेवण करायला लागली. आज तिची कथा जरा जास्तच रंगली होती. म्हणुनच वेळेचं भान तिला आलं नसावं. नऊ वाजले होते. भात-डाळ, भाजी पोळ्या करून शालिनी आपला स्वयंपाक उरकला. गिरिषच्या येण्याची वेळ झाली होती. मगाशी कथा मध्येच तोडल्यामुळे तिच्या कथेचा शेवट अर्ध्यावरच राहिला होता. बघता-बघता दहा वाजले अजुन गिरिषचा पत्ता नव्हता. शालिनीच्या डोक्यात मात्र तिच्या कथेचा शेवट घोळत होता. तिला तो शेवट कागदावर उतरवुन सुटकेचा निश्वास टाकायची घाई होती. म्हणून तिने कागद हातात घेतला. परंतु तोच टेलिफोनची रिंग वाजली. शालिनीने फोन उचलला आणि पलिकडच्या माणसाने दिलेली बातमी ऐकुन नकळत सुटकेचा निश्वास टाकला.

अशी कोणती बातमी होती ती? जी ऐकून शालिनिने दिर्घ सुटकेचा निश्वास टाकला तो फोन गिरिषच्या कंपनीतल्या एका व्यक्तिचा होता. गिरिषला रस्ता क्रॉस करताना अपघात झाला होता. मेंदुला मार बसल्यामुळे तो जागच्या जागीच गेला.

आज एक वर्ष झालं गिरिषला जाऊन. पुढे शालिनीचं काय झालं? शालिनीच्या घरात तिच दुपारची कातरवेळ सैलावली होती. टेबलावर फुलांचे गुच्छ नि हार-तुरे पडले होते. दमलेली शालिनी पलंगावर मान टेकुन बसली होती. आज स्त्रीवादी लेखिका म्हणून तिला राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आलं. शालिनीला आपल्या कथेचा शेवट सापडला. गिरिषच्या जाण्याने तिची आपोआप या सर्वातुन सुटका झाली होती.

## सेप्टिक टँक

**१)सेप्टिक टँक नेहमी पश्चिम व वायव्य भागात पाहिजे.**

**२)टँक म्हणजे खड्डा. खड्डा पूर्ण भरलेला असतो. सूर्याची किरणं पडतात तेव्हा त्याचा दूषित भाग स्वच्छ करण्याचं काम इन्फ्रारेड किरणं करतात.**

**३)पूर्व, उत्तर, ईशान्य भागात जर tank आला तर आरोग्याच्या तक्रारी वाढतात. Health Problem वाढतात. पैशाचा Problem होतो. मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो. मुलांचा ग्राफ खाली घसरत जातो, अवाढव्य खर्च, कोणी कोणालाच जुमानणार नाही. अपघात होणार.**

**४)ब्रह्मस्थानात पाण्याची टाकी आली तर आत्महत्या, अपघात, संकटाची मालिका चालू राहणार.**

With Best Compliments from

# M/S GLOBAL

construction



शुभ दिपावली

# गोष्ट संगीताची

- अशोक भुस्कुट

सन १९९८ ची गोष्ट अश्विनी चिपळूणात रहावयास येण्याचे ठरले. मी कविळतळी येथे लँडसस्टोन पार्कच्या मागे साई अपार्टमेंटमधे तळमजल्याला सेंट्रल बँकेतल्या नंदू पालशेतकराचा फ्लॅट भाड्याने घेतला. तसा माझ्या कामाच्या दृष्टीने फारसा सोयीचा तो फ्लॅट नव्हता म्हणजेच लोकेशन योग्य नव्हती माझ्या गाड्या पॉवर हाऊस नाक्यावर उभ्या रहात व तेथूनच सुटत असत व कविळतळीहून पॉवर हाऊस नाका तसा बऱ्यापैकी लांब. आमच्याकडे कुठलेही वाहन पण नव्हते म्हणजे टू व्हीलर. फ्लॅट तळमजल्याला जिन्या समोरच दरवाजा दिवसभर सताड उघडा. इमारतीत येणाऱ्या जाणाऱ्यांना घरात डोकावण्यासाठी व आम्हाला घरात बसल्या-बसल्या येणाऱ्या-जाणाऱ्यांना आवाज देण्यासाठी. घराच्या मागील बाजूच्या खिडकीच्या खाली समोर गटार व दलदल कायम स्वरूपाची त्यामुळे सर्वत्र डासांचे साम्राज्य. त्या मुळे खिडकीला नेटलॉन जाळ्या तातडीने लावल्या. वनरूम किचनचा फ्लॅट.

**कधी कधी रक्ताच्या नात्यापेक्षा जोडलेली नाती श्रेष्ठ ठरतात. अशा जोडलेल्या नात्यांना जपून ठेवण्याची इच्छा असलेल्या संगीताच्या जीवनात आलेल्या संकटामुळे तिचे आयुष्य संपले पण तिच्या उपरोक्ष तिच्या संसाराची मात्र वाताहत झाली.**

आमचा एक शेजार म्हणजे त्या अपार्टमेंट ज्या जागेत बांधली त्या जमिनीचे मालक दिवाडकर त्यांचा फ्लॅट टू रूम किचनचा आजी आजोबा दिवाडकर व त्यांची मुलगी, जावई व मुलीचा मुलगा कुलकर्णी असा हा परिवार. दुसरा शेजार सावंत ते स्वतः घरात त्यांची पत्नी, एक लहान मुलगा व मुलगी.

आम्ही ज्या दिवशी सामान घेऊन दाखल झालो तेंव्हा दिवाडकरांच्या मुलीने म्हणजेच संगीता कुलकर्णीने आम्हास खूप सहकार्य केले. सामान घरात लाऊन होईपर्यंत मी व अश्विनीची जेवणाची सोय ही संगीतानेच केली. आमच्या दोघांच्या स्वभावामुळे आम्ही दोनच दिवसांत सर्व अपार्टमेंटमध्ये संबंध प्रस्थापित केले सावंत, जाधव, पवार, घरातील म्हणजेच आमची आधीपासूनची ओळख. इतरांशीही चांगले संबंध जुळले. पण सर्वात घरोबा म्हणण्या इतपत घरोबा संगीताच्या कुटुंबासोबत झाला. त्यावेळेस संगीताही साधारणतः तिशीची दिसावयास जेमतेम, फार सुंदर नाही. पण मला विचाराल तर मला सर्वच स्त्रिया सुंदर वाटतात. संगीताचा नवरा श्री. कुलकर्णी त्याची प्रकृती एकदम किरकोळ, काटकुळा, बारीक म्हणावयास हरकत नाही. आरोग्यही तितके चांगले नाही. कायम छोट्या-मोठ्या आजाराने ग्रस्त. कुठेही नोकरीस जातांना मी कधी त्या माणसाला बघितले नाही. घरीच बसून अकौंटस्ची कामे करतो असे तो म्हणत असे.

तेवढ्याच घरात दिवाडकर आजी आजोबा व संगीताचा वेग-वेगळा संसार. म्हणजेच चुली निराळ्या. आजी आजोबांनाही उत्पन्नाचे साधन काही नव्हते जमिन विकून फ्लॅट व्यतीरिक्त काही पैसे मिळाले असतील तर तेवढेच नाही म्हणायला संजय गांधी निराधार योजनेच्या ५०० रू.ची वाट बघत सारे कुटुंब असायचे. ते घर तसे झोपलेलेच आजी आजोबांकडून काय कष्टाची अपेक्षा करणार. आजी त्या दोघांपूरता काही तरी स्वयंपाक करीत असे. पैशाची कमतरता असल्याने कधी अर्धपोटी तर कधी उपाशी पोटी ही ते झोपत असतील असे मला वाटते. संगीताच्या संसारचे काही निराळे नव्हते. अश्विनीने आमच्या घरातील थोडे काम तिला दिले होते जेणेकरून तिला पैशाचा थोडासा हातभार लागेल संगीता एकच व्यक्ती तशी कामाची, पण पोटाला अन्न नसल्याने तिलाही इच्छा असूनही कष्ट होत नसत व मुळात तिला आमचे घर सोडून कुठेही, कुणाकडेही काम करावयास जाण्याची लाज वाटत असे कारण तिचे बालपण अतिशय सुखात आनंदात गेल होते पण आता नियतीने हीवेळ आणली होती. आमच्या घरीही ती काम करावयास तयार झाली ती अश्विनीने तिला खुप समजवल्यावर व आम्ही तिला कधी कामवाली म्हणून वागवीत नसू. अश्विनी आम्हा दोघांचा स्वयंपाक पाणी करू शकत होती नव्हे करीतही होती पण संगीताला थोड्या पैशाची मदत व्हावी म्हणूनच संगीतासाठी अश्विनीने काम निर्माण केले होते. तिलाही त्याची जाण होती अतिशय प्रेमाने, आपुलकीने ती आमच्याकडे काम करीत असे. खुप स्वाभिमानी होती, घरंदाज होती व त्या मुळेच तिचे आमचे जुळले होते कधी तिच्याबाबतीत आम्ही व्यवहार बघितला नाही की तिने काम करीत असतांना व्यवहारापूरतेच काम केले नाही. तिची खासियत म्हणजे अश्विनीच्या गैरहजेरीत म्हणजेच अश्विनी कधी काळी डोंबिवलीस गेली, मुलांना भेटावयास पांचगणीस गेली तर माझ्या जेवणाची ती विशेष काळजी घेत असे. तिला जाण होती म्हणून कितीही त्रास झाला तरी ती आपल समजून स्वयंपाक करीत असे. ती साधारणपणे आठवड्यातून एकदा संध्याकाळी नटूव थटून घराच्या बाहेर पडत असे शेजारी पाजारी तिच्या चारीत्र्याबद्दल काहीतरी बोलत असत. का कुणास ठाऊक मला कधी तसे वाटले नाही ती ही माझ्याशी कधी वेळ असेल तर मोकळेपणाने बोलत असे. शहरातील एका प्रतिष्ठीत व्यक्तीबाबत बोलतांना ती त्या व्यक्तिला एकेरी ने संबोधित असे ते मला थोडेसे खटकत असे पण तसे काही संबंध त्या व्यक्तीशी तिचे असतील असे जे लोक म्हणत त्यावर माझा विश्वास नव्हता. ती गरीब होती गांजलेली होती त्या मुळे तिची पैश्याची गरज अशी भागत असेल हा लोकांचा साधा सरळ तर्क मला मान्य नव्हता, नाही. स्त्रीवर

अशा पद्धतीचे आरोप करणे अतिशय सोपे.



माझे विचाराल तर मी कधीही तीच्याकडे त्या दृष्टीने पाहीले नाही. पण मी ही पुरुष ना. पण तरीही मला कधीही तिची माझ्याकडे बघण्याची दृष्टी तशी वाईट दिसली नाही. कदाचीत आपण जगाकडे कशा दृष्टीने बघतो त्या प्रमाणे ते दिसत असावे. तिचा मुलगा प्रथमेश युनायटेड इंग्लीश स्कुलमध्ये शिकत होता. हुशार होता. वडील त्याचा अभ्यास घेत असत. संगीताचे विश्व म्हणजे प्रथमेश. प्रथमेशच्या कौतुकाशिवाय ती काही बोलत नसे. तिला कशाला दोष द्यावयाचा जवळजवळ साऱ्याच स्त्रीयांना आपल्या मुलाचे भारी कौतुक असते. संगीताला तिच्या या मोडक्या-तोडक्या संसारात प्रथमेश एक तर मुलगा होता म्हणून व तो अभ्यासात हुशार होता म्हणून तीच एक जमेची बाजू होती. सांगा बर का नाही करणार ती त्याच कौतुक ?



एकदा अश्विनीला घरा मधील राघवेंद्र साहेबांच्या पत्नीने (साऊथ मधून आणलेली) खास अश्विनीला चांगली दिसेल म्हणून साडी तशी किमती आश्विनीने संगीताला दाखवली. संगीताने तिला ती साडी खूप आवडली असे व्यक्त केले. अश्विनीने ताबडतोब ती साडी तिलाच देऊन टाकली. प्रथम तिचा ह्या गोष्टीवर विश्वासच बसेना पण अश्विनीने तिला स्पष्ट सांगितले की मी साडी विशेष वापरतही नाही तू घे तुला चांगली दिसेल. सुरवातीस तिने साडी घेण्याचे टाळल्या सारखे केले. पण मनोमन तिला ती आवडली होती व सर्वात महत्त्वाचे म्हणजे साडी ही तिची गरज होती. तिला नजीकच्या भविष्यात नव्हे भविष्यातही कधीही अशी साडी खरेदी करणे अशक्य दिसत होते. अश्विनीचे वैशिष्ट्य म्हणजे, म्हणजे एक स्त्री असूनही साडी, ड्रेसेस, दागिने यात लोभ नाही. समोरील व्यक्तीच्या आनंदासाठी ती सहजपणे अशी दानशूरपणाची कृती करते. हा गुण मोठ्या अभावानेच स्त्री मध्ये आढळतो व अश्विनीच्या या गुणाचा मला अभिमान आहे.

नंदू पालशेतकर म्हणजे आम्ही ज्या फ्लॅटमध्ये रहात होतो त्या फ्लॅटचा मालक सेट्रल बँकेत शिपाई म्हणून कामावर. माझे खाते त्या बँकेत असल्याने माझे त्याचे चांगले दोस्तीचे संबंध. पण त्याच्या फ्लॅटमध्ये रहावयास आल्यापासून आमचे नाते बदलले होते तो मालक व मी भाडेकरू थोडक्यात काय तर आमचे संबंध बिघडले होते त्यामुळे ११ महिन्यानंतर तो आम्हाला राहू देणार नव्हता. माझा स्वत:चा या गोष्टीवर विश्वास नाही. पण या वास्तुत आल्यापासून माझ्या बसेस्च्या अपघातांची मालीकाच सुरु झाली होती. व्यवसाय सुरू झाल्यापासून अपघात ही गोष्ट मला माहित नव्हती. नव्यानेच या संकटाला मी सामोरे जात होतो. लोकांचे म्हणणे वास्तुत दोष आहे. वास्तु बदला. या अपार्टमेंटमध्ये आमचे सर्वांशीच मोठे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. आम्ही इथे आल्यावर कधी नव्हे ते सर्व सण एकत्रीतपणे धुमधडाक्यात साजरे झाले. नाहीतर या पूर्वी सर्वांची तोंडे जिकडे-तिकडे होती. लहान मुले तर जेवावयास आमच्याच घरी असायची असे सर्व असूनही हे घर सोडणे निश्चित होते कारण नंदू पालशेतकरने घर सोडावयास सांगितले होते व तसे ही घराची लोकेशन


मला गैर सोयीचीच वाटत होती. राहीला प्रश्न ह्या शेजाऱ्यांच्या प्रेमाचा, जिव्हाळ्याचा, ऋणानुबंधाचा. काय करणार भावनिक होऊन जमणारं नव्हत. आयुष्यात प्रथमच मी डोंबिवलीहून माझ्या आईला सोडून आलो होतो. आता हे असंच होत राहणार त्याला कोण काय करणार ? आमच्या या घर सोडून जाण्याने लहान मुलांना खूप वाईट वाटले ते त्यांच्या आई वडीलांना सांगत आपण पण हे घर सोडून भुस्कुटे काकींबरोबर जाऊ. संगीतालाही खूप दुःख झाले आमचा मोठा आधार होता तिला. आमचे घर सोडण्याचे दिवस जसे जवळ आले तशी ती खचलीच होती पण इतर लहान मुलांप्रमाणे ती व्यक्त करू शकत नव्हती. आम्हालाही दुःख होत होते. पण आम्हाला आमच्या विवंचना इतक्या होत्या की दुःख करण्यास वेळ नव्हता. मुलांचे रडणे त्यांचे दुःख बघवले जाणार नाही म्हणून आम्ही रात्री १०.३० वा. घरसामान शिफ्ट करण्यासाठी टेम्पो मागवला. पण मुले आमच्यापेक्षा हुशार ती जागी राहीली व खूप आक्रोश त्यांनी केला. अशी घरे चिपळूणात आम्ही अनेक वेळा बदलली पण सहा महिन्याच्या सहवासात एवढी भावनिक गुंतवणूक व नंतर जागा सोडताना पदरी आलेले दुःख आम्ही अनुभवले पहले व शेवटचे. सर्वात लक्षात राहिले ते संगीताचे अव्यक्त दुःख ती पुन्हा पुन्हा म्हणे याल ना परत मला भेटायला. या हं नक्की. आज ही त्या घटनेच्या आठवणीने डोळ्यात पाणी आले आहे. असे आपण अनेकदा अनुभवतो. आपण म्हणतो पुन्हा पुन्हा येऊ आम्ही भेटायला पण तसे होत नाही. आता घरच तिथे नाही तर कसे जाणार पुन्हा पुन्हा तिकडे. आम्ही तर आमच्या व्यापाने पुरते पिडलो होतो. त्या घराची त्या माणसांची आठवण काढण्यासही वेळ नव्हता. व कधी काळी आठवण झालीच तर तेव्हा रात्र असायची ती वेळ योग्य नव्हती त्यांना भेटावयास जाण्यासाठी. कारण आम्ही डोंबिवलीतून म्हणजे मुंबईच्या उपनगरातून आल्याने आमची रात्र उशिरा होत असे व चिपळूणमधील स्थानिक माणसांची रात्र, त्या तुलनेने खुपच लवकर होत असे.



आम्ही आमच्या व्यवसायाच्या व्यापात असतांना एकदा निरोप मिळाला संगीताचा नवरा गेला आम्ही ताबडतोब नाही पण आवर्जून संगीताला हाक मारून आलो. (हाक मारणे म्हणजे येथील बोली भाषा कुणी मयत झाल्यास त्या कुटुंबाचे सांत्वन करावयास जाणे.) संगीता पुरती हडबडली होती. नवरा काहीही कामाचा नव्हता. तरीही तिला तो आधार होता. भारतीय नारी दुसरे काय ? संगीताच्या मुलात प्रथमेश मध्ये अश्विनीचा जीव खूपच गुंतलेला तिचा संगीतासाठी खूप जीव तुटत असे. तिचा नवरा गेल्यावर काही काळ आमचे वरचेवर संगीताकडे जाणे येणे होते. शंगीताशी व तिच्या कुटुंबियांशी कुणाचेचे पटत नसे. आम्हीच असे एक होतो की आमचे त्यांचे चांगले सख्य होते. त्या अपार्टमेंटच्या लागूनचा प्लॉट व घर खंडझोडे नामक व्यक्तींचे होते. माझी तेथे रहावयास येण्या अगोदर पासूनची त्या कुटुंबाशी दोस्ती त्यामुळे

आमच्या येथे रहावयास येण्याने या इमारतीतील सदस्यांचे व खंडझोडेंचे वैरत्व कमी आले. खंडझोडे म्हणजे पारधी जमात मोठी उग्र जमात आहे ती. त्यांची चांगलीच दहशत आहे जनमानसात.

साई अपार्टमेंट सोडल्यानंतर साधारण वर्षभर आम्ही सागर प्रेसच्या मागे केळस्करांच्या चाळीत राहीलो सहा महिने पागेवर शंकर चिताळयांच्या शुभम बंगल्यावर व मग पागेवरच हायवेला आगवेकरांच्या घरात किमान ४-५ वर्षाच्या बोलीवर रहावयास गेलो. आगवेकरांकडे रहात असतांना संगीताची तब्येत ठीक नाही म्हणून निरोप मिळाला मी व अश्विनी नियमीत तिला भेटावयास जात असू पुढे पुढे तर तिने अंथरुणच पकडले. खंगत चालली होती ती. आधीच तिची शरीर यष्टी तोळा मासाची त्यात उद्‌भवलेल हे जीवघेण आजारपण. आजी-आजोबांना, संगीताला, प्रथमेशला आम्ही दिसलो की मोठ हायसे वाटे. आजोबा ते शब्दानेही प्रकट करीत असत पण बाकींच्याच्या चेहऱ्यावर ते स्पष्ट जाणवत असे. अपार्टमेंट मधील कुणाशीही पटत नसल्याने कुणीही संगीताकडे येत नसे. संगीताकडे तिच्या तब्बेतीची चौकशी करण्यास आम्हा उभयंता शिवाय कुणीही फिरकत नसे. संगीताच्या कुटुंबियांच्या, विशेषतः संगीताच्या विश्वात आम्हाला फार मोठे महत्त्वाचे स्थान होते. नव्हे तिचे सारे विश्वच आम्ही होतो. मलाही आता वाटत होते आज या संगीताच्या आजारपणात, या अडचणीच्या काळात तिच्या शेजारी रहावयास हवे होते आज खरी गरज तिला आमची आहे पण आता ते शक्य नव्हत नंदू पालशेतकराने त्याचा फ्लॅट विकला होता व फ्लॅट खरेदीदार स्वतः त्या फ्लॅटमध्ये रहावयास आले होते. त्या कुटुंबियांशी ही आमचे चांगले संबंध होते. प्रत्येक भेटीला आश्विनी संगीताच्या हातात ५०-१०० ची नोट देत असे. ती मागत नसे पण तिची गरज आम्हास समजत असे.



एक दिवस आम्ही निर्णय घेतला तिला झाले आहे तरी काय? गत आयुष्याच्या काही कृतींमुळे तिला एडस् तर झाला नाही ना? आम्ही तिचे नेहमीचे डॉक्टर भडभडे यांजकडे गेलो त्यांनी लॅब टेक्नीशियन मुशरीफ यांजकडे रक्त तपासा सांगितले. मुशरीफांनीही रक्त घेण्यासाठी माणूस संगीताच्या घरी पाठवला व रक्ताचे सॅम्पल घेतले. डॉ. भडभडे मुशरीफ दोघांनीही अतिशय चांगले सहकार्य केले.

दोघांनीही आमची पैसे देण्याची तयारी असूनही पैसे घेतले नाहीत. संगीताचे जेंव्हा तपासणीसाठी ब्लड सॅम्पल घेतले तेंव्हा संगीताने प्रथम रक्त देण्यास विरोध केला पण विरोध करण्याइतकी ताकदही तिच्याकडे

नव्हती. खूप काकुळतिला येऊन ती अश्विनीला म्हणाली, 'अश्विनी मी तशी नाही ग. तर काही नाही आहे तू तरी विश्वास ठेव माझ्यावर.' अश्विनीने तिला परोपरीने समजावले, 'बघ संगीता ब्लड टेस्ट फक्त त्याचसाठी होत नाही अनेक गोष्टी त्यात तपासल्या जातात. एडस् नसेलही पण तुला जर बरे करावयाचे असेल तर काय झाले आहे ते तरी कळावयास हवे नाही तर इलाज काय व कसा करणार? तू बरी होणार असशील, नाही प्रथमेशसाठी तरी तुला बरे व्हावेच लागेल. तर येईल तो खर्च मी करावयास तयार आहे तू काळजी करू नकोस.'

संगीता नेहमी संजय गांधी निराधारचे पैसे आले नाहीत म्हणून चिंता व्यक्त करीत असे. पैसे कीती तर ५०० रुपये. अश्विनीने प्रथमेश व घरासाठी चंदूकडे अर्धालिटर दूध व २ अंडी चालू केली. प्रथमेशला खाणावळ लावली. खाणावळ वाले श्री. चव्हाण यांनी एक महिना पैसे घेतले पण मग त्यांनी स्वतः प्रथमेशला घरी इतरांनाही पुरेल असा जेवणाचा डबा भरून देण्यास सुरुवात केली. प्रथमेश तेव्हा आठवीत होता. चव्हाणांनी त्यांस सांगितले तू थोड्यावेळ माझ्या खाणावळीत कामाला, मदतीला येत जा मी व अश्विनी चव्हाणांना भेटावयास गेलो तर ते म्हणाले, ''प्रथमेशच्या डब्याचे मला काही तुमच्याकडून पैसे नकोत. मी साध्या सगळ्यांना पुरेल असा डबा पाठवीत आहे

तुम्ही त्या कुटुंबासाठी इथे रहात नूसनही काय काय करताय मला माहित आहे. पण एक सांगू! या मुलास मी माझ्याकडे थोड्यावेळ जमेल ते काम करावयास ये म्हणून सांगितले तर त्याला काम करण्यात कमी पणा वाटतो आता काय तो लहान नाही मी काय डबा देतो म्हणून त्याला राबवून घेत नाही आहे भविष्यात त्याला काम करावयास लागणार आहे तर सुरवात येथून होऊ दे. त्याची आई त्याला काम करू नकोस म्हणून सांगते मला ही कळते. त्याचे शिक्षण चालू आहे. त्याला कळावे, काही काम केले तर हा सगळ्यांचा डबा आपल्याला मिळतोय कामाची आवड निर्माण व्हावी हाच उद्देश.'' अश्विनीने त्यांना सांगितले, ''तुम्ही सांगताय ते अगदी बरोबर आहे पण त्याच्या आईला आता काही समजावणे या परिस्थितीत ती नाही. ती ठीक असती तर माझे तिने ऐकले असते. पण आता या परिस्थितीत आपल्याला सगळे सांभाळायचे आहे. प्रथमेश तिचा विक पॉईंट. त्याला जेवणासाठी शिक्षणासाठी या वयात काम करावयास लागणे तिला कमीपणाचे वाटते. ती तिच्या मुलाचे नुकसान करीत आहे पण काही इलाज नाही.'' प्रथमेशने जन्मल्यापासून जगण्यासाठी काम करावयाचे असते हे कधी घरात बघितलेच नाही. त्यामुळे त्याचा फाजिल स्वाभिमान वाढीस लागला. आज काय वेळ आपल्यावर, आपल्या कुटुंबियांवर बेतली आहे हे कळण्याइतकी अक्कल त्याला नाही. त्याच्या उर्मट वागण्याचे तुम्ही काही मनावर घेऊन नका.''

संगीताची एच.आय.व्ही. टेस्ट निगेटीव्ह आली आम्हा दोघांनाही हायसे वाटले. संगीताला जेव्हा हे सांगितले तेव्हा आनंद व्यक्त करण्यासाठी तिची स्थिती नव्हती. बरे देह बोलीने आपल्याला काही समजेल म्हणावे तर देहबोली व्यक्त होण्यापुरताही तिचा देह शिल्लक राहिला नव्हता.

एक दिवस अश्विनी डोंबिवलीस जाणार म्हणून आदल्या दिवशी रात्री संगीताला भेटावयास तिच्या घरी गेली. न बघवण्यासारखे हाल तिच्या देहाचे झाले होते. शरीराची हालचालही होत नव्हती. आम्ही भेटावयास आल्याचा आनंद तेवढा तिच्या निस्तेज डोळ्यात दिसला. अश्विनीच्या बोलण्याला हुंकारही ती देत नव्हती पण ऐकत होती ती. अश्विनीने तिला सांगितले, ''बघ, संगीता तू काळजी करू नकोस, मी

घेईन प्रथमेशची काळजी.'' मला अश्विनीचे असे निर्वाणीचे बोल ऐकून कसेसेच झाले. माझ्याही मनात संगीता काही जगत नाही, हे तिच्या आजच्या अवस्थेमुळे लक्षात आले पण एवढ्या धिटाईने प्रकट करणे अश्विनीलाच शक्य ती अत्यंत व्यावहारिक व स्पष्ट बोलू शकते. निघतांना मरणासन्न अवस्थेत असलेल्या संगीताच्या हातात रु. २०० कोंबले. तिच्या निस्तेज डोळ्यातील ती चमक मी विसरू शकत नाही. नोटांच्या स्पर्शाने क्षणभरासाठी ती चमक तिच्या डोळ्यात तरळली होती. संगीताने कधीही कितीही आर्थिक अडचण असली तरीही आमच्याकडे पैसे मागितले नाहीत. तिने न मागताही वेळोवेळी अश्विनीने तिला पैश्याची मदत केली होती.

पण प्रत्येक अडचणीच्या वेळी आम्ही तिला भेटत असू असेही नाही. तिच्या देहबोलीत नेहमी हे व्यक्त होत असे की, कुणी सख्ख, कुणासाठी एवढकरीत नाही. एराढ तुम्ही करता त्यात पुन्हा तुम्हालाच पैसे मागावयाचे, न मागताही तुम्ही माझी अडचण समजून घेऊन पैसे देत आहात. संगीता खूप स्वाभिमानी तिने पैसे मागितले व फटकन अश्विनीने नाही मिळणार म्हणून सांगितले तर तिला ते सहन होण्यासारखे नव्हते. तिला पैश्याची खूप अडचण असतांना देखील ती पैसे मागत नव्हती. म्हणूनच कदाचीत आम्ही तिला मदत करीत असू.

अश्विनी ठरल्याप्रमाणे सकाळीच डोंबिवलीस गेली मी माझ्या व्यावसायिक दिनक्रमात व्यस्त झालो. संध्याकाळी ४च्या सुमारास मी ४.३०च्या ट्रीपच्या निमित्ताने घराबाहेर पडत होतो व फोन घणघणला मी पुन्हा घरात येऊन फोन घेतला. ''हॅलो भुस्कुटेभाऊ प्रथमेशची आई गेली, तुम्ही या ताबडतोब.'' साई अपार्टमेंटमधून जाधव वहिनींचा फोन होता. क्षणभरासाठी मी पूर्ण ब्लँक झालो मी कुठे निघालो होतो हेच विसरून गेलो मी. थोड्याच वेळात मी सावरलो. ४.३० च्या ट्रीपची जबाबदारी माझ्या सहकाऱ्यावर सोपवून मी संगीताच्या घरी जाण्यास निघालो. प्रथम मी एम.ए.टी. घेऊन आमदार रमेशभाई कदम यांच्याकडे गेलो. ते मुंबईस गेले होते. आमदारीण घरी होत्या त्यांना सांगितले संगीता गेली. त्यानी त्वरीत पुढच्या कारवाईसाठी कुणाला तरी पाठवते म्हणून सांगितले. मी साई अपार्टमेंटला पोहचलो. इमारतीतील पुरुष मंडळी कामावर बायका संगीताच्या घरा समोर उभ्या.

मी पोहोचल्याबरोबर त्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. संगीताला कुणी नातेवाईक नसल्याने कुणाची वाट बघण्याचा प्रश्न नव्हता. मी कामाला लागलो. मी संगीताच्या घरातून बाहेर पडलो तर रस्त्यावर दोन तरुण मोटर सायकलवर बसलेले दिसले. त्यांनी मला बोलावले मी त्यांच्यापाशी गेलो तसे ते म्हणाले, ''तुम्ही आहात ना? ठीक आहे.'' मी उलट प्रश्न केला तुम्ही कोण तर उत्तर मिळाले. या वॉर्डाचे नगरसेवक सचिन कदमांनी आम्हाला पाठवले होते. आम्ही निघतो म्हणून ते निघून ही गेले. माझे काही ऐकावयाच्या आत. मी एमएटी काढली व थेट बाजारपेठेतील मंदिरात क्रीया कर्म करावयास गुरव मिळतो का बघावयास येथे चौकशी करीता गुरव उपलब्ध होण्याची चिन्हे दिसेनात मग तेथेच मयताचे सामान घेण्यास कोळवणकरांच्या दुकानात गेलो तेथील मुलाने मयत व्यक्ती कोण आहे स्त्री, पुरुष ब्राह्मण की इतर. त्या प्रमाणे खर्च सामान पटापट काढून दिले. त्याने मयत व्यक्तीशी माझे नाते विचारले मी सांगितले, 'शेजारी' काय माहित त्याने माझ्या तेथील वागणूकीत काय बघितले वा निरिक्षण केले. त्याने सामानाचे पैसे घेण्यास नकार दिला. तो मला ओळखत असण्याची कुठलीही शक्यता नाही. मी पुन्हा एकदा पैसे देऊ केले

तर तो म्हणाला, "जा आता." हा मुलगा लहान होता मी त्याला म्हणालो, "तुझा हा व्यवसाय आहे तु पैसे घे" या मिशन दरम्यान चिपळूणात मला दिसलेला माणूसकीचा झरा नुसते. पैसे घेतले नाही म्हणून नव्हे तर त्याचे त्या वेळेसचे बोलणे वागणे अन्यथा व्यापारी मग तो कसलाही व्यापारी असो काऊंटरवर उभा राहिला की सर्व विसरतो तो एकच जाणतो पैसा. मी त्वरेने खरे आजोबांकडे निघालो. खरे आजोबा नव्या विहीरीजवळ राहतात. त्यांच्याकडे रामतीर्थावरील मयतास जाळण्यास लागणाऱ्या लाकडाचे पैसे जमा करावयाचे व मग ते रामतीर्थावरील ज्या खोलीत लाकडे आहेत त्याची किल्ली देतात त्या प्रमाणे मी पैसे जमा करून किल्ली घेऊन आलो. मग मी ॲम्बुलन्स शोधावयास बाहेर पडलो देवळेकरांची ॲम्बुलन्स उपलब्ध नव्हती. निहार मेडीकलला गेलो तर त्यांच्याकडे ॲम्बुलन्स उपलब्ध होती. त्यांनी 'कशासाठी हवी' विचारले तर मी सांगितले कविळतळीहून रामतीर्थावर प्रेत हलवण्यासाठी. त्यांनी विचारले, 'पैसे कोण देणार ?' 'मी देणार' मी रु. ६०० तेथे जमा केले.

तो पुटपुटत होता. ट्रीप झाल्यावर अशा परिस्थितीत कुणाकडे पैसे मागणार व कोण देणार हे पैसे. मला हे सर्व ऐकत बसण्यास व त्यास उत्तर देण्यास वेळ नव्हता. ॲम्बुलन्स मुळे संगीताला रामतीर्थापर्यंत हलवण्याचा प्रश्न मिटला होता मी साई अपार्टमेंटला ॲम्बुलन्स सोबत पोहोचलो. मी ह्या सर्व गोष्टींची पुर्तता करण्यात खुप वेळ घालवला होता. साई अपार्टमेंट मधील परिस्थिती जैसे थे होती कुणीही अंतयात्रेसाठी आले नव्हते. जमले नव्हते. एक गोष्ट होती आता माझ्यासोबत ॲम्बुलन्स होती व त्याचा चालक होता. चालक अठरा वर्षाच्या आतील मुलगा होता. तो ही तेथील परिस्थिती अनुभवत होता. ५-६ बायका सोडून अन्य कोणी तेथे उपस्थित नव्हते. सर्व निर्णय मलाच घ्यावयाचे होते.
अश्विनी डोंबिवलीस गेल्याने माझ्या सोबत ती ही नव्हती. अन्यथा ती व मी आम्हाला जगातले कुठलेही काम अशक्य नाही. ती बोलकी असल्याने तिचे सर्व गावभर संबंध या उलट माझे मी कामापुरताच बोलतो व त्यात हा प्रसंग संगीताचा मृत्यू. संगीता २० किलोची राहिली होती. आता तिला ॲम्बुलन्स पर्यंत हलवायचे होते. तिच्या निस्तेज चेहऱ्याकडे, शरीराकडे बघून मला दुःखाने उचंबळले. आत्तापर्यंत मी धावपळीत होतो. बायका बाहेर मुसमुसत होत्या. मला माझ्या दुःखावेग आवरायलाच हवा होता. मी खोलीतून बाहेर आलो. ॲम्बुलन्स चालकास विनंती केली की प्रेत हलवण्यास मदत करशील का ? तो थोडा घुटमळला पण तो ही बघत होता मी आणि तो सोडून कुणी पुरुष तेथे नव्हता. मी त्यास विनवणी केली हवे तर तुला या कामाचे निराळे पैसे देईन तो ओशाळला मला म्हणाला, "असं का म्हणता काका." त्याला ॲम्बुलन्सच्या भाडे घेतानाचा प्रकार चुकीचा होता हे येथील परिस्थिती बघून लक्षात आलं होतं व म्हणूनच काका, आत्ता आपली मदत मागताना पैसे पुढे करीत आहेत. तो माझ्या सोबत

संगीताच्या घरात आला चादरीची पायाकडील दोन टोके त्याने पकडली व डोक्याकडील चादरीची दोन टोके मी पकडली वजन काही नव्हतेच, स्वाभिमानी संगीताच्या मृत्युनंतर तिला तिरडी ही नशिबात नव्हती. ॲम्बुलन्समधे संगीताचे शव ठेवण्यात आले. दरवाजा बंद करण्यात आला. "मी एमएटीने येतो रामतीर्थावर, तु ॲम्बुलन्स घेऊन येशील ना ?" असे चालकास विचारले असता तो 'हो' म्हणून निघालाही. मी व तो साधारणपणे रामतीर्थावर बरोबरच पोहचलो. मी लाकडाच्या खोलीचे कुलुप उघडले व प्रेत जाळतो त्या रॅम्पवर लाकडे

रचण्यास सुरुवात केली. त्या चालकाने न सांगताच लाकडे आणावयास सुरुवात केली. लाकडे फार लागणार नव्हती कारण संगीतात जाळण्यासारखे काही शिल्लकच नव्हते. खरे आजोबांनाही मी म्हणालो की मला जास्त लाकडे लागणार नाहीत. तुमचा खंडीचा हिशोब इथे लावू नका पण ते म्हणाले जास्त घ्या कमी घ्या रु. २५० भरावेच लागतील. रु. २५० हा माझ्यासाठी प्रश्न नव्हता. संगीताचे पार्थिव चादरीसकट सरणावर ठेवले. गुरव नसल्याने गुरव म्हणजे ब्राह्मण नसल्याने अंत्य विधी होणार नव्हते. संगीताला मुलगा असूनही तो अग्नी देण्यास आला नव्हता. संगीताचे शव जेव्हा ॲम्बुलन्समध्ये ठेवले तेव्हा मी प्रथमेशला, "स्मशानात चल अग्नी द्यायला" बोललो त्याच्या आजीने स्पष्ट सांगितले, "तो येणार नाही, तो लहान आहे त्याची मुंज झाली नाही." मी सांगितले मी काही हे मानत नाही.



बायका मुलग्याला जन्मच देतात मुळी अग्नी द्यायला तो हवा म्हणून तर येथे संगीताचा प्रथमेश असूनही अग्नी द्यावयास येण्यास तयार नाही. या प्रसंगी आजीला समजावणे अशक्यप्राय होते. अग्नी देणार तेवढ्यात एक रिक्षा आली रिक्षा चालक व सोबत एक व्यक्ती. आमदारांनी पाठवलय सांगत. ती व्यक्ती म्हणजे मोडक होता रिक्षा युनियनचा एकेकाळी अध्यक्ष होता. आमदारांचा निष्ठावान कार्यकर्ता व अट्टल बेवडा आत्ताही तो दारू प्यायला होता. संगीताच्या अंत्यविधीसाठी आणलेले सर्व सामान कफनमधे गुंडाळून तसेच सरणावर ठेवले. मोडकने संगीताच्या नाकातील सोन्याची चमकी काढून माझ्या हाती दिली. व काहीही सोपस्कर पुरे न करीता संगीताला अग्नी दिला. त्याच दरम्यान आमच्या अपार्टमेंटमधील जाधव व एक दोघेजण रामतीर्थावर दाखल झाले व अग्नी दिल्यावर आम्ही जे काही चार सहा जण होतो ते जाण्यास निघालो ॲम्बुलन्स चालक माझ्या सोबत थांबला होता तोच तर माझा हवालदाराचा असल्यासारखा होता. मोडकने रु. २०० ची माझ्याकडे मागणी केली मी म्हटले, "कशाबद्दल?" मोडक रिक्षेवाल्याला भाडे द्यावयाचे आहे व मी आल्याबद्दल, तुमची ही कोण लागते,

तुझे तिचे जे नाते आहे तेच माझे तिचे नाते आहे. मोडक, म्हणजे तुमची ती कुणीच लागत नाही बरे तर १०० रुपये तरी द्या. ॲम्बुलन्स चालक हा ओंगळवाणा प्रकार पहात होता. मी रु. १०० मोडकला देऊ केले व त्याच्यापासून पिच्छा सोडवला. ॲम्बुलन्स चालक माझी परवानगी घेऊन निघून गेला. जाधव व इतरही मला सांगून निघाले. मी ही निघालो. मी साई अपार्टमेंटमधे येऊन संगीताच्या वडीलांना उद्या राख आणावयास स्मशावावर जा म्हणून सांगितले तर ते म्हणाले तुम्ही या. संगीताच्या नाकातील सोन्याची चमकी नीट स्वच्छ करून घेतली व अश्विनीने आमच्याकडे घरकामास येणाऱ्या मिनाला ती दिली.

तर असे हे संगीताचे जाणे. मला भाऊ म्हणावयाची तसे प्रेमाचे संबंध तिचे अश्विनीशी. पण संगीताने हे जग सोडून जाताना या मुहँबोली भावाकडून, म्हणजेच माझ्याकडून सारे काही करून घेतले. ते ही हक्काने, हट्टाने तो तिने ती जिवंत असताना स्वाभिमान पोटी गाजवला नाही. तिच्या नशिबाचे काय म्हणावे. तिरडी नाही, नवरा अगोदर गेल्याने अखंड सौभाग्यवती म्हणून मरण नाही, चार खांदे नाही. तर ते रामतीर्थ प्रवास ही एकटीनेच केला स्वतः ब्राह्मण असूनही कुठलेही विधी नाही. मुलगा असूनही मुलाच्या हातून अग्नी नाही. नाही म्हणायला एक जमेची बाजू होती तिच्या नशिबी. हा डोंबिवलीहून आलेला, साधारणपणे सहा महिने शेजारी म्हणून राहीलेला हा मुहँबोला भाऊ तीच्या अखेरच्या प्रवासात दोन पावले लाभला.



सर्व आटपल्यावर मी घरी आलो. अश्विनिला कळवले, 'संगीता गेली.' संगीता आता जगत नाही हे आम्हा दोघांना माहित असूनही मला संगीता गेली सांगताना व अश्विनिला ते ऐकताना अपार दुःख झाले. आम्ही दोघे ही स्तब्ध. मग अश्विनीनेच सुरवात केली म्हणाली, "कालच आपण तिला भेटलो तेंव्हाच मी तिची आशा सोडली होती व म्हणूनच मी ओळखले हिचा जीव प्रथमेश मधे घुटमळतोय मरण आलय पण येत नाहीये मी शब्द दिला प्रथमेशची काळजी करू नकोस मी संभाळेन त्याला आणि ती जीव सोडण्यास तयार झाली तिचा माझ्यावर विश्वास मी बोलले म्हणजे मी संभाळेन प्रथमेशला आणि मग ती चोवीस तासही थांबली नाही. मी हवी होते रे आज तिथे" मी ही मला संगीता गेल्याच फोन आल्यापासून आतापर्यंत काय घडले इत्यंभुत सांगितले व फोन खाली ठेवला.

डोंबिवलीत अश्विनी माणसात होती. मी तर इथे एकटाच होतो. संगीताच्या मृत्युच्या दुःखाने माझे मन विदीर्ण झाले. मला तर वाटते असेच एखादे अतीव दुःख माझा जीव घेईल.

अश्विनी तातडीने चिपळूणला आली. तिला माझ्या व मला तिच्या आधाराची या क्षणी खुपच गरज होती. दुसऱ्याच दिवशी संध्याकाळी मी व अश्विनी संगीताकडे गेलो. कुडाळहून प्रथमेशचे काका-काकु परिवार आला होता. प्रथमेशचे वडील प्रथम वारल्याने तसे कुडाळच्या कुलकर्णीचे नाते तसे संपुष्टात आलेल. पण तरीही भावाची बायको वारली कळल्यावर ते आले होते. रामतीर्था वरून संगीताच्या अस्थी त्यांनी आणल्या होत्या. प्रथमेशच्या आजीला त्यांच्या येण्याचाही त्रास जाणवत होता. पण एकुण बोली चाली वरून मला ते बरे वाटले. मी व अश्विनी प्रथमेशचे काय? यासाठीच तेथे गेलो होतो. आम्ही प्रथमेश बाबत आम्ही काय ठरवलय ते सर्वांसमोर विशद केले. आम्ही त्यांस आमच्या घरी घेऊन जातो हे

वर्ष येथील शाळेतच काढू आमच्या मुला प्रमाणेच त्याला आम्ही सांभाळू. हे बोलण्याची खरे तर आम्हाला गरज नव्हती.

आजोबा पुरेपुर जाणत होते. पुढील वर्षी त्याला चिखलमावला रेणू व राजा दांडेकरांच्या शाळेत दाखल करू. रेणू दांडेकर म्हणजे लोकमान्य टिळकांची नात. आमचे त्यांचे जवळकीचे संबंध प्रथमेश आधीच हुशार आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तो अधिक हुशार होईल एकदा दहावी चांगल्या टक्क्याने पास झाला की मग डिप्लोमा डीग्री असे साध्य करू व संगीताचे स्वप्न पुरे करू. आमचा प्रस्ताव ऐकून प्रथमेशचे काका-काकु भारावले असे होणार असेल तर आमची काही ना नाही अन्यथा आज आम्ही प्रथमेशला कुडाळला घेऊन जाण्यास आलो होतो. आमची मुलेही त्याच्या वयाची, बरोबरची आहेत. शिकेल तो एकात एक आम्ही जेवढ शक्य आहे ते सार त्याच्यासाठी करु तुम्ही कधीही आमच्याकडे येऊ शकता बघू शकता आम्ही कधी काळी त्याला आजी-आजोबांना भेटावयास पाठवत जाऊ. प्रथमेशच्या आजीचा म्हणजेच संगीताच्या आईचा कुडाळ प्रस्तावावर सक्त विरोध होता. कारण प्रथमेशचे बाबा जीवंत असताना व ते गेल्यावरसुद्धा त्यांचे ह्या घराशी काहीही संबंध नव्हते. त्यामुळे त्यांच्या प्रस्तावा दरम्यान आजी मधून मधून विरोध दर्शवण्यासाठी फुरफुरत होती. ते म्हणाले ठीक आहे आमच्याकडे नसाल पाठवत तर नका पाठवू पण यांच्याकडे तरी पाठवा म्हणजे आमच्याकडे आजोबा आमच्या प्रस्तावास अनुकुल होते. पण आजी टणक व ते थकलेले त्यांचे काहीच चालत नव्हते. आजीने आमच्या प्रस्तावासही विरोध केला ''मी नाही पाठवणार माझ्या नातवाला कुणाकडे तोच तर हे आता आमची म्हातारपणाची काठी.''



अश्विनीने स्पष्ट सांगितले आजी, आजोबा तुम्ही नुकसान करत आहात तुमच्या नातवाचे ते ही तुमच्या स्वार्थापोटी त्याचे पुरे आयुष्य पडले आहे समोर त्याला शिकु द्या. आणि तुम्ही कोणत्याला आमच्यापासून हिरावणारे मुलीचा मुलगा तो त्यावर पहिला अधिकार काका-काकुचा, आमचा तो आता काही लहान नाही कळतच त्याला सार आता. काय रे प्रथमेश जाशील ना काका-काकुकडे शिकायला कुडाळला तुझ्या बरोबरीची मुलेही आहेत तेथे. त्याने त्याबाबत नाराजी दर्शवली साहजिकच होते त्याची विशेष ओळख नव्हती त्यांच्याशी. पण मग आमच्याकडे येण्यासाठी तर तुला काहीच अडचण असण्याचे कारण नाही. चल तू माझ्याकडे आजी आजोबाकडे पण जाता येता येईल येथून बघू त्यांना काय हव नको ते अन्यथा ते ही आपल्या सोबत येत असतील तर त्यांनाही

येऊ देत. प्रथमेश परक्यासारखा आजीच्या मागे जाऊन उभा राहीला आजीला नेमके तेच फावले.

अश्विनीचा हा पवित्रा प्रथमेशला ते कोण रोकणारे फोल ठरला होता. प्रथमेशवर अश्विनीने एवढा जीव लावूनही तो बेईमान झाला होता. त्याला त्याचे भले बुरे समजत नव्हते. आता तरी आजी आजोबांबरोबर राहीले तर शाळा नाही. अभ्यासाचा घोर नाही काही, काही नाही. त्याला तरी दोष का द्यावयाचा त्याच्या घरात तो काय शिकला होता. आजी फटकळपणे प्रथमेशला संरक्षण देत होती. आजोबा आमच्या बाजूने बोलले तर त्यांनाही ती फटकारत होती. प्रथमेशचीच आम्हाला साथ नव्हती तर आम्ही तरी काय करणार होतो. अश्विनीचे मानसिक संतुलन ढळले होते आजीला त्राग्यापोटी अद्वातद्वा बोलली व आम्ही घरातून बाहेर पडलो. कुडाळचे काका म्हणाले ठीक आहे मग आम्हीही आज निघतो. कुडाळला. अश्विनीची काही ऐकून घेण्याची मन:स्थिती नव्हती आजोबांना आमचे हे असे जाणे मानवणारे नव्हते. आमच्या येण्याजाण्याने त्यांना पाच पन्नास रुपयाची मदत होत असे. अश्विनीने तर खाणावळीचा डबा, चंदू कडचे दूध अंडी बंद करते म्हणून सांगितले, तुमच्याच हिताचे सुद्धा तुम्ही आमचे ऐकत नाही तर आम्ही तुमच्यासाठी हे सारे का करावयाचे? असे बोलून अश्विनीने रस्ता गाठला व मी ही सोबत निघालो हा अश्विनीचा त्रागा योग्यच होता कारण संगीताला प्रथमेशची काळजी करू नकोस. मी करेन त्याचे सर्व काही असा शब्दही अश्विनीने दिला होता व त्यानुसार तिने जीव सोडला होता. संपले संगीतापर्व आज या क्षणी तरी आमच्या दृष्टीने संपले होते. फटकारत होती. प्रथमेशचीच आम्हाला साथ नव्हती तर आम्ही तरी काय करणार होतो. अश्विनीचे मानसिक संतुलन ढळले होते आजीला त्राग्यापोटी अद्वातद्वा बोलली व आम्ही घरातून बाहेर पडलो. कुडाळचे काका म्हणाले ठीक आहे मग आम्हीही आज निघालो. खुडाळला. अश्विनीची काही ऐकून घेण्याची मन:स्थिती नव्हती आजोबांना आमचे हे असे जाणे मानवणारे नव्हते. आमच्या येण्याजाण्याने त्यांना पाच पन्नास रुपयाची मदत होत असे. अश्विनीने तर खाणावळीचा डबा, चंदू कडचे दूध अंडी बंद करते म्हणून सांगितले, तुमच्याच हिताचे सुद्धा तुम्ही आमचे ऐकत नाही तर आम्ही तुमच्यासाठी हे सारे का करावयाचे? असे बोलून अश्विनीने रस्ता गाठला व मी ही सोबत निघालो हा अश्विनीचा त्रागा योग्यच होता कारण संगीताला प्रथमेशची काळजी करू नकोस. मी करेन त्याचे सर्व काही असा शब्दही अश्विनीने दिला होता व त्यानुसार तिने जीव सोडला होता. संपले संगीतापर्व आज या क्षणी तरी आमच्या दृष्टीने संपले होत. पुढे साधारण दोन



वर्षांनी एका सामाजिक केसच्या निमित्ताने मी व अश्विनी रात्री दोन वाजता चिपळूण पोलीस स्टेशनला होतो. तेव्हा दिवाडकर आजोबा तेथे आले होते खुपच थकलेले. आम्ही पोलीस स्टेशनमधे या वेळेस येण्याचे कारण विचारले असता ते म्हणाले, “काय सांगू आम्ही रोजच्या खाण्यापिण्याची भ्रांत म्हणून तो फ्लॅट विकला घरात रोख सत्तर हजार होते ते घेऊन प्रथमेश घर सोडून पळाला त्याला संगत चांगली नाही तो शिकत नाही त्याला वाईट नाद लागले आहेत त्याची तक्रार देण्यासाठी आलोय.” पोलीसांनी आजोबांना विचारले तुम्ही कसे ओळखता मुस्कुटेंना तर आजोबा म्हणाले, “यांचे अनंत उपकार आहेत आमच्यावर.” अश्विनी म्हणाली “हे उपकाराच बोलण पुरे झाले प्रथमेशला माझ्या सोबत पाठवल नाहीत म्हातारपणाची काठी ना ती? पडली ना डोक्यात. नातवाचे वैरी आहात तुम्ही. तुम्ही माती केली प्रथमेशच्या आयुष्याची. भोगा आता.” मी अश्विनीला अग थांब थांब म्हणत होतो पोलीस ही ऐकत होते अश्विनीचा हा त्रागा प्रथमेशवरील प्रेमापोटी होता. आजोबांना दोष देण्यात अर्थ नव्हता व त्यांना हे सर्व ऐकवण्यात ही अर्थ नव्हता. या सर्वांस जबाबदार होती ती आजी. पण अश्विनीला काय आजोबा समोर भेटले केले मन मोकळे. परत अश्विनी प्रथमेशचा कुठे ठाव ठिकाणा लागतोय का असा प्रयत्न करीत होती. कविळतळीत गेली की चंदूकडे चौकशी करीत असे. तो सांगे कशाला त्याच्यात जीव अडकवताय वहीनी तो आता कामातून गेलाय काही शोधू नका त्याला पुढे दोन वर्षांनी कळते साठे संकुलमधील स्वामी समर्थ किराणा मालाचे दुकानात तो कामास आहे. म्हणून महतप्रयासाने एकदा आम्ही त्या दुकानात गेलो. काऊंटरवर दुकान मालकाकडे प्रथमेशची चौकशी केली ते म्हणाले, “मॅडम तुमचा त्याचा काय संबंध?” अश्विनीने थोडक्यात त्यांना सांगितले तेही तेच म्हणाले, “प्रथमेशच्या प्रेमात पडू नका तो आता तुम्ही बघितलेला, तुमचा प्रथमेश राहिलेला नाही तो पार बिघडलाय कामातून गेलाय सर्व नाद आहेत त्याला चुकुनही त्याल घरी नेण्याचे मनात आणू नका” त्यांनी प्रथमेशला बाहेर बोलावले अश्विनीने प्रेमाने प्रथमेशला हाक मारली त्याने तिला ओळखले तो आता मोठा झालाय तो गोंडसपणा राहिला नाही. त्याने जोरात रडावयास सुरुवात केली व रडत रडतच अश्विनीला म्हणाला, “आत्ता येतेस होय? माझी चौकशी करायला इतके दिवस कुठे होतीस?” व दुकानाच्या आतील बाथरूममध्ये कडी लावून रडत बसला.



दुकानदाराला पण हे सर्व अनपेक्षीत होते. अश्विनी त्याला बाहेरूनच म्हणाली मी तुला घ्यायला

आलेय अजूनही वेळ घेलेली नाही, चल तू माझ्या घरी. माझा मोबाईल नंबर शेठकडे टेवते तू फोन कर मला. व आम्ही दुकानदारांना फोन नंबर देऊन घरी निघालो. त्या आठवड्यात एक-दोनदा अश्विनीला प्रथमेशचा फोन आला पत्ता विचारला त्याने. पण घरापर्यंत तो कधीच आला नाही.

आजही अश्विनी प्रथमेशीची वाट बघतेय. तिला प्रश्न सतावतोय संगीताला काय सांगू प्रथमेश कसा आहे. म्हणून आज मी व अश्विनी एच.आय.व्ही. पॉझीटीव्ह लोकांमध्ये काम करतो. ह्या अशाच पद्धतीने, माझे एक सुपरीचीत जोडपे मरण पावले व सर्वात महत्त्वाचे या आजाराविषयी जी माहिती मला उपलब्ध झाली त्यानुसार संगीता एडस्नेच गेली या निष्कर्षाप्रत मी पोहचलो आहे. व त्यावेळेस जेव्हा संगीताची एच.आय.व्ही टेस्ट झाली तेव्हा मुशरीफांनी ब्लड रिपोर्ट डॉ. भडभडेंकडे पाठवला व आम्ही जेव्हा ब्लड टेस्ट बाबत डॉक्टरांकडे विचारणा केली त्यानुसार वेळी गोपनीयता या सदराखाली आम्हाला खरा रिपोर्ट सांगितला नाही.



तीच्याशी बोलतांना मिळालेल्या दुव्यानुसार, मी संगीतावर आरोप करीत नाही पण तर्क करीतो की, संगीता जी नटून थटून घराबाहेर पडावयाची, तिला तो लब्धप्रतिष्ठीत व्यक्ती स्वतः वापरत नसे तो त्याची सरकार दरबारी, त्याच्या आर्थिक लाभाची, राजकीय स्वार्थाची कामे साधून घेण्यासाठी तिला पाठवत असे, पुरवत असे, वापरत असे व त्या मोबदल्यात फार काही संगीताच्या पदरात पडत नसे. ती सर्व बाबतीत संगीताला मुळीच दोष देणार नाही याला जबाबदार, याला कारणीभुत हा समाज आहे. पुरुषरुपी, नररुपी लांडग्यांचा समाज त्यात तुम्ही, आम्ही पण दुरान्वयाने आलोच कुठल्या स्वाभिमानी, घरदांज स्त्रीला असे मनापासून करावयास वाटेल? किमान या पुढे तरी आपल्या बघण्यात अशी संगीता आली तर तिला हे का करावयास लागत आहे त्याच्या मुळापर्यंत जाऊन ती तिची समस्या समूळ नष्ट करावयाचा प्रयत्न करू या. जागरूक राहू या व प्रत्येकाने एक तरी संगीता, ही संगीता होण्यापासून वाचवू या!

## झणझणीत विनोद

**शिक्षक : मुलांनो, उद्या गृहपाठ न केल्यास कोंबडा बनवेल.**

............................

**बंड्या – ओके सर, पण जरा झणझणीत बनवा.**

# काव्यसृष्टी

## दु:ख रामाचे

पती जरी मी सीते जगती,
मी राजा आयोध्येचा
निर्मल असो भार्या
म्हणून आदर जननिंदेचा

राजधर्म जगी पाळण्या
जरी वनी धाडिले तुला
तुझी मूर्ती मनी स्थापिली
नित वंदन तुज निर्मला

गर्भार तू तुला त्यागिले
चित्र तुझेच दिसते शयनी
अडविले ना तुला क्षणभर
अश्रू जरी दाटती नयनी

काय म्हणावे या कर्माला
न्याय कसा असे आंधळा
विधीलिखित कुणा उमगले!
आंधळाच खेळ सगळा

मर्यादापुरुषोत्तम मी,
म्हणतो मज पाषाणह्रदयी
रामावतार राहील सदा
आदर्श जगती जनह्रदयी

**-प्रा.अरुण सुका पाटील**



## दूरून कुठून आले

दूरून कुठून आले
मधुर सूर बासरीचे
विरहात गुंतलेले
खुलले रुप हसरीचे

क्षण ते वृंदावनातले
अद्‌भूत रास लीलेचे
पानं  न फुल शहारले
मंतरलेल्या वेलींचे

प्रतिबिंब ते पाण्यातले
उतरले तिच्या मनीचे
हे निरागस प्रेमातले
रुप होते त्या क्षणीचे

असेल कसे वेगळे
प्रेम त्या शामल हरीचे
राधेतच असे गुंतलेले
मधुर सूर बासरीचे

**- डॉ शीतल  मालूसरे**

# शेतातील मासे

शेतकऱ्याना करून एकत्र, शेअर करती गोळा
काढून साखर कारखाना, ठेवी सत्तेवर डोळा!!
सभासद म्हणे आसतो, कारखान्याचा मालक
कारखान्यात त्याची लायकी, आसते शुल्लक!!
सभासदांच्या पैशावर होती, हे साखर सम्राट
गाड्या यांच्या सुटती, त्यांच्या समोरुन सुसाट!!
हेच शेतकऱ्याचे कैवारी, बनती साखर उत्पादक
शेतकऱ्याना बुडवून बनती, उत्तम प्रशासक !!
दर मागती साखरेला, उत्पादनावर आधारीत
ऊस नेती पुका पासरी, राखेच्या किमतीत !!
साखर विकती रोखीने, बफर स्टॉक ठेवुन
ऊस दर मागीतला, जाती अंगावर धावून!!
सहकाराचे महामेरू, हे बहुतजनांचे आधारू
कारखान्याच्या नफ्यातुन, लावती नारळ,पेरू!!
काढल्या जातात शाळा, ठेवुन फी वर डोळा
नफा टाकती विभागुन, आसा तोळा तोळा !!
दर मागता ऊसाला, ना जमत खरचाचा मेळ
कारखान्याचा मालक, उत्पादक रोज खाई भेळ!!
ऊसाला दर मिळत नाही, होते बळीची लुट
काढला कुणी मोर्चा तर, पाडतात हे फुट !!
मला तुम्ही सांगा, हे शेतकऱ्याचे कैवारी कसे
गळ टाकुन पकडतात हे, शेतकरी जातीचे मासे!!



**-संतराम पाटील**

# पाककृती

## रव्याच्या उकडीचे मोदक

**आवरण :** १ वाटी बारीक रवा, सव्वा वाटी पाणी, १ चमचा तूप, पाव चमचा मीठ

**सारण :** १चमचा तूप, खवलेला नारळ २ वाटी, गूळ १ वाटी, २ चमचे खसखस किंवा पांढरे तीळ ( यापैकी एक), आवडी नुसार काजू, बदाम, पिस्ता यांची जाडसर भरड

**क्रमवार पाककृती:**

**कृती:**



१. सव्वा वाटी पाणी उकळत ठेवावे, त्यात तूप मीठ घाला. चांगला उकळला कि गॅस फ्लेम लो करा.

२. हळूहळू रवा सोडा व कालथ्याने हलवत राहा.

३. गॅस बंद करून झाकण ठेवा. १५-२० मिनिट सेट होऊ द्या.

४. तोपर्यंत सारण करून घ्या. कढई मध्ये चमचाभर तुपात ड्रायफ्रूटस भरड परतून घ्या, तीळ किंवा खसखस घाला, त्यातच गूळ घाला.

५. गूळ विरघळला कि खवलेला खोबरं घाला.

६. खोबऱ्याचा पाणी सुके पर्यंत परतत राहा.

७. वेलची जायफळ पूड घालून गॅस बंद करा.

८. रव्याची उकड जरासा पाण्याचा हात लावून मळून घ्या. अगदी मऊ शिजलेली असते अजिबात वेळ नाही लागतं मळायला.

९. आता हवे तसे मोदक वळा.

१०. ५ मिनिट वाफवून घ्या.

चवीला अगदी तांदुळासारखे लागतात. कळणारही नाही खाऊन कि रव्याचे आहेत.

## बाजरी हुरड्याचं थालीपीठ

साहित्य : बाजरी हुरड्याचं पीठ एक पेला, पाव वाटी बेसन, पाव वाटी गव्हाचं पीठ, एक पेला चिरलेली कोथिंबीर, सात-आठ लसूण पाकळया, हिरवी मिरची आणि जिरं एकत्र ठेचून केलेला ठेचा दोन टेबलस्पून, पाव चमचा ओवा, हळद एक टेबलस्पून, सालं-बिया काढून बारीक चिरलेले दोन टोमॅटो, बारीक चिरलेले दोन कांदे, भाजण्यासाठी तेल आणि चवीपुरतं मीठ.



कृती : प्रथम सर्व पीठं परातीत चाळून घेऊन एक करावीत. मग त्यात इतर जिन्नस कोथिंबीर, कांदा, लसूण-मिरची-जीरं ठेचा, हळद, ओवा, टोमॅटो आणि मीठ घालून, लागेल तेवढंच पाणी घालत राहा आणि घट्ट पीठाचा गोळा मळून घ्या. या गोळयाला तेलाचा हात लावून तो किमान अर्धा तास झाकून ठेवा. नंतर एका सुती कापडाला तेल लावून, लिंबाएवढा एक एक गोळा घेऊन तो हलक्या हाताने पुरीपेक्षा जरा मोठा थापावा आणि तव्यावर थोडं तेल घेऊन त्यावर टाकावा. खालची बाजू पुरेशी भाजली, की थालीपीठ उलटा आणि पुन्हा कडेने थोडं तेल सोडा. दोन्ही बाजूने तेल लावून थालीपीठ खरपूस भाजलं, की खायला मस्त लागतं. कोणत्याही चटणी किंवा सॉससोबत या थालीपीठांचा मस्त आस्वाद घ्या.

## उपवासाचे सांडगे

साहित्यः- अर्धा किलो वरीचे तांदूळ, दहा हिरव्या मिरच्या, मीठ ,जिरे दाण्याचे कूट.

कृतीः- तांदूळ स्वच्छ धुवून शिजवा व हिरव्या मिरचीची पेस्ट करून घ्या. एका ताटात शिजुन थंड झालेला वरीचा भात, हिरव्या मिरचीची पेस्ट दाण्याचे कूट जिरे व चवीनुसार मीठ घालून सर्व एकत्र करून गोळा बनवा. तयार गोळयाचे मध्यम आकाराचे काही व गोळे बनवून घ्या. एका ताटात किंवा परातीत या गोळयाचे छोटे छोटे तुकडे चांगले वाळवा एक-दोन दिवस सुकून घ्या. तयार सांडगे डब्यात भरून ठेवा जेव्हा लागतील तेव्हा तळून खा.

## चटपटीत सोयाबीन चिली

**साहित्य:** १०० ग्रॅम सोयाबीन वड्या, दोन ते तीन सिमला मिरची, दोन ते तीन मध्यम कांदे, एक कप बारीक चिरलेला कोबी, तीन ते चार हिरव्या मिरच्या, दोन चमचे सफेद तीळ, १५ ते २० लसूण पाकळया, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा गरम मसाला, दोन वाटी मक्याचे पीठ, पाव वाटी तांदळाचे पीठ, सोया-चिली-टोमॅटो सॉस प्रत्येकी एक मोठा चमचा, चवीनुसार मीठ, आवश्यकते नुसार तळायला तेल.



**कृती :** सगळयात आधी सोयाबीन वड्या जराशा उकडून घ्याव्यात. मका आणि तांदळाचे पीठ एकत्र करून, त्यात चवीनुसार मीठ, लाल तिखट, गरम मसाला टाकून, जरासं घट्ट मिश्रण बनवून घ्या. मग त्यात उकडलेल्या सोयाबीन वड्या टाकुन ते सर्व तयार पीठ वड्यांना लागेल असं बघा. नंतर गरम तेलात सोनेरी रंग येईपर्यंत छान कुरकुरीत तळून घ्या. कांदा आणि सिमला मिरची चौकोनी आकारात कापून ते सुद्धा मध्यम स्वरूपात तळून घ्या.

बारीक चिरलेला कोबी, लसूण, हिरवी मिरची एकत्र दुसऱ्या कढईत अथवा फ्राय पॅनमध्ये छान एकत्र गरम करून, त्यात सोया सॉस, चिली सॉस, टोमॅटो सॉस टाकून छान गरम करा. त्यात आता तळलेल्या सोयाबीन वड्या, कांदा, सिमला मिरची टाकून छान एकत्र जरा गरम करा, मग त्यावर सफेद तीळ घालून सर्वांना गरम गरम सर्व्ह करा.

## पेरूची कोशिंबीर

**साहित्य:-**
**तीन चार मोठे पिकलेले पेरू, तीन चार मध्यम बटाटे, दोन तीन कांदे, तीन हिरव्या मिरच्या, चार पाच कोथिंबिरीच्या काड्या, चार-पाच पुदिन्याच्या काड्या, एक चमचा मीठ, एक चमचा साखर.**
**कृती:-**
**बटाटे उकडून सोलावे. बटाटे कांदे पात मिरच्या कोथिंबीर व पुदिन्याची पाने बारीक चिरावे बियांचा भाग काढून टाकून द्यावा .साल काढून टाकून गर बारीक चिरावा. सर्व एकत्र मिसळावे. मीठ व साखर घालावी .लिंबाचा रस व गार करून ही कोशिंबीर खायला द्यावी.**

## शिंगाड्याच्या पिठाचा ढोकळा



**साहित्यः**- दोन वाट्या शिंगाड्याचे पीठ, एक वाटी भाजलेल्या दाण्याचे कूट, दोन वाट्या आंबटसर ताक, मीठ ,दोन तीन हिरव्या मिरच्या, आले, एक चमचा जिरे, खायचा सोडा.

**कृतीः**- सकाळी पिठात ताक घालून भिजत ठेवावे. दोन-तीन तासांनी त्यात अंदाजे मीठ वाटलेल्या हिरव्या मिरच्या व आले दाण्यांचे कुट थोडेसे जीरे व सोडा घालून चांगले ढवळून घ्या. ंग हवा असल्यास हळद घालावे त्यांच्या स्टीलच्या चपट्या डब्याला तुपाचा हात लावून त्यात पीठ घालावे व कुकरमध्ये अर्धा तास वाफवून घ्यावे. जरा थंड झाल्यानंतरच वड्या कापाव्यात. वरती थोडेसे ओले खोबरे व कोथिंबीर घालावी तयार आहे शिंगाड्याच्या पिठाचा ढोकळा.

## रताळयाची कचोरी



**साहित्यः**- एक मुठ चिरलेली कोथिंबीर, एक वाटी खवलेले खोबरे, चार-पाच हिरव्या मिरच्या, ५० ग्रॅम बेदाणे चवीनुसार मीठ आणि साखर, २०० ग्रॅम रताळी एक मोठा बटाटा आणि थोडेसे मीठ.

**कृतीः**- रताळी व बटाटे उकडून घ्यावेत व सोलून हाताने कुस्करून पुरणयंत्रातून काढून घ्यावेत. त्यात थोडे मीठ घालावे. अर्धा चमचा तुपावर मिरच्यांचे तुकडे परतून घ्यावे. नंतर गॅस वरून खाली उतरून त्यात खोवलेले खोबरे चिरलेली कोथिंबीर व चवीनुसार मीठ व थोडीशी साखर घालून सारण करावे . पिठात घोळवून तेलात तळाव्यात.

# ✳ किचन टिप्स?



१.साखर मुंग्यांपासून सुरक्षित ठेवण्याकरीता साखरेच्या डब्यात वरच ४-५ लवंग ठेवाव्यात.

२.सूखे खोबरे तूर डाळीत खुपसून ठेवले तर खराब होत नाही.

३.रस्सा, भाज्या खारट झाल्यास त्यात उकडलेला बटाटा घालावा, खारट पणा कमी होतो.

४.लिबांचा रस जास्त हवा असल्यास पाच-दहा मिनिटे लिंबू कोमट पाण्यात भिजवून मगच रस काढावा, रस जास्त निघतो.

५.कोणताही पूलाव किंवा मसालेभात करताना तांदुळ १-२ तास पाण्यात भिजवून ठेवला तर साध्या तांदळचा पण दाणा वेगळा आणि मोठा होतो.

६.बटाटे झटपट उकळण्याकरिता पाण्यात चिमटीभर हळद घालावी.

७.हिंगाचा वास टिकविण्यासाठी हिंग तुरीच्या डाळीच्या डब्यात ठेवावा.

८.डाळ किंवा तांदूळाला किड लागण्यापासून जपण्याकरीता त्यात कडूलिंबाचा पाला घालावा.

९.दुधाला वीरजण लावताना आतून थोडीशी तुरटी फिरवावी. दही घट्ट होते.

१०.भाज्यांमध्ये मीठ शेवटी घातल्यास भाजीतले लोह (iron) टिकन्यास मदत होते.

११.भेंडीची भाजी शिजवताना त्यात दोन चमचे दही घातले तर ती चिकट होत नाही.

१२.पुऱ्याच्या कणकेत चिमटीभर साखर घातली तर पुऱ्या बराच वेळ फुगलेल्या राहतात.

१३.छोले रात्री भिजवताना त्यात मूठभर हरभरा डाळही भिजवावी, त्याने छोले छान रस्सादार आणि दाट होतात.

१४.कटयावर लिंबाच्या रसाचे पांढरे डाग पडल्यास त्यावर आल्याचा तुकडा घासावा, डाग जातात.

१५.कढिलिंब एकदम बराच आणल्यास शिल्लक राहिला की सुकतो. अशा कढिलिबांची पाने तेलात तळून, डब्यात भरुन ठेवावीत. त्याचा हिरवा रंग कायम राहतो व ते बराच दिवस टिकतात.

१६.गाजर, टमाटर, काकडी, बीट, मुळा मऊ किंवा शिळा झाल्यास रात्रभर मिठाच्या पाण्यात घालून ठेवाव्यात. ताज्या व टवटवीत होतात.

१७.कच्ची केळी दीर्घ काळ ताजी राहण्या करीता थंड पाण्यानी भरलेल्या पातेल्यात ठेवावी. साधारण १ आठवड्या पर्यंत केळी टवटवीत राहतात. हे पाणी २ दिवसांत एकदा बदलावे.

१८.पालेभाज्या शिळया सुकलेल्या असल्यास पाण्यात १ चमचा विनेगार किंवा लिंबुरस घालून ठेवल्या तर ताज्या होतात.

१९.शेंगदाणे भाजून झाल्यावर त्यात २ चिमटी मीठ टाकावे आणि गैस बंद करून थोडे परतावे. त्याने साल लवकर सुटतात.

# टिप्स...

१.घरातील वय वर्ष २५ ते ६० असलेल्या कमावत्या व्यक्तींने उत्तरेला पाय करून झोपावे. उत्तर दिशा ही उत्तरोत्तर प्रगती करणारी असते त्यामुळे कोणतेही काम करताना उत्तरेला तोंड करून करावे.

२.घरामध्ये अडगळ,भंगार किंवा जुन्या बंद पडलेल्या वस्तू ठेवणे म्हणजे आपणच आपली प्रगती थांबविण्यासारखे आहे.
घराची उत्तर दिशा बंद असेल तर कर्ज-बाजारी होण्याचे प्रमाण वाढते आणि घरातील आर्थिक समस्या वाढतात.

३.नवीन घर घेताना वास्तुशास्त्रानुसार घर आहे की नाही हे पाहुन घर विकत घ्यावे म्हणजे घरामध्ये सुख-समृध्दी आणि उत्तम आरोग्य राहते.

४.नवीन घर घेताना घराचा दरवाजा उत्तर किंवा पूर्व दिशेला असावा म्हणजे घराच्या दरवाजातून बाहेर बघताना उत्तर किंवा पूर्व दिशा असावी.

५.नवीन घर घेताना दक्षिण, पश्चिम, नैऋत्य आणि आग्नेय या दिशातुन येणारे दरवाजे टाळावेत.
भाग्योदयासाठी घराच्या हॉलमध्ये बांबु ट्री म्हणजेच लकी ट्री ठेवावा.

६.घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये आणि घरामध्ये शुभ उर्जा भक्कम रहावी यासाठी मुख्य दरवाजाला लाकडी उंबरा बसविणे महत्वाचे आहे.

७.घराच्या मुख्य दरवाजावरती वाळलेली फुले, पाने, सुकलेली तोरणे काढून टाकावीत . म्हणजे घरामध्ये शुभ उर्जा प्रवेश करण्यास कोणताही अडथळा निर्माण होत नाहीत.

८.घरातील सर्व खोल्यांमधील घड्याळे ही उत्तर किंवा पुर्व भिंतींवर लावावीत म्हणजे घड्याळाकडे बघताना आपले तोंड पुर्व व उत्तर या शुभ दिशांना होते.

९.घरातील सर्व खोल्यांमधील कॅलेंडर्स ही पूर्व किंवा उत्तर भिंतींवर लावावीत म्हणजे कॅलेंडर कडे बघताना आपले तोंड शुभ दिशांना होते.

१०.कोणतेही काम करताना आपले तोंड उत्तर किंवा पुर्व दिशेला असावे म्हणजे आपले काम वेळेत आणि विना अडथळा पार पडते .

११.झोपताना कधीही दक्षिणेला पाय करून झोपू नये त्यामुळे आजारपण वाढते आणि माणुस कर्ज बाजारी होतो .
घराच्या ईशान्य दिशेला वजन ठेऊ नये. ईशान्य दिशा ही नेहमी हलकी आणि मोकळी ठेवावी म्हणजेच घरामध्ये शांतता राहते .

१२.सुख-समृदधीसाठी घराच्या मुख्य दरवाज्यासमोर बालाजीचा फोटो लावावा .

१३.बेडरूममध्ये देवघर किंवा देवाची मूर्ती, फोटो असु नये .

१४.लाल, काळा, मरून, हे तीन कलर घरामध्ये जास्त वापरू नयेत यामुळे घरा मध्ये सुख - समृदधीदायक आयुष्यासाठी अडचणी येऊ शकतात .

१५.झोपताना बेड स्विच बोर्ड पाशी येऊ देऊ नये. त्यामुळे निद्रानाशेचा अडथळा येऊ शकतो .

# टिप्स...

•घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये म्हणुन मुख्य दरवाजाजवळ तुळस असणे आवश्यक आहे .
•दरवाजाच्या चौकटीवर आतून बाहेरून विघ्न हर्त्याची म्हणजेच गणपतीची टाईल्स लावणे आवश्यक आहे .
•घराच्या प्रत्येक रूममध्ये खडे मिठाचा बाऊल ठेवणे .
•आठवडयातून एकदा खडे मिठाच्या पाण्याने फरशी पुसणे यामुळे घरामध्ये सुख समृध्दी राहते.
•मुलांची शैक्षणिक प्रगती चांगली होण्यासाठी त्यांना पूर्वेला डोके आणि पश्चिमेला पाय करून झोपवावे .
•मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी पूर्वेला तोंड करून अभ्यासाला बसवावे .
•लहान मुलांना घराच्या नैऋत्य दिशे मध्ये झोपू नये त्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगतीत अडथळे येऊ शकतात .
•घरामध्ये पैसा, संपत्ती, ऐश्वर्य टिकवून राहण्यासाठी घराच्या नैऋत्य दिशेमध्ये तिजोरी किंवा पैशाचे कपाट ठेवावे .
•घरामध्ये शैक्षणिक आर्थिक प्रगती व्हावी यासाठी भडक रंगाचे कपडे वापरणे टाळावे .
•ईशान्य दिशेला वास्तुदोष असेल तर मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतात .
•नवीन घर बांधताना किंवा विकत घेताना घराचा आकार आयताकृती किंवा चौकोनी असावा .
•मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी सरस्वतीचे प्रज्ञावर्धन स्तोत्र आणि गणपती अथर्वशीर्ष मुलांनी रोज म्हणावे .
•उत्तम वैवाहिक आयुष्यासाठी नवरा- बायकोंनी दोन जोडलेल्या बेड वर झोपू नये .
•नवीन घर घेताना पहिल्या व शेवटच्या मजल्यावरचे घर विकत घेणे टाळावे .
•आरोग्यदायी जीवनासाठी घरा मध्ये पिवळा , काळा , लाल हे रंग कोठेही येऊ देवू नये .
•घर बांधताना यशस्वी जीवनासाठी नैऋत्य दिशेला बोअरिंग , विहीर पाण्याची टाकी बांधु नये .
•दक्षिणेला पाय करून झोपु नये कारण आरोग्य, पैसा व मानसिक ताण यांची हानी होते .
•घराच्या मुख्य दरवाजा जवळ उतरता किंवा चढता जिना असेल तर अनेक वाईट घटनांना सामोरे जावे लागते .
•घराच्या मुख्य दरवाजा समोर लिफ्ट असेल तर घरामध्ये आर्थिक,शारीरिक व मानसिक हानी होते .
•हिंस्र पशु पक्षांची, जंगली जनावरांची तोंडे, घरामध्ये लावु नयेत .
•घरात किंवा घराच्या बाहेर काटेरी वनस्पती ठेवु नयेत .
•उत्तम प्रगती हवी असेल तर काळया शाईचे पेन वापरू नयेत .
•उत्तम प्रगती साठी तांब्याची अंगठी करंगळी शेजारच्या बोटामध्ये म्हणजेच अनामिकेमध्ये धारण करावी .
•घरामध्ये बुडते जहाज किंवा वादळामध्ये फसलेली नौका यांची चित्रे भिंतींवर लावु नयेत .
•घरामध्ये कोठेही लाल,मरून,काळया रंगाचे पडदे वापरू नयेत .
•घराच्या मुख्य दरवाजावरती भयानक चित्रे लिंबु, मिरची, राक्षसाची तोंडे असे चित्र लावू नयेत .
•घरामध्ये अश्रु ढाळणारया स्त्रियांची, पुरुषांची किंवा मुलांची चित्रे लावु नयेत.
•घराच्या मुख्य दरवाजावरती सुकलेली फुले, वाळलेली पाने यांची तोरणे जास्त दिवस ठेवु नयेत .

# टिप्स...

◆घराचा मुख्य दरवाजा पुर्ण उघडणे महत्वाचे आहे म्हणजेच मुख्य दरवाजाच्या आत आणि बाहेर कोणताही अडथळा ठेऊ नये .
◆घरामध्ये सुख -समृदधी मिळावी यासाठी सकाळ-संध्याकाळ धुप, अगरबत्ती, निरंजन लावणे महत्वाचे आहे .
◆घरामध्ये सुख -समृदधी मिळावी यासाठी घरामध्ये नकारात्मक बोलणे, भांडणे टाळावीत .
◆मुलांच्या उत्तम प्रगतीसाठी त्यांची बेडरूम ईशान्य, उत्तर किंवा वायव्येला असावी.
◆मुलांचे स्टडी टेबल पुर्व आणि ईशान्य दिशेमध्ये असावेत .
◆मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी स्टडी टेबलचा आकार आयताकृती चौकोनी असावा गोलाकार नसावा .
◆मुलांच्या बेडवरती किंवा स्टडी टेबलवरती कपाट असु नये .
◆आपल्या घराचे पार्कींग कोणत्याही दिशेस असो परंतु पार्कींगमध्ये गाडी लावताना उत्तर किंवा पूर्वेला तोंड करून लावावी .
◆नवीन कार घेताना लाल ,काळा व मरून कलर या रंगाची कार घेणे टाळावे .
◆नवीन कार घेताना कारच्या नंबर प्लेटसच्या अंकांमध्ये चार व आठ हे अंक येऊ देऊ नये .
◆नवीन कार घेताना कारच्या नंबर प्लेटमधील अंकांची बेरीज तीन ,सहा ,नऊ अशी असावी अंकांची टोटल चार व आठ नसावी .
◆कार प्रोटेक्शनसाठी कारच्या डिक्कीमध्ये खडे मीठ कापडी पिशवी मध्ये भरून ठेवावे .
◆घराच्या आग्नेय दिशेला टॉयलेट पाण्याचे बेसिंग येऊ देऊ नये .
◆घर बांधताना ईशान्य दिशेला जिना येऊ देऊ नये .
◆घराची उत्तर दिशा बंद असेल तर हेल्थ आणि वेल्थ प्रोब्लेम येऊ शकतात .
◆घरामध्ये देवांचे फोटो भिंतींवर टांगुन ठेऊ नये त्यांचे पावित्र्य भंग होते .
◆घरातल्या कर्त्या व्यक्तिने वायव्य दिशेला झोपु नये .
◆घरामध्ये कोठेही फॉल सिलिंग करु नये घराची उंची कमी होते त्यामूळे घरातील अडचणी वाढु शकतात.
◆इन्वरटर, यु. पी. एस बॅटरी घराच्या आग्नेय दिशेला असावा .
◆ऑफिस मधले टेबल आयताकृती किंवा चौकोनी असावेत गोलाकार नसावेत .
◆ऑफिस विकत घेताना ऑफिसचा दरवाजा उत्तर , पूर्व किंवा ईशान्येचा असावा .
◆व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिने उत्तर दिशेला तोंड करून बसावे .
◆ऑफिस मधील खिडक्या उत्तर आणि पुर्वे दिशेला असतील तर भरपुर प्रगती होते .
◆व्यावसायिकाने झोपताना उत्तरेला पाय करून झोपावे म्हणजे व्यवसायात लाभ भरपुर होतो .
◆ऑफिसमध्ये अकाउंट डिपार्टमेंट उत्तर किंवा वायव्य दिशेला असावे .

*With best compliments From*

# Aasha Developers

# ओम पब्लिकेशन

- इन्फो डायरी (वैविधपूर्ण माहिती संकलन)
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- जल - आशय (महाराष्ट्रातील धरण, पाटबंधारे, जल संधारण, जल विद्युत अर्थातच संपूर्ण पणे पाणी या विषयाला वाहिलेला ग्रंथ.)
  लेखक - राघवेंद्र कुलकर्णी आणि डॉ. विलास ज. पवार
- कल्पतरु युवा - युवा पिढीसाठी दिवाळी अंक
- सुरक्षा अभियान - सुरक्षा या विषयाला वाहिलेले वार्षिक
- सखी संवादिका - फक्त महिलांसाठी दिवाळी अंक
  संपादक - विशाखा पवार
- श्री - गणेश पूजा आणि आरती संग्रह
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- श्री लक्ष्मीपूजन - श्री लक्ष्मी, कुबेर पूजा आणि कथा, मंत्र संग्रह

दिवाळी अंकाच्या संपादनासाठी सहाय्य
कथा/कविता/कांदबरी/आत्मचरित्र इत्यादी पुस्तकांच्या
प्रकाशनासाठी सक्रिय मार्गदर्शन

संर्पक

एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- २५३६४१४१

E-mail : vilaspawar@ompublication.com